म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक

सन

संग्रहालय क्रमांक ५७

पुस्तकाचें नांव हिंदुधर्म

५७

# हिंदुधर्म

स्वधर्मोन्नतीकरितां

# हिंदुधर्म.

हें पुस्तक

रावजी रघुनाथ कार्णिक

यांणीं

बेळगांव येथें

'श्रीरामतत्त्व-प्रकाश' छापखान्यांत छापविलें.

एक लक्ष प्रति.

किंमत १ आणा.

---000---

पण ग्राहकांस पांच हजार रुपयांचीं बक्षिसें देण्याचीं आहेत.

सर्वांत मोठें बक्षीस १००० रुपयांचें आहे.

सन १८९६.

Tn. ७ee

# ...बत मिळणारें

स्वध... साच्या नंबराचें तिकिट

# संभाळून ठेवा.

प्रामाणिकपणा हेंच आमचें ब्रीद
स्वधर्म हाच आमचा प्राण
सत्यभाषण हाच आमचा स्वर्ग

# आणि

तारीख ३१ जानेवारी सन १८९७ इ०
रोजीं संध्याकाळीं ४ वाजतां
बेळगांव येथें श्रीमारुतीच्या देवालयांत
पंचासमक्ष,

बक्षिसांचा निकाला करूं

# हेंच आमचें वचन.

रावजी रघुनाथ कार्णिक, आणि मंडळी.
बेळगांव.

# प्रस्तावना

## धर्म ह्मणजे कर्तव्यकर्म.

मनुष्य जन्मल्यापासून मरेपर्यंत आत्म सुखाकरितां तो जीं जीं कर्मे करितो त्यांत त्याच्या अखेर प... मीं पडणारें असें कृत्य धर्माचरण हेंच होय.

पृथ्वींतील निरनिराळ्या धर्मांचें लोक आपापल्या समजुतीप्रमाणें स्वधर्मावर विश्वासून ईश्वर संबंधीं कर्तव्यें करितात, आपल्या धर्माची ह्मणजे ईश्वरसंबंधीं मतांची भरभराट व्हावी, आपल्या धर्माचा सर्वत्र प्रसार व्हावा, ही त्यांची दृढइच्छा असतें व त्याप्रमाणें ते त्या प्रयत्नांत नेहमीं असतात. ख्रिती, मुसलमानी, बौद्ध वगैरे जे धर्म हल्लीं भरभराटीच्या स्थितींत आहेत, त्यांतलि प्रत्येकास वरील प्रमाणें स्वधर्मवृद्धीची आकांक्ष आहेच. परंतु या सर्वांच्या उलट हिंदुधर्माची दिवसेंदिवस पायमल्ली असून त्यांतील बहुतेकांस स्वधर्माची पुरती माहितीही नाहीं, तेव्हां त्यांना स्वधर्माभिमान कसा असेलें? हिंदुधर्म हाच पुरातन धर्म असे परधर्मीही विद्वान लोक कबूल करितात. असे असून त्या धर्माचे जे आह्मीं त्यांस त्याचे प्रसाराबद्दल, कांहीं अभिमान नसावा या सारखे खेदकारक दुसरें कांहींच नाहीं. ह्मणून याच विषयावर लहान लहान पुस्तकें लिहून त्यांचा होतां होईल तेवढा प्रसार करावा, व लिहितां वाचतां येणाऱ्या प्रत्येक मनुष्याच्या वांचण्यात हीं लहान पुस्तकें यावींत, असा हें पुस्तक लिहिणाराचा हेतु आहे.

# हिंदुधर्म.

**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥**

जगांतील, निरनिराळ्या देशांतील लोक आपणास व प्रत्येक वस्तूस उत्पन्न करणारा कोणी आहे, असें मानितात. आपल्या समजुतीप्रमाणें त्याची भक्ति करितात, व मरणानंतर आपल्यास चांगली गती मिळावी अशी इच्छा धरून त्याची प्रार्थना करितात. आपापल्या धर्म पुस्तकांत लिहिल्याप्रमाणें वागण्याची त्यांची दृढ इच्छा असते, व आपलाच धर्म खरा असा प्रत्येकास अभिमान असतो. कसेंही संकट प्राप्त झालें असतां स्वधर्मपराङ्मुख न होण्याची त्यांची इच्छा असते.

प्राचीन कालापासून आपल्या हिंदुलोकांची स्वधर्म श्रद्धा दृढ असल्याचें जगप्रसिद्ध आहे. पृथ्वीतील इतर लोक ज्यावेळीं केवळ रानटी स्थितींत होते, त्यावेळीं या देशांतील लोक चांगले सुशिक्षीत, स्वधर्मरत असे होते. धर्मसंबंधीं बऱ्याच उलाढाली या देशांत झाल्या, परंतु अखेर वेदोक्त धर्मच खरा, अशी लोकांची खात्री होऊन त्या धर्मासच अनुसरून आमचे लोक वागत आले. मध्यंतरी कांहीं कालपर्यंत बौद्ध धर्माचें प्राबल्य झाले. परंतु त्याचा अखेरपर्यंत टिकाव लागला नाहीं. मुसलमान लोकांनीं तर एका हातांत आपलें धर्मपुस्तक व दुसऱ्या हातांत तलवार धरून जुलमानें आपल्या धर्माचा प्रसार या देशांत चालविला, परंतु त्या वेळची लोकांची धर्मश्रद्धा इतकी प्रबल होती कीं हजारो लोकांनीं स्वधर्म सोडण्यापेक्षां मरण पतकारिलें. नानातऱ्हेचे हाल भोगूनही ज्यांनीं स्वधर्म राखिला, त्यांच्याच वंश-

जाची दिवसेंदिवस धर्मश्रद्धा कमी कां होत चालली, याचा विचार केल्यास नवीन तऱ्हेचें इंग्रजी शिक्षण हेंच त्याचें कारण आहे, असें लक्षांत येईल. इंग्लिश लोकांच्या अमलास सुरुवात झाल्यावर आरंभीं ज्या लोकां इंग्लिश शिक्षण मिळालें, त्या बहुतेकांचीं मतें स्वधर्माविरुद्ध झालीं; त्यांस आमचा धर्म, आमचा पोशाक, आमचें भक्ष्य आवडेनासें झालें, बरेच लोक स्वधर्म सोडून ख्रिस्तीधर्मांत गेले आणि कित्येकांस उघडपणें धर्मांतर करण्याचें धैर्य नसल्यानें ते केवळ नास्तिक बनले.

ज्या ईश्वरानें आह्मांस उत्पन्न केलें, त्याची भक्ति करणें ती कोणत्याही धर्मांत, कोणत्याही जातींत, व कोणत्याही देशांत राहून करितां येतें; असें असून अर्वाचीन हिंदुलोकांस परधर्माचीं मतें कां आवडतात; याचें कारण पाहूं गेल्यास स्वधर्माचें अज्ञान हेंच होय. इतर धर्माचे लोक आपल्या मुलांस लहानपणापासून स्वधर्मांतील मतें शिकवितात. लहानपणापासून, धर्मसंबंधीं, नीतिसंबंधीं मतें दृढ झाल्यावर प्रौढपणांत त्यांच्या मनांवर अनीतीचा अम्मल बसत नाहीं. पापाचरण करण्यास त्यांचें मन धजावत नाहीं. व स्वधर्माप्रमाणें वागल्याचें फल जें मानसिक शांति ती त्यास पूर्णपणें मिळते.

सामाजिक सुधारणेंत पूर्णत्वास पोंचलेल्या इंग्लिश लोकांत लहानपणापासून मुलांस धर्मशिक्षण, नीतिशिक्षण देण्याची वहिवाट आहे. त्याप्रमाणेंच सुधारलेल्या सर्व देशांत मुलांस लहानपणींच धर्मशिक्षण मिळतें; त्यामुळें दिवसेंदिवस त्यांची भरभराट होत आहे. जगाची राहटी लक्षांत आणिल्यास कोणत्याही राष्ट्राची उन्नति अगर

ना. ध. ९१० . ४ १

होम होणें हें त्या देशांतील लोकांच्या धर्मश्रद्धेवर अवलंबून आहे, असें दिसून येईल फ्रान्स देशांतील भयंकर राज्यक्रांती होण्यापूर्वी त्या देशांतील लोकांनीं स्वधर्म सोडिला होता, बहुतेक प्रजा नास्तिक झाली होती. ईश्वर नाहीं, व तो असला तथापि मनुष्यांचें त्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं, पाप नाहीं, पुण्य नाहीं, कांहीं नाहीं. असीं समाजाचीं मतें झालीं होतीं, व त्या प्रमाणें त्यांचें आचरणही असे. त्यामुळें ईश्वरी अवकृपेचा परिणाम ह्मणजे नाश तो त्या राष्ट्रानें पूर्णपणें भोगिला. तशीच स्थिती तूर्त आमच्या देशांतील लोकांची झाली आहे. उघडपणें जरी लोक नास्तिक झाले नाहींत तरी आचरणावरून त्यांणीं स्वधर्म सोडिला आहे, असें विचारांतीं दिसून येईल. समाजानें धर्मबंधन सोडल्याचीं जीं लक्षणें, ह्मणजे पापाचरण, कलह, मत्सर, व्यभिचार यांचें तर दिवसेंदिवस प्राबल्य होत चाललें आहे.

दिवसेंदिवस असी स्थिती होत चालल्यास काळें करून याचा काय परिणाम होईल, याचा विचार केला पाहिजे. गेल्या शंभर वर्षां पूर्वीचे आमचे पूर्वज कसे होते, हल्लीं आह्मीं कसे आहों, त्यांचें धर्माचरण कसें होते, आमचें कसें आहे, याचा विचार प्रत्येकानें केल्यास समाजाच्या धर्माचरणांत होत असलेला भयंकर परिणाम तेव्हांच लक्षांत येईल.

आपल्या लोकांची नीति बिघडत चालली, लोक ईश्वराज्ञेप्रमाणें वागत नाहींत स्वधर्म सोडिला..वगैरे मतें सर्व लोक कबूल करितात, परंतु असें न होण्यास कांहीं उपाय केला पाहिजे, याचा विचार मात्र कोणी करीत

नाहीं. प्रत्येकानें आपलें घर व अंगण व पुढील रस्ता झाडून स्वच्छ केल्यास कमेटीची जरूर नाहीं. तसेंच प्रत्यकानें आपलें आचरण सुधारल्यास समाजसुधारणा व्हाच होईल. परंतु हें व्हावें कसें ?

आमचें घर मजबूत व्हावें असी इच्छा असल्यास त्याचा पाया भक्कम केला पाहिजे तसेंच लोक सुशिक्षीत व्हावे, अशी इच्छा असल्यास लहानपणापासून त्यांस योग्य शिक्षण दिलें पाहिजे योग्य शिक्षण मिळालेला मनुष्य सद्गुणी, पापभीरु स्वधर्मरत असा होईल.

सरकारी शाळेंत हल्लीं मुलांस जें शिक्षण मिळतें त्यांत मनुष्यास त्याच्या अखेरपर्यंत उपयोगी पडणारें असें जें धर्मशिक्षण तें मुळीच नाहीं. नियमित विषयांत परिक्षा द्यावी व सांपडल्यास सरकारी नोकरींत हाडें झिजवावीं. याशिवाय त्या शिक्षणाचा कांहीं उपयोग नाहीं. ज्यांस शिकलेले असे ह्मणतात, त्यांची अंतःस्थिती पाहिल्यास, तेव्हांच समजून येईल, कीं त्यापैकीं बरेच लोक दुर्व्यसनी व नास्तिक आहेत. नानातऱ्हा करून द्रव्य मिळवावें व इहलोकींचीं सुखें भोगावीं, याशिवाय त्यांस कांहीं समजत नाहीं. ईश्वरसंबंधीं, धर्मसंबंधीं विचार त्यांच्या गांवींही नाहीं. या सर्वांचें कारण काय, तर त्यांस लहानपणापासून स्वधर्माविषयीं कांहींच शिकविलें नाहीं. जुन्या चालीचे कांहीं लोक धर्माचरण समजून ज्यांचा वेदोक्त धर्माशीं कांहीं संबंध नाहीं, असें आचरण बाहिरंगी दाखवितात; परंतु अंतर्यामीं त्यांची स्थिती निराळी आहे. कलह, परद्रव्यापहार, व्यभिचार, इत्यादि अनेक पापाचरणांत ते नेहमीं निमग्न आहेत

नवीन पिढीच्या लोकांस तर स्वधर्माची माहितीही नाहीं, व ती असावी असेंहीं त्यांस वाटत नाहीं, ईश्वर आहे कीं नाहीं हीच बहुतेकांस शंका, तेव्हां पुढील विचार करतो कोण? कित्येकांस आपणांस उत्पन्न कर्ता कोणी असावा असें वाटतें, परंतु त्यासीं आपलें कर्तव्य काय असणार अशा समजूतीवर ते स्वस्थ आहेत. कित्येकांस ईश्वर ह्मणून कोणी आहे कीं नाहीं, याचीच शंका. कित्येकतर उत्पन्नकर्ता कोणी नाहीं, हें सर्व जग आपोआप उत्पन्न झालें, व आपोआप लयास जाईल या तत्वावर भरंसा ठेऊन निर्धास्त आहेत, व हींच मतें इतर लोकांस शिकवीत आहेत. हाय! हाय! अशा या भयंकर मतांचा आमचे लोकांवर काय परिणाम होईल याचा आतांपासून आह्मी विचार केला पाहिजे.

हल्लीं जसें चालत आहे तसेंच चालो. होईल तें होवो असें ह्मणून स्वस्थ बसावे तरी एक, किंवा कांहीं प्रयत्नास लागावें हें दुसरें, या दोहोंपैकीं कांहीं तरी केलें पाहिजे खरें. स्वस्थ बसल्यास शेवटीं, जसा स्वराज्याचा निकाल झाला, तसाच स्वधर्माचाही होणार मग पुढें त्यास कांहीं उपाय राहणार नाहीं, ख्रिस्ती लोकांच्या भविष्याप्रमाणें या देशांतील सर्व लोक ख्रिस्ती धर्माचे होतील, किंवा आमच्या भविष्याप्रमाणें नास्तिक तरी होतील. यांत संशय नाहीं.

आतां हीं दोन्ही भविष्यें खोटीं ठरविण्याच्या प्रयत्नास आह्मी लागल्यास त्यांत यश येईल किंवा नाहीं त्याचा विचार केला पाहिजे.

राज्य संबंधीं जसे आह्मी पराधीन आहों तसे स्व-

धर्म संबंधीं अजून तरी नाहीं. आमच्या धर्माप्रमाणें वागण्यास त्यांत अत्यंत जरूर असलेली सुधारणा करण्यास, कोणाचा प्रतिबंध नाहीं, जुलुमानें परधर्मांत जाण्याचाही प्रसंग आमच्या स्थितीस नाहीं. तेव्हां फक्त आमच्याच हयगयीनें स्वधर्माचें मातेरें होण्याचा प्रसंग आलेला आहे यांत संशय नाहीं.

यांत आमची हयगयी ती काय? असा साहजिक प्रश्न येतो, त्याचें उत्तर हेंच कीं, खरोखर आमच्या लोकांच्या अविचारामुळे तूर्त स्वधर्माची अशी स्थिती झाली आहे, नेहमी धर्मसंबंधीं विचार करावा, लोकांस धर्मशिक्षण द्यावें, धर्मोपदेश करावा, लोकास कुमार्गापासून सोडवून चांगल्या मार्गास लावावें, इत्यादि हीं नीं ब्राह्मण ज्ञातीचीं कर्तव्यें तीं त्यांनीं केलीं पाहिजेत. हरिदास, पुराणीक, वगैरे धर्मोपदेशकांनीं लोकांस सदुपदेश केला पाहिजे. नुसतें पोटाकरितां केलेल्या उपदेशापासून लोकांवर चांगला परिणाम कसा व्हावा? नाहींच होत! समजाच्या पुढाऱ्यांची असी स्थिती असल्यानें बाकीच्या लोकांची धनगर नसलेल्या मेंढराप्रमाणें स्थिती झाली आहे पाहिजे त्यानें पाहिजे तें करावें, विचारता पुसता कोणास कोणी नाहीं. तेव्हां अशाचा परिणाम होणार तरी काय?याचें नाश हेंच उत्तर.

असा नाश होऊं नये असें ज्यांस वाटत असेल त्यांनीं आपलें आचरण सुधारलें पाहिजे. आपल्या मित्रांस, आपल्या शेजाऱ्यास, आपल्या धन्यास, आपल्या चाकरास वाईट आचरणापासून सोडविलें पाहिजे, म्हणजे होत होत सर्वांचें आचरण सुधारून त्यांची

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



स्वधर्मावर निष्ठा बसेल.

ईश्वराचा मोठेपणा, त्याची आह्मावरील ममता, त्यानें आमच्या सुखाकारितां केलेल्या सोई, ही ज्याच्या मनांत वागतात, तो कधींही त्याच्या विषयीं कृतघ्न होणार नाहीं. हें नाशवंत जग सोडून सर्वांस गेलें पाहिजे, आपापल्या पापपुण्याची फळें आह्मांस भोगली पाहिजे, असें ज्यांच्या मनांत वागतें, तो स्वधर्माचरणी सहज होईल; ह्मणून लहानपणापासून मुलांस, ईश्वर संबंधीं माहिती दिली पाहिजे, ईश्वराशीं आमचीं कर्तव्यें काय हीं त्यांस शिकविलीं पाहिजेत, सारांश, स्वधर्माचें खरें स्वरूप लहानपणापासून शिकविलें तरच मोठेपणीं त्यांचीं मनें पापाचरणापासून दूर रहातील.

आमच्या धर्मपुस्तकांत सांगितलेल्या आचरणाप्रमाणें वागणारे आज मितीस किती निवतील याचा विचार केल्यास बहुतकरून नकारच दृष्टीस पडेल. सर्व लोक इहलोकींच्या क्षणिक सुखास भुलून परलोकींच्या अक्षय सुखास मुकण्यास पात्र होत चालले आहेत. आह्मी हिंदु आहोंत असें ह्मणणार हजारों आहेत. पण हिंदुधर्माचें खरें तत्व बहुतेकांस माहित नाहीं. ईश्वर संबंधीं खरी माहिती व आमचीं इहलोकींचीं कर्तव्यें ज्यांत विस्तारानें लिहिलीं आहेत, असीं आमचीं धर्मपुस्तकें वाचणारे व त्याप्रमाणें वागणारे आजमितीस कोणी आहेत काय? असलेल्यास फारच थोडे असतील आमच्या लोकांची एकी व्हावी, असी इच्छा असल्यास आमच्या लोकांची सांपत्तिक स्थिती सुधारावी, अशी इच्छा असल्यास आमची धर्म संबंधीं स्थिति सुधारली पाहिजे.

हिंदुधर्माप्रमाणें जर आमचें आचरण नाहीं, तर आह्मी हिंदु कसचे?

देशांतील लोकांची एकी असणें, लोक संपत्तिमान असणें, धनधान्याची समृद्धि असणें, हीं सर्व ईश्वरी कृपेचीं लक्षणें आहेत. ज्या देशांत याच्या विरुद्ध स्थिति असेल तेथील लोकांवर ईश्वरी कृपा नाहीं असें समजलें पाहिजे स्वधर्म सोडून दिला, ईश्वरी आज्ञा मोडिल्या, लोक पापाचरणी झालें, तर मग ईश्वरी अवकृपा कां होऊं नये? आमच्या देशाच्या निकृष्ट स्थितीस कारण ईश्वरी अवकृपा, व त्या अवकृपेस कारण स्वधर्म त्याग. सारांश अनादिकालापासून चालत आलेल्या अतिश्रेष्ठ अशा आमच्या वेदोक्त धर्माची प्रत्येक हिंदु ह्मणविणारानें पूर्ण माहिती घेतली पाहिजे, त्या प्रमाणें आपलें आचरण सुधारलें पाहिजे, तरच तो हिंदुधर्मी होईल. द्वेष, निंदा, व्यभिचार, असत्यभाषण, चोरी वगैरे पापाचरणें जोंपर्यंत समाजांत होतील, तों पर्यंत आमच्यावर ईश्वरीकृपा कधींही होणार नाहीं धर्मोन्नति हेंच प्रत्येक देशांतील लोकांच्या भरभराटीचें आदि चिन्ह आहे, ईश्वरी कृपेशिवाय आमच्या हातून कोणतीही बरी वाईट गोष्ट होणार नाहीं, ह्मणून जर आह्मांस आमची स्थिति सुधारून देशांतील लोक सुखी व्हावे, असी इच्छा असल्यास स्वधर्माप्रमाणें वागण्याविषयीं लोकांस उपदेश केला पाहिजे, व मुख्यत्वें मुलांस लहानपणापासून ईश्वराची भक्ति, सन्मार्ग, नीति, स्वधर्म इत्यादि विषयांची माहिती दिली पाहिजे, मुलांच्या बऱ्या वाईट आचरणाकडे आईबापांनीं नेहमीं लक्ष दिलें

पाहिजे, त्यास वाईट संगत न लागण्याची व्यवस्था केली पाहिजे तरच मोठेपणीं तीं नीतिमान, स्वधर्मरत, पापभीरु, असीं होतील.

मनुष्याची स्वधर्मावर श्रद्धा असली, ह्मणजे त्याचे हातून सहसा पापकृत्य होणार नाहीं. कोणत्याही धर्मांतील मनुष्य असो, जर त्याची स्वधर्मावर श्रद्धा आहे, तर त्याचे हातून पापकृत्य कधींही होणार नाहीं. स्वधर्म श्रद्धा नसल्यानें मनुष्य ईश्वरसंबंधीं बेपर्वा असतो. आपल्या पापाचरणाबद्दल ईश्वर आपल्यास शिक्षा करील हे भय त्याच्या मनांत वागत नाहीं, त्यामुळें दिवसेंदिवस पापाचरणाकडे त्याची प्रवृत्ती जास्त होते. आमच्या देशांत इंग्लिश राज्यसत्ता झाल्यामुळें सर्वांत आमचें जें भयंकर व कधींही भरून न येणारें नुकसान झालें तें हेंच कीं आमचे हिंदुलोक स्वधर्म पराङ्मुख झाले. खोट्या साक्षी देणें, खोट्या शपथा वहाणें, जारकर्म इत्यादि पापांत ते नेहमी चूर होऊन गेले व जात आहेत. आमच्या पूर्वजांच्या गोष्टी ऐकिल्यातर ते किती पापभीरु एकवचनी व सदाचरणी होते, या विषयीं आह्मांस आश्चर्य व अभिमान वाटतो, त्यां सारखें हल्लीच्या लोकांस होणें शक्य नाहीं काय? शक्य आहे. स्वधर्मश्रद्धा मात्र पाहिजे.

ज्या शिवाजी राजानें हिंदुराज्य स्थापिलें, त्याची स्वधर्मावर पूर्ण श्रद्धा होती. गोब्राह्मण प्रतिपाल करावा, ह्मणून त्यानें मुसलमानाशीं भयंकर लढाया केल्या. व ईश्वर कृपेनें त्यांत यशही आलें. त्याचा मुलगा संभाजी हा जरी पापाचरणी झाला, तरी त्यानें स्वधर्म

राखण्याकरितां मरण पतकरिलें. मुसलमान लोकांचें प्राबल्य असतांना त्यांनीं हिंदु लोकांस जुलमानें बाट-विण्याचा जेव्हां क्रम सुरू केला तेव्हां हजारो हिंदु-लोकांनीं मरण पत्करिले, पण स्वधर्म सोडिला नाहीं. अशी त्या वेळची स्थिति असून, हल्लीं जुलूम जबरी नसतां हजारो लोक स्वधर्म सोडून ख्रिस्ती झाले, बहुते-कांस स्वधर्म अगदीं तुच्छ वाटून ते केवळ नास्तिक बनले. हिंदुधर्मांतुन बहकून गेलल्या लोकांस कोणी शास्ता नसल्यामुळें त्यांची स्थिति दिवसेंदिवस वाईट होत आहे. परधर्मी राजा असल्यानें प्रजेची धर्मसंबंधीं स्थिति निकृष्ट होत आहे. व याचा परिणाम कधींही चांगला होणार नाहीं.

ह्मणून प्रत्येक हिंदु ह्मणविणारानें स्वधर्माची माहि-ती करून घ्यावी, धर्माचरणांत तत्पर रहावें, आपल्या मुलांस धर्म शिक्षण द्यावें; व हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं, ईश्वरकृपेनें वेदोक्त धर्मांतील तत्वें माहित करून घेण्या सारख्या हिंदु जातींत आपला जन्म झाला आहे, त्या पेक्षां आपल्या जन्माचें सार्थक करून घेण्याची सुसंधी सोडतां नये.

ज्या ईश्वरानें आह्मांस हिंदुधर्मांत जन्म दिला तो या इच्छा परिपूर्ण करो.

एक आणा देऊन

# हिंदुधर्म

हें पुस्तक

## घेणारांस सर्वांत मोठें बक्षीस १००० रु

### तुम्हांस स्वधर्माभिमान आहे काय? असल्यास हिंदुधर्म हें लहानसें पुस्तक घ्या.

या पुस्तकाच्या ग्राहकांस जीं ५००० रुपयांचीं इनामें देण आहेत, त्या पैकीं सुदैवानें तुम्हांस एखादें मिळेल.

या पुस्तकाच्या एक लक्ष प्रती काढिल्या आहेत, त्यांची किंमत प्रतीस एक आण्याप्रमाणें ६२५० रुपये वसूल करून, त्यां पैकीं १ रुपये, पुस्तकांची छापणावळ व विक्री करणारांस पगार वजा बाकीच्या पांच हजार रुपयांचीं बक्षिसें एक लक्ष नंबराच्या चिठ्या बांटण्यांत येतील.

**बक्षिसांचा तपशील.**

| | | | |
|---|---|---|---|
| १–बक्षिस रोख हजार रुपयांचें. | एकूण | रुपये | १ |
| २–बक्षिसें २५० रुपयांचीं. | ,, | ,, | |
| १०–बक्षिसें शंभर शंभर रुपयांचीं. | ,, | ,, | १ |
| २०–बक्षिसें पंचवीस पंचवीस रुपयांची. | ,, | ,, | |
| १००–बक्षिसें दहा दहा रुपयांचीं. | ,, | ,, | १ |
| १०००–बक्षिसें एक एक रुपयाचीं. | ,, | ,, | १ |
| ११३३ | | | ५ |

हल्लीं पुस्तकांचे जे नंबर लगत जोडिले आहेत, त्याच नंब चिठ्या घालण्यांत येतील. व ज्या नंबरास इनामें येतील, ते नंबर मानपत्रांत प्रसिद्ध केले जातील. शिवाय बक्षिस आलेल्या लोकांस पाठवून कळविण्यांत येईल.

ज्या लोकांकडे बक्षिस आलेल्या नंबराच्या चिठ्या असतील त्या आमच्याकडे पाठविल्यास त्यांस बक्षिसाची रकम मिळेल. काच्या विक्रीच्या मानानें ता० ३१ जानेवारी सन १८९७ इ० बेळगांव येथें सभ्य पंचासमक्ष इनामाच्या चिठ्या काढण्यांत येतील.

'एजंट' होऊं इच्छिणारांनीं पत्रद्वारें माहिती विचारावी.

**रावजी रघुनाथ कर्णिक**

आणि मंडळी. बेळ

अभ्यंकरकृत पुस्तकमाला नंबर १.

# मनुष्य आणि त्याचीं कर्तव्यकर्में

## भाग १ ला.

शार्दूलविक्रीडित.

ज्याचा पूर्ण कटाक्ष नीति धरुनी लोकीं भलें जोडणें
ज्याचें चित्तस्वकार्यदक्ष ब्रिदहीसत्कार्यिंश्रीखर्चिणें
ज्याची संगति इष्टलाभ करवी मोडी अनिष्टा झणीं
त्या कर्तव्यपटूस योग्य म्हणती सद्गुणखाणी जनीं

---

हा सन्मार्गदर्शक लहानसा निबंध
रा. रा. कृष्णाजी गणेश अभ्यंकर यांनीं
ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत छापविला.

आवृत्ति १ ली.
५०० प्रति
सन १८९६

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क पुस्तककर्त्यानें
आपणाकडे ठेविले आहेत

किंमत ४ आणे.

पुस्तकें मिळण्याचें ठि. रा. यशवंत गो. हर्डीकर बु. से. रामवा. मुंबई.

पृथ्वीवृत्त.

कृती सरळबंध ही मति निमग्न सत्कारणीं ॥
सुशांति मनिं व्यक्त हो बहु उदारता ही जशीं ॥
अहंपण अभाव निस्पृहपणा जगन्मान्यता ॥
अनेक गुणमेळना नच मुळे जगीं कोणता ! ॥

---

हें
नीतिपर
लहानसें पुस्तक
श्रीयुत रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशमुख (सी. एस्.)
यांस त्यांचे औदार्य, सुस्वभाव,
नीतिधैर्य, लोकमान्यता वगैरे
गुणांस लुब्ध होऊन
आदरपूर्वक अर्पण
केलें असे.

कृ. ग. अ.

## निबंधावर आलेले विद्वान लोकांचे अभिप्राय.

श्री

नमस्कार वि. वि. तुम्ही '**मनुष्य आणि त्याचीं कर्तव्यें भाग पहिला**' हा लेख मला पहाण्याकरितां पाठविला तो वाचून पाहिला. तुमचा उद्योग स्तुत्य आहे. लेखाची भाषा चांगली असून विचारही उत्तम आहेत. पुस्तक आश्रयास पात्र आहे. कळावें लोभ करावा हे विनंति. ज्येष्ठ शुक्ल ८ गुरुवार शके १८९४

(सही) **गोविंद शंकर शास्त्री बापट**
असिस्टंट मास्तर एलफिन्स्टन
हायस्कूल मुंबई, व (सद्वर्तन
नीतिमंदीर वगैरे पुस्तकांचे कर्ते)

---

श्री

ग. रा. **कृष्णाजी गणेश अभ्यंकर** मु. मुंबई यांस.

सा. न. वि. वि. आपण "**मनुष्य आणि त्याचीं कर्तव्य कर्मे**" हें पुस्तक नवीनच रचून मजकडे अभिप्रायाकरितां पाठविलें तें वाचून मनाला फार आनंद झाला. सदरहु पुस्तकाची भाषासरणी सरळ आणि सुबोध असून विषय प्रतिपादनशैलीही वर्णनीय आहे. अशा तऱ्हेचीं पुस्तकें मराठीभाषेंत जितकीं होतील तितकीं थोडीच असें माझें मत आहे. हल्लींच्या काळीं "शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्." या महावाक्याचा आपल्या लोकांस विसर पडल्या सारखाच झाला आहे असें दिसतें. तरी आपलें पुस्तक वाचून त्या संबंधानें आपल्या लोकांत जर कांहीं जागृति झाली तर त्यापासून त्यांस बराच

फायदा होईल यांत संशय नाहीं. असो. आपलें पुस्तक शिकणाऱ्या किंवा बक्षिसांचे निमित्तानें तरुण व होतकरू विद्यार्थ्यांच्या हातीं जाऊन त्यांनीं तें लक्षपूर्वक वाचल्यास व त्याप्रमाणें वागण्याचा दृढ निश्चय केल्यास त्यापासून त्यांस फार उपयोग होईल. कळावें हे विनंति.

रामकृष्ण नीलकंठ वडे
बी. ए. असि. मास्तर बी.
जी. हायस्कूल ठाणें.

---

Dear Sir,

I have read with great interest your Marathi Essay on the duties of man. I congratulate you on its simplicity of style and purity of diction. We greatly need such original productions for employing our leisure in Marathi literature and for the instructions of our ladies and children. In my opinion you richly deserve encouragement in your efforts to enrich the Marathi literature.

Yours faithfully
(Sd) J D Kolatkar
Superintendent P. W. D.
Secretariat, Bombay.

---

Dear Mr. Abhyankar,

Read your excellent essay and I am glad to say my time has been amply repaid. Its reading is fertile that is to say it furnishes us with many instructive principles. You are really to be congratulated upon this first undertaking of yours which is

certainly promising. It is to be profoundly regretted that its advantage can be reaped only by those who know Marathi, and consequently I heartily recommend its translation into other languages.

I am yours

(Sd) N.G. Chapekar,

B. A. L. L. B.

---

Dear Mr Abhyankar.

I am very much pleased with the masterly hand with which you have handled your essay entitled Man and his duties in Marathi. It is really deserving admiration of the public and the learned. It contains maturethoughts and arguments which would serve honour and name for a learned man even. They deserve to be followed. The more I look into your essay and your circumstances, the more room I find for applauding you.

yours faithfully

(Sd.) K. J. Londhe.

(late) Head clerk

to the Executive Engineer

Presidency'

---

I have looked through the book and see through every line the intense desire of the writer to impress the principles of morality on every uncultivated mind. The style is simple enough and the exposition of the subject clear even to the understanding of readers of intelligence beelow average.

(Sd') A. H. Kher. B. A.

# प्रस्तावना.

ज्ञानेच्छु मनुष्य प्रयत्न करणारा असल्यास उत्तरोत्तर ज्ञानप्राप्ति करून घेतो; व तें ज्ञान व्यवहारांतील प्रत्यक्ष अनुभवानें व पुस्तकांचें द्वारें अप्रत्यक्ष रीतीनें त्यास मिळत असतें. या ज्ञानाच्या सहाय्यानें आपल्या संसारसंबंधाच्या अडचणी दूर करण्याविषयीं तो ज्याप्रमाणें जपतो त्याप्रमाणेंच प्राप्तज्ञानाचा उपयोग लोकहिताकडे करणें हेंहीं त्यास इष्ट असतें. लोकहित करण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यापैकींच ग्रंथलेखन हा एक आहे. जर ग्रंथ लिहिण्याची प्रवृत्ति आजपर्यंत नसती, तर आजकाल ज्या स्थितींत हें जग आपण पहातों तिजपेक्षां अधिक अज्ञानावस्थेंत तें आपणास आढळून आलें असतें. ह्मणून ग्रंथकार व ग्रंथप्रकाशक हे जगाचे सुस्थितीस कांहींअंशीं कारण आहेत. ज्याअर्थीं ग्रंथप्रकाशन असें फायदेशीर आहे त्याअर्थीं प्रत्येकानें आपल्या अल्पस्वल्प ज्ञानप्राप्तीचा वांटा आपल्यापेक्षां कमी समजुतीचे लोकांस शक्त्यनुसार देणें अवश्य आहे. या हेतूनें व आपल्या समजुतीची दिशा बरोबर आहे किंवा नाहीं हें समजून घेण्याकरितां मी हें लहानसें पुस्तक लोकांपुढें आणिलें आहे. नीरक्षीर न्यायानें शोधक वाचक त्याचा उपयोग करून घेतील, व त्यांत व्यक्त झालेले माझे अल्प विचार कोठें चुकले असल्यास मला उदारबुद्धीनें सुचवितील अशी आशा करितों.

या पुस्तकांत सृष्टीमध्यें मनुष्याची योग्यता किती आहे कर्तव्यकर्म ह्मणजे काय, हें पहिल्यानें सांगून मग सद्वर्तन आरोग्यरक्षण व ज्ञानसंपादन अशा मुख्य व व्यापक तीन कर्तव्य कर्मांचा विचार केला आहे. मनुष्याची योग्यता किती आहे हें

शिखवितांना अनुकूल व प्रतिकूल उदाहरणें घेऊन बुद्धीच्या उपयोगाविषयीं दिग्दर्शन केलें आहे. सद्वर्तन, आरोग्यरक्षण, व ज्ञानसंपादन या विषयांवर इंग्रजी व मराठीभाषेंत बरेच लेख प्रसिद्ध झाले आहेत. यामुळें विषयाचें नांव पुढें येतांच वाचकांकडून आंत काय आहे हें पूर्णपणें पाहण्याची हयगय होईल अशी भीति वाटते; ह्मणून जरी इष्ट नव्हे तरी येवढेंच सविनय कळवितों कीं या लेखाची सरणी व विषयाचें विवेचन हीं अगदीं नवीं असून जरूर अशा स्थळीं तो रोजच्या व्यवहारांतील उदाहरणांनीं व्यक्त केला आहे. व एकंदर विषय सुबोध व उपयुक्त होऊन लहान थोरांच्या मनांत चांगला ठसण्याविषयींही यत्न केला आहे. तो कितपत साधला हें पाहणें मी माझ्या विद्वान वाचकांकडे सोंपवितों.

या पुस्तकावर अभिप्राय देतांना कांहीं विद्वान गृहस्थांनीं ज्या अमोल सूचना आपल्या उदारबुद्धीनें केल्या त्यांजवर लक्ष पुरवून मूळ लेखांत कोठें कोठें बदल केला आहे. या "पहिल्या भागास" आश्रय मिळाल्यास महाराष्ट्र भाषेची सेवा करण्यास मला मोठी ईर्षा वाटेल. इकडे लक्ष देऊन तिचे हितचिंतक या अल्पयत्नाचा स्वीकार करतील, व अधिक लोकप्रिय होईल असा या विषयाचा दुसरा भाग बाहेर काढण्याविषयीं उत्तेजन देतील अशी उमेद बाळगिली आहे.

पुस्तक कर्ता.

॥ श्री ॥

# मनुष्य आणि त्याचीं कर्तव्यकर्में.

सृष्टीकर्त्यानें सृष्टि निर्माण केली, तिचे सजीव सृष्टि व निर्जीव सृष्टि असे दोन भाग आपणास कल्पितां येतात. सजीव सृष्टि या भागाखालीं प्राणी व वनस्पति मोडतात, व निर्जीव सृष्टि या भागाखालीं बाकीचे सर्व पदार्थ मोडतात. तर सजीव सृष्टि ह्मणजे ज्यामध्यें आपण मनुष्य मोडतों त्याविषयीं थोडासा विचार करूं.

सजीव सृष्टि या मुख्य भागाचे जे प्राणी आणि वनस्पति हे उपभेद आहेत, त्यांपैकीं प्राणी या भेदाला सृष्टीकर्त्यानें जास्त महत्व दिलें आहे, कारण प्राणी हे आपल्या चलनवलनादि व्यापारासंबंधानें स्वतंत्र आहेत तशा वनस्पति नाहींत. प्राण्यांमध्यें मनुष्य एक व पशुपक्षी जीवजंतु एक असे आणखी दोन भाग करितां येतात. त्यांपैकीं मनुष्य श्रेष्ठ किंवा पशुपक्षांदिकांपैकीं कोणी श्रेष्ठ ह्मणजे एकंदर प्राणिवर्गामध्यें श्रेष्ठ कोण याचा निर्णय करूं.

फार लांब जाण्यास नको, सध्याच्याच गोष्टीवरून पहा कीं ज्या मनुष्य प्राण्याला इतर सर्व प्राण्यांविषयीं विचार करण्याची शक्ति आहे ह्मणजे ज्याला सर्वांमधील न्यूनाधिक्य समजतें तो सर्वांमध्यें श्रेष्ठ असावा किंवा नसावा ? असलाच पाहिजे हें उघड आहे. तथापि हें आपणास प्रमाणानें सिद्ध केलें पाहिजे. परंतु मनुष्य हा सर्व प्राण्यांमध्यें श्रेष्ठ आहे किंवा नाहीं हें सिद्ध करण्यापूर्वी श्रेष्ठत्व कशानें येतें व श्रेष्ठत्व ह्मणजे काय हें सांगितलें पाहिजे.

ज्या वस्तूला श्रेष्ठ असें आपण मानितों त्या वस्तूचे अंगीं इतर वस्तूंपेक्षां कांहींतरी विशेष गुण असतो हें व्यव-

हारांतील साधारण गोष्टीवरून कळतें. कारण: एका कुटुं-बामध्यें कुटुंबाचा यजमान श्रेष्ठ कां मानिला जातो? पशूंमध्यें सिंह श्रेष्ठ कां मानिला जातो? व एखाद्या राज्यामध्यें राजा श्रेष्ठ कां मानिला जातो? अशा निरनिराळ्या प्रकारच्या प्रश्नांचा विचार केला असतां जरी सर्व प्रश्नांचें एकच उत्तर देतां येत नाहीं तरी त्या श्रेष्ठपणाबद्दल प्रत्येक व्यक्ती-विषयीं मनामध्यें कांहींएक प्रकारची पूज्यबुद्धि उत्पन्न होते. ह्मणजे ज्या ज्या वस्तूला आपण श्रेष्ठ मानितों त्या त्या वस्तूचे अंगीं इतर वस्तूंपेक्षां कांहीं तरी एक विशेष गुण असतो आणि त्या गुणामुळें आपण तिला श्रेष्ठ असें मानितों. सारांश श्रेष्ठत्व हें एखाद्या वस्तूला तिच्या अंगच्या कांहीं एक प्रकारच्या विशेष गुणधर्मामुळें दिलें जातें. तर असा एखादा विशेष गुण मनुष्याच्या अंगीं आहे, किंवा इतर प्राण्यांच्या अंगीं आहे हें पाहिलें पाहिजे; परंतु याचा निर्णय सरळ रीतीनें जाऊन करितां येणार नाहीं, कांहीं गृहीत घेऊन चाललें ह्मणजे लागलाच होईल.

थोडक्यांच पहा कीं पशुपक्ष्यांदिकांस मनुष्यापेक्षां मोठें मानिलें ह्मणजे मागील श्रेष्ठत्वाच्या व्याख्येप्रमाणें मनुष्याच्या अंगीं कांहीं विशेष गुण न मानितां तो दुसऱ्या एखाद्या प्राण्याच्या अंगीं आहे अशी कल्पना केली, तर केवढा अनर्थ संभवेल? आपल्या अंगीं कांहीं विशेष गुण नसता तर आपण मनुष्य इतर प्राण्यांच्या किती अंकीत झालों असतों, सिंह व्याघ्रांसारख्या हिंसक पशूंनीं रोज किती माणसें खाल्लीं असतीं! खरोखर असा विचार केला तर मोठा प्रलयच झाला असता असें वाटतें. परंतु तसा अनर्थ झाला नाहीं याचें कारण त्यांच्या अंगीं आपण मागें मानल्याप्रमाणें कांहीं विशेष गुण नाहीं; कारण

सिंहव्याघ्रादिकांस आपण बंदुकीनें किंवा इतर कांहीं युक्तीनें मारूं शकतों. आणि याप्रमाणेंच इतर सर्व प्राण्यांची गोष्ट आहे. ह्मणजे मनुष्य सर्वांस जिंकितो परंतु मनुष्यास जिंकणारा ईश्वराखेरीज दुसरा कोणी नाहीं. यावरून सहज कोणी सांगेल कीं, प्राणिवर्गामध्यें मनुष्य श्रेष्ठ आहे. तर हा श्रेष्ठ कशानें झाला, याच्या अंगीं कोणता विशेष गुण आहे? असा प्रश्न सहज निघेल.

पहा प्रत्येक प्राणिमात्राच्या अंगीं परमेश्वरानें जें सामर्थ्य दिलें आहे त्या सामर्थ्याच्या बाहेर कोणालाही कांहीं करितां येत नाहीं; हें जरी खरें आहे, तरी मनुष्याची इतर प्राण्यांशीं तुलना करून पाहिली असतां तो पुष्कळ अंशीं स्वतंत्र आहे, आणि इतर प्राणी परमेश्वराचे केवळ बांधलेलेच आहेत असें ह्मटलें तरी चालेल. ह्मणजे परमेश्वरानें इतर प्राण्यांस जे मार्ग लावून दिले आहेत त्यांच्या बाहेर त्यांस जातां येत नाहीं, तथापि त्यांस त्यांच्या गरजेप्रमाणें पुष्कळ सोईच्या गोष्टी जन्मतःच दिल्या असतात. आणि त्या सर्वांच्या सोई बहुतकरून निरनिराळ्या आहेत. सिंह, वाघ वगैरे हिंसक पशूंस भयंकर नखें आणि दांत दिलेले आहेत त्यांच्या योगानें ते आपलें भक्ष्य मिळवितात. गाय बैल इत्यादि पाळींव पशूंस शिंगें दिलीं आहेत त्यांच्या योगानें ते इतर प्राण्यांपासून आपलें संरक्षण करितात. पक्ष्यांस पंख दिले आहेत त्यामुळें ते उडतात, आणि आपलें भक्ष्य शोधून तें आपल्या चोंचींनीं आपल्या घरट्यांत आणितात. विंचू आदिकरून क्षुद्र जीवांस तीक्ष्ण नांगी दिली आहे. तसेंच कांहीं प्राण्यांस थंडींत रहावें लागतें आणि थंडीपासून त्यांचे निवारण व्हावें ह्मणून जन्मतःच त्यांस लोंकर दिलेली असते. मासे आदीकरून जलधिज प्राण्यांचे अंगास चरबी आणि तेल हीं जन्मतःच लाव-

लेलीं असतात. अशा प्रकारें सर्वांस कांहींना कांहीं परमेश्वरानें सोय दिलीच आहे आणि त्या सोईच्या मानानें जगांत वागण्याचे मार्गही लावून दिलेले आहेत. त्यांबाहेर त्यांस कधींही जातां येत नाहीं. उदाहरणार्थ माशांनीं पाण्यांत राहण्याचें टाकून जमिनीवर येण्यांस इच्छिलें तर त्यांस येतां येईल काय? किंवा हर प्रयासानें आले तरी ते जमिनीवर जगतील काय? कधीं नाहीं. तथापि असें जरी करतां येणार नाहीं तरी परमेश्वराची त्यांजवर केवढी कृपा समजावयाची? एकंदरींत पाहिलें असतां त्यांस किती साधनें दिलीं आहेत? तशीं मनुष्यास दिलीं आहेत काय? नाहीं. तर मग परमेश्वराचा मनुष्य जातीवर कोपच ह्मणावयाचा; परंतु असें नाहीं. नीट विचार करून पाहिलें असतां असें वाटतें कीं, परमेश्वरानें आपणांस एखादें मोठें साधन दिलें असावें; कारण ज्या ज्या सोई आणि जीं जीं साधनें त्यानें इतर प्राण्यांस दिलीं आहेत त्या सर्वांचा उपभोग मनुष्य घेतो येवढेंच नव्हे तर इतर सर्व प्राण्यांवर आपलें वर्चस्व मिरवितो. माशांप्रमाणें पोहूं शकतो; पक्ष्यांप्रमाणें विमानाच्या सहाय्यानें हवेंत उडूं शकतो; आणि सूत, लोंकर व रेशीम यांचीं वस्त्रें विणून थंड देशांत राहूं शकतो; तर या गोष्टींस लागणारीं साधनें परमेश्वरानें जन्मतःच मनुष्याबरोबर पाठविलीं आहेत काय? अहाहा! किती विस्मयकारक गोष्ट आहे कीं, मनुष्य हा प्राणी उघडा नागडा केवळ मांसाचा गोळा जन्मून परमेश्वरानें आयतें कांहीं एक न देतां तो आपणास सर्व साधनें करून घेतो! मग तीं करितो कशानें या बद्दल विचार केला असतां सहजच लक्षांत येतें कीं, तो आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व कल्पनेनें तीं करितो. असें जर आहे तर बुद्धि ही परमेश्वरानें केवढी देणगी मनुष्यास दिली

आहे कीं, ज्या देणगीच्या योगानें तो सर्व प्राण्यांस मागें टाकितो; आपणास हवें तसे ऐषआरामाचे पदार्थ करितो, अतिशय रुचकर अन्नें तयार करूं शकतो, हवीं तशीं सुखकारक वस्त्रें विणून तीं पांघरतो, हव्या त्या देशांत राहूं शकतो आणि सर्व प्राण्यांवर आपलें वर्चस्व मिरवितो. येवढेंच नव्हे तर त्यानें पंचमहाभूतें देखील आपलीं चाकर करून ठेविलीं आहेत. विजेच्या योगानें क्षणांत लांब अंतरावर बातमी पोंचवितो वाफेच्या योगानें आगबोटी, आगगाड्या वगैरे चालवितो. वाऱ्याच्या सहायानें इष्टदिशेस गलबतें नेतो, तसेंच पवनचक्की पानचक्की यांचे सहायानें हजारों माणसांचें काम एकटा करितो. ह्या व अशा अनेक प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी बुद्धिसामर्थ्यानें मनुष्यास करितां येतात. ही परमेश्वराची अमोलीक देणगी जी बुद्धि ती आपणास दिल्याबद्दल आपण त्याचे किती आभार मानले पाहिजेत बरें? व त्यास वारंवार किती पूज्य बुद्धीनें स्मरलें पाहिजे बरें! येवढेंच नव्हे तर इतक्या मौल्यवान देणगीचा उपयोग आपणास नेहमीं सत्कृत्यांकडेसच केला पाहिजे. असो बुद्धिसामर्थ्याच्या योगानें मनुष्यास आलेलें श्रेष्ठत्व एकीकडे ठेवून पुन्हा थोडेसे मागें वळूं.

आतां मनुष्य ह्मणजे काय हें आपणास सहज सांगतां येईल, व तें आपण वरील गोष्टीच्या अनुरोधानें असें सांगूं कीं ज्यास पांच कर्मेंद्रियें व पांच ज्ञानेंद्रियें असून ज्यास बुद्धि आहे त्यास मनुष्य म्हणावें. ही व्याख्या सृष्टिक्रमाप्रमाणें खरी मानतां येईल; परंतु व्यवहारदृष्ट्या येवढ्यानेंच केवळ पूर्तता होणार नाहीं.

कारण कल्पना करा कीं आपण कांहीं कृत्य केल्यामुळें आपणास कोणी जमीन इनाम दिली आहे; तर आपलें असें कर्तव्य आहे कीं तींत धान्य पिकविलें पाहिजे किंवा तिचा

दुसरा एखादा योग्य उपयोग केला पाहिजे; आणि असें कांहीं आपण केलें तरच ती आपणास इनाम दिल्याचें सार्थक आहे. आपण जर चांगल्या प्रकारें तिचा उपयोग न करूं तर ती आपणास मिळून व न मिळून सारखीच. आपण तिची वहिवाट न केल्यामुळें तिजवर आपलें स्वामित्व सुद्धां रहाणार नाहीं; आणि इनाम देणाराचा इष्ट हेतु साधणार नाहीं. कारण त्या जमिनीचा योग्य उपयोग आपण घ्यावा असा इनाम देणाराचा हेतु असतो. तो न घेतल्यामुळें अर्थशास्त्रदृष्ट्या आपण पुष्कळांचें नुकसान करतों, व थोड्याशा नीचत्वासही पात्र होतों; कारण आपण जमीन घेतल्यामुळें जमीन देणारास स्वतः तिचा उपभोग घेतां येत नाहीं, आपण स्वतःही घेत नाहीं व त्यानें जर ती दुसऱ्या एकाद्यास दिली असती तर त्यानें आपलें उदरपोषण केलें असतें, परंतु तसेंही होऊं शकत नाहीं. सारांष आपणास कोणीं दिलेल्या वस्तूचा आपण योग्य उपयोग न केला ह्मणजे दातृत्वाचें सार्थक न होऊन दुसऱ्याचा लाभ अंतरून आपण मूर्खत्वास पात्र होतों. तर अशीच गोष्ट आपल्या बुद्धीची आहे. परमेश्वरानें मनुष्यास बुद्धी दिली असून जर तिचा त्यानें योग्य उपयोग न केला तर त्यास ती दिली असून नसून सारखेंच आहे. व्यवहारदृष्ट्या मागें सांगितल्याप्रमाणें तो मनुष्यत्वास पात्र होणार नाहीं; ह्मणजे ज्यांस बुद्धि नाहीं अशा पशुपक्ष्यांदिकांत त्याची गणना केली तरी चालेल. कारण असें कीं त्याला ओळखण्याची विशेष खूण जी त्याच्या आंगची बुद्धि हिचा जर तो व्यवहारांत चांगला उपयोग करील तरच तो मनुष्य, नाहींतर बुद्धि असूनही जर तो पशूंप्रमाणें वागूं लागला व तिचा कांहीं नीट उपयोग करीत नाहींसा झाला तर त्यास पशूच कां म्हणूं नये ? आणि बुद्धि असूनही जर तो पशूसारखा वागूं लागला तर

असें वाटतें कीं त्यास पशूपेक्षांही पशू ( नीच ) असें म्हटलें असतां बाध येणार नाहीं.

आतां कोणी म्हणेल कीं बुद्धीचा चांगला उपयोग तरी काय? आणि तो करावयाचा कसा? तर याचें उत्तर एकच नव्हे; अनेक आहेत. तर सर्व व्यापक असें उत्तर देण्यास पहिल्यानें एक दोन उदाहरणें देऊन बुद्धीचा चांगला उपयोग आणि वाईट उपयोग या विषयीं सांगितलें पाहिजे.

पहा ज्या वेळेस मागील महाराज मल्हारराव गायकवाड हे दिवाणे ठरून गादीचे नालायक झाले त्यावेळेस गायकवाड सरकारचें राज्य निवारशी होतें, ह्मणजे मल्हाररावांचे वडील बंधू महाराज खंडेराव यांस पुत्रसंतान नसल्यामुळें ते कैलासवासी झाल्यावर महाराज मल्हारराव यांस गादी मिळाली होती व पुढें मल्हारराव यांजकडून जेव्हां इंग्रज सरकारानीं राज्याधिकार घेतला त्या वेळेस मल्हारराव यासही कांहीं संतान नव्हते तेव्हां गायकवाडाची गादी कोणास द्यावी हा मोठा विचार पडला. व पुढें बडोद्यांतील इंग्लिश अंमलदार व सरकारचे जुने कारभारी यांचें मतें असें ठरलें कीं वडील बंधू खंडेराव यांची पत्नी राणीसाहेब जन्माबाई यांचे मांडीवर गायकवादाचे वंशांतील दत्तक पुत्र घ्यावा व त्याजला गादीवर बसवावें. वाचकहो! विचार करा कीं, या वेळेस कोणाचें भाग्य उदयास यावयाचें होतें व तें पुढें आलें. खरोखर परमेश्वराची करणी अगाध आहे! मनुष्य एका क्षणांत रंकाचा राव व रावाचा रंक आपल्या नशीबाच्या आणि पूर्व पुण्याईच्या व पापाच्या जोरावर होतो असें जें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. हल्लींचे प्रसिद्ध श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांस तें राज्य मिळालें. हे पूर्वी अतिशय गरीब स्थितींत होते व यांच्या एकंदर कुटुंबाची स्थिति इतकी वाईट होती कीं ती

ह्मणावी तितकी थोडीच असें सांगतात. सारांश ते हल्लींच्या वैभवास पोंचतील असें त्यांच्या स्वप्नींसुद्धां नसेल परंतु त्यांच्या सुदैवानें व पूर्व पुण्याईच्या जोरानें व विशेषें करून गायकवाडाच्या वंशांत उत्पन्न झाले असल्या कारणानें त्यांस दत्तक घेवून हें राजपद मिळालें. तर ह्या राजपदाच्या जोरावर त्यांनीं आपल्या अधिकाराचा उपयोग कसा करावा? हल्लीं जसे नीतीनें वागतात तसें न वागतां प्रजेवर जुलूम करावा! अनपराधी लोकांस व्यर्थ बंदींत टाकावें! दानधर्म करूं नये! पक्षपाती व्हावें! आणि खुशाल निर्भयपणें ऐषआराम करावा! असें कोणी ह्मणेल काय? खरोखर कोणी नाहीं. प्रजा सुखी राहील अशाच तऱ्हेनें त्यांनीं सर्व कारभार चालविला पाहिजे. फार लांब जाण्यास नको. आपल्या दयाळू इंग्रज सरकारानें आपणा प्रजेपैकीं कांहीं प्रजेस दुष्ट व हिंसक प्राणी वगैरेपासून आपलें संरक्षण करून घेण्यासाठीं तरवारी बंदुका वगैरे हत्यारें वापरण्याचे परवानें दिले आहेत तर त्यांनीं निरापराधी व गरीब प्राण्यांवर उगाच हात टाकावा काय? ते जर कदाचित् आपणावरच उठले तर आपण त्यांस किती दुष्ट घातकी व अन्यायी ह्मणूं? शिवाय त्यांनीं आपल्या परवान्यांचा वाईट उपयोग केला असें ह्मणून त्यांस दोष देऊं. आणि सरकारानें अशांस परवाना व्यर्थ दिला असेंही आपण ह्मणूं. तर हीच गोष्ट प्रत्येक मनुष्यास लागू आहे ह्मणजे परमेश्वरानें दयाळूपणानें दिलेलें बुद्धिसामर्थ्य जर आपण इतरांचे घात करण्याकडे लाविलें आणि सन्मार्ग सोडून बाजूला वळलों तर आपण आपल्या बुद्धिरूप शस्त्राचा दुरुपयोग केला असें होईल. यावरून आपल्या सहज लक्षांत येईल कीं बुद्धीचा चांगला उपयोग करणें ह्मणजे ती सत्कृत्याकडे लावणें हें होय.

वाचं - ८

आतां कोणी अशी शंका काढील कीं मनुष्य जें जें करितो तें तें त्यास चांगलें वाटतें आणि आवडतें ह्मणूनच करितो, ह्मणजे त्याच्या समजुतीप्रमाणें तो आपल्या बुद्धीचा उपयोग चांगल्या कृत्यांकडेसच करितो. आणि यावरून एकंदर पाहिलें असतां जगांत ज्या ज्या गोष्टी घडतात त्या त्या चांगल्याच होतात असें म्हटलें पाहिजे; परंतु खरोखर असें नव्हे, तर

॥ जनीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें ॥
॥ जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥ १ ॥

रामदास.

या सत्पुरुषाच्या उक्तीचा विचार केला असतां साधारणतः ज्या गोष्टी जगास आवडतात त्या सत्कृत्यांत गणल्या जातात. ज्या जगास आवडत नाहींत त्या दुष्कृत्यांत गणल्या जातात.

चोर एखाद्याचें घर फोडून चोरी करतो ती त्याला चांगली वाटते, परंतु तो ती कधीं लोकांचे देखत करितो काय? कधीं नाहीं. याचे कारण येवढेंच कीं, जरी त्याला चोरी आवडते आणि जरी तो ती नेहमीं करितो तरी ती लोकांना आवडत नाहीं; चोरी करणें हें निंद्यकर्म आहे हें तो पूर्णपणें समजतो. कारण त्याचें अंतःकरण किंवा ज्यास आपण सद्सद्विवेक बुद्धि ह्मणून म्हणतों तें नेहमीं त्यास सांगत असतें कीं बाबा हें कृत्य वाईट आहे व जगांत निंद्य आहे, तूं तें करूं नको; ह्मणून चोरी करणारा नेहमीं ती लोकांच्या नकळत करितो. यावरून सत्कृत्याची व दुष्कृत्याची परीक्षा येवढीच कीं दुष्कृत्य हें लोकांमध्यें निंद्य असतें व अंतःकरणही तें निंद्य आहे असें सांगतें, ह्मणजे तें न करण्याविषयीं आपणास सुचवीत असतें. अर्थात तें करण्याविषयीं आपणास एकाएकी

प्रवृत्त होऊं देत नाहीं. तर अशीं जीं दुष्कृत्यें तीं करण्याकडे मनुष्यानें आपल्या बुद्धीचा उपयोग करूं नये. म्हणजे बाकीचीं जीं कृत्यें मनुष्य करितो तीं सर्वच चांगलीं आहेत असें दिसून येईल.

याला दुसरें प्रत्यंतर पहा. धर्माच्या विरुद्ध मद्य प्राशन करणारे जे असतात त्यांतून कित्येक तें आपणांस आवडतें म्हणून करितात, कित्येक आपल्या प्रकृतीस मानवतें म्हणून करितात आणि एकंदरींत कांहींना कांहीं कारणानें ते मद्यपान चागलें असें म्हणतात. परंतु असें तुम्हीं कधीं पाहिलें आहे काय किंवा निदान ऐकिलें तरी आहे काय कीं मद्यपान चांगलें म्हणून कोणी एका मद्यपान करणाऱ्या गृहस्थानें मद्याचा पेला आपल्या मुलास पिण्याकरितां दिला किंवा त्याला मद्यपान केलें तरी हरकत नाहीं तूं तें करीत जा असें सांगितलें; एवढें सुद्धां नको तो गृहस्थ विचारी असेल तर आपल्या मुलाच्या देखत एकवार तरी मद्य म्हणून तें पिईल काय? फार कशाला तो गृहस्थ आपल्या मुलाच्या देखत मद्यपान चांगलें असें दुसऱ्यास देखील म्हणणार नाहीं. व आपल्या मुलास आपल्या कृत्याची ओळखही देणार नाहीं. दुसरें असें कीं तो जरी मद्यपान करितो तरी तें जगाच्या देखत करीत नाहीं. मग मद्यपान जर तो चांगलें म्हणतो तर सर्व लोकांच्या देखत करण्यास त्यास काय हरकत आहे? व तसेंच आपल्या मुलास मद्याचा पेला पिण्यास सांगण्यास काय हरकत आहे? परंतु तो समजतो कीं, मद्यपान करणें हें जगांत निंद्य आहे आणि तें करण्यास जरी तो स्वतः प्रवृत्त होतो तरी तें आपल्या मुलास करावयास सांगण्यास त्याला धीर होत नाहीं. कारण त्याची इच्छा असते कीं, माझ्या मुलानें मद्यपी होऊं नये. तर या त्याच्या वर्तणुकीवरून मद्यपान वाईट असें जर

[stamp]

तो आपल्या तोंडानेंच प्रत्यक्ष ह्मणत नाहीं तरी तें वाईट आहे असें लोकांस आपल्या वर्तनावरून दर्शवितो. सारांश कोणीही मनुष्य कबूल करील कीं एकाद्या वस्तूच्या उपयोगाचा चांगलेपणा किंवा वाईटपणा यांचा निर्बंध उपयोग करणाऱ्या गृहस्थाच्या ह्मणण्यावरूनच नेहमीं करितां येत नाहीं तर त्याच्या किंवा आपल्या सदसद्विवेक बुद्ध्यनुसार वर्तनावरून व जगाच्या अभिप्रायावरून करावा लागतो.

असो सत्कृत्य ह्मणजे काय हे आपणास वरील गोष्टींच्या अनुरोधानें चांगलें समजलें आणि परमेश्वरानें दिलेली अमोलिक देणगी जी बुद्धि तिचा उपयोग आपणास सत्कृत्याकडे केला पाहिजे ही ही गोष्ट प्रत्येक इसमास मान्य असेल यांत संशय नाहीं. एकंदरींत जरी सत्कृत्याची व दुष्कृत्याची परीक्षा करण्याचा मार्ग आपणास समजला तरी प्रत्येक गोष्ट करतेवेळेस वर सांगितल्याप्रमाणें वागतां येते असें नाहीं. बहुतकरून जें जें आपणास ह्या जगांत करणें असतें तें तें केवळ आपल्या स्वतःच्या विचारावर करावें लागतें आणि अमुक गोष्ट केली तर जग बरें ह्मणेल किंवा नाहीं त्याची साक्ष आपलें अंतःकरणच आपणास देत असतें. आणि जे लोक दूरदर्शी व विचारी असतात ते आपल्या सदसद्विवेक बुद्धीविरुद्ध पाऊल टाकण्यास कधींहि धजत नाहींत. यामुळें त्यांचे हातून निंद्य अशीं कृत्यें कधीं होत नाहींत. आतां मनुष्य बाल्यावस्थेंत असतां ज्या ज्या गोष्टी करितो त्या सर्व भोंवतालच्या मंडळींचें अनुकरण करून किंवा तीं सांगेल तसें ऐकून तो करितो, त्यांजबद्दल त्याजवर कांहींच जबाबदारी नसते. तथापि कोणी ह्मणेल कीं वयांत आल्यावर मनुष्य जें जें करितो त्याबद्दलही जबाबदारी त्याजवर नसते. कारण भोंवतालची मंडळी लहानपणीं ज्या दिशेकडे त्याची

बुद्धि वळवील त्या दिशेकडेसच ती मोठेपणीं वळून वृद्धिंगत होत जाईल; परंतु हें ह्मणणें आपणास सर्वांशीं कबूल करितां येणार नाहीं. कारण वयां आल्यावर प्रत्येकास एक प्रकारचें बुद्धिस्वातंत्र्य येतें. आणि त्याप्रमाणें तो आपणास बहुत करून वागवितो. असें जर नसेल तर जगांतील सद्गुणी किंवा दुर्गुणी मनुष्यें त्यांच्या कुटुंबांतील सन्मार्गाच्या किंवा दुर्मार्गाच्या चाली रीतीप्रमाणें तशीं निपजलीं असतीं. परंतु खरोखर पाहिलें तर अशी स्थिति बहुधा नसते; कारण एखाद्या दुर्व्यसनी व अशिक्षित मनुष्याचा मुलगा नीतिमान व विद्वान निपजून सन्मान्य होतो, किंवा एखाद्या अब्रूदार मनुष्याचा मुलगा त्याच्या नांवास बट्टा आणण्यासारखा बदफैलीही निपजतो. ह्मणून कुटुंबाच्या चालीरीतीप्रमाणेंच मनुष्य पुढें निपजतो असें जर असतें तर अशा प्रकारच्या विरोधी वर्तनाचीं मनुष्यें एकाच कुटुंबांत कधींहि निपजलीं नसतीं व कुटुंबांतील एकच रीतभात कित्येक पिढ्यांपर्यंत जशीच्या तशीच राहिली असती. परंतु ज्यापेक्षां असें होत नाहीं त्यापेक्षां पुष्कळ अंशीं हें खरें कीं मनुष्य वयांत आल्यावर आपल्या बुद्धिस्वातंत्र्याप्रमाणें आपणास वागवितो, ह्मणजे विशेषेंकरून त्याच्या इच्छेनुरूप सर्व कृत्यें करण्याकरितां होईल तितका तो झटतो.

अशा कृत्यांचे आपणास दोन विभाग करितां येतील. एका विभागाखालीं मनुष्यास आपल्या आयुष्यक्रमांत जरूर कराव्याच लागतात त्या गोष्टी, व दुसऱ्या विभागाखालीं ज्या गोष्टी तो आपले आवडीप्रमाणें करितो त्या. हे जे दोन विभाग सांगितले या दोहोंमध्येंहि आयुष्यक्रमांतील कांहीं गोष्टी येतात; व कांहीं गोष्टी अशा आहेत कीं त्या एका

विभागांत मोडत असून त्यांचा दुसऱ्या विभागाशीं कांहींच संबंध नसतो. पहिल्या तऱ्हेच्या गोष्टींचें उदाहरण उदरनिर्वाह करणें हें होय. ही गोष्ट जरी पहिल्या विभागांत सांगितल्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यास जरूर करावीच लागते तरी दुसऱ्या विभागांत सांगितल्याप्रमाणें तोच उदरनिर्वाह आपल्या आवडीप्रमाणें अन्नानें धन संपादन करून किंवा चोरी करूनही मनुष्य करितो. दुसऱ्या तऱ्हेच्या गोष्टींचें उदाहरण म्हटलें ह्मणजे दानधर्म परोपकार करणें हें होय. कारण मनुष्यास वाटेल तर तो दानधर्म परोपकार वगैरे करितो, परंतु पहिल्या विभागांत सांगितल्याप्रमाणें उदरनिर्वासारखें दानधर्म करणें त्यास भाग पडतेंच असें नाहीं.

आमचा प्रस्तुतचा विषय जो "मनुष्याचीं कर्तव्यकर्मे" तो दुसऱ्या विभागाच्या गोष्टींखालीं येतो. कारण ज्या गोष्टी प्रत्येक मनुष्यास आपल्या आयुष्यक्रमांत जरूर कराव्याच लागतात ह्मणजे ज्या न केल्या तर त्याचें जीवित राहणें कठीण त्या तो करितोच करितो त्याबद्दल येथें कांहीं लिहिण्याचें कारण नाहीं. परंतु त्याच अवश्य गोष्टी तो सन्मार्गानें किंवा दुर्मार्गानें करितो किंवा ज्या गोष्टी करण्याची त्यास गरज नसतां तो केवळ परोपकार बुद्धीनें किंवा आपल्या विशेष कल्याणाकरितां करितो त्या गोष्टींविषयीं अर्थात त्याच्या कर्तव्यकर्माविषयीं आपणास विचार करावयाचा आहे.

कर्तव्यकर्म या शब्दाचा अर्थ त्या शब्दामध्येंच उघड आहे. ह्मणजे करावयास जे अवश्य व योग्य तें कर्तव्यकर्म. अशीं कर्तव्यकर्में प्रत्येक मनुष्यास त्याच्या आयुष्यभर करावयाचीं असतात. मग तो कोणत्याही स्थितींत असो. कोणी राजा असेल तर राजनीतीप्रमाणें प्रजापालनादि त्याचीं कर्तव्य-

करणें असतात. राजाची आज्ञा मानणें वगैरे कर्तव्यकर्में प्रजेस करावीं लागतात. त्याच प्रमाणें बापलेकांची, नवराबायकोचीं, स्नेहीसोबत्यांचीं, अशीं परस्परांविषयीं परस्परांस आपल्या स्थितीप्रमाणें कर्तव्यकर्में करणें असतात. ह्मणजे ज्याचा ह्मणून परस्परांशीं कांहीं संबंध आहे, त्यास त्या संबंधाप्रमाणें निरनिराळ्या प्रसंगीं कांहीं विवक्षित रीतीनें वागलें पाहिजे. उदाहरणार्थ आपण संगतिसोबतीनें कोठें जात असतां आपणापैकीं एकादा इसम घेरी येऊन पडला व त्यामुळें त्यास जखम झाली तर आपलें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म त्यास त्या प्रसंगीं योग्य मदत करण्याचें आहे; ह्मणजे आपणास ताबडतोब त्याचा रक्तप्रवाह बंद होईल असा इलाज केला पाहिजे, औषध आणून लाविलें पाहिजे व त्यास सुस्थळीं नेलें पाहिजे. तसेंच आपल्या वडील मनुष्यांनीं "विचार केल्याशिवाय कोणतेंही काम करूनये." असें सांगितलें, तर असें शिकविण्याविषयीं त्यांचा धर्म आहे, व आपण त्यांचा उपदेश ऐकणें हें आपलें कर्तव्य आहे. हीं जशीं परस्पर संबंधाचीं कर्तव्यकर्में आहेत तशीं आपलीं आपणाविषयीं कांहीं कर्तव्यकर्में आहेत. बऱ्यावाईटाचा विचार करावा, सन्मार्गानें चालावें, सद्बुद्धि धरावी, शरीरप्रकृतीस जपावें, व उत्तरोत्तर ज्ञानसंपादन करावें हीं आपलीं कर्तव्यकर्में आपणास करावीं लागतात. अशीं अनेक प्रकारचीं कर्तव्यकर्में करण्याविषयीं प्रत्येकानें निश्चय केला पाहिजे. हा निश्चय इतका दृढ असला पाहिजे कीं, प्रसंगानुसार आपणास जीं जीं कर्तव्यकर्में करावयाचीं असतात, तीं तीं करण्याविषयीं आपली बुद्धि स्वाभावीकच व्हावी. आपणास ऊन लागलें ह्मणजे जसें सावलींत जावेंसें वाटतें किंवा भूक लागली ह्मणजे जसें खावेंसें वाटतें तसें योग्यवेळीं आपलें कर्तव्य करण्याविषयीं आपणास लाग-

लीच इच्छा झाली पाहिजे. आपणास आयुष्यांत इतकीं कर्तव्यकर्मे आहेत कीं, आपल्या आयुष्यांतील एकंदर वर्तणुक कर्तव्यकर्मरूपी कड्यांची साखळीच आहे. कर्तव्यकर्म हें अमुकएक विवक्षित कृत्य विवक्षितकाळीं करणें असतें असेंच नाहीं. तर तें सदोदित चालू असावें लागतें. व्यवहार दृष्ट्या अगदीं रिकामें बसलों तरी रिकामपणीं सुद्धां कोणास उपद्रव करावयाचा नाहीं, हें एक कर्तव्यकर्मच आहे. उदाहरणार्थ आपण रिकामें बसलों आणि सदोदित उद्योग करण्याचें जें आपलें कर्तव्यकर्म तें केलें नाहीं हें ह्मणणें बरोबर होईल. तथापि आपण कोणास उपद्रव देऊंनये हें जें आपलें कर्तव्यकर्म तें आपण केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां कांहींएक काम केल्याशिवाय अथवा कोणताही एकादा उघड व्यवसाय केल्याशिवाय वेळ व्यर्थ घालविला असतांना, कर्तृवाचक शब्दाचा आपण उपयोग करतों ह्मणजे उपद्रव न देण्याविषयीं कर्तव्यकर्म केलें असें म्हणतों हें कसें अशी कोणी शंका घेईल; परंतु थोडा विचार केला ह्मणजे वाटेल कीं सर्व कर्मांस कारणीभूत आपलें मन असतें. मनांत एकादी प्रेरणा झाल्याशिवाय कोणाचे हातून कांहीं कृत्य होत नाहीं. तसेंच मनाचे विचार हे जागृतावस्थेंत सदोदित चालू असतात, व तेच विचार कधीं कधीं लोकांस उपद्रव देण्यास कारण होतात. तर अशा विचारांकडे आपलें मन जाऊ दिलें नाहीं, अर्थात मनाचे विकार लोकोपद्रवाकडे न जाऊ देण्याविषयीं मनावर आपण आवरण घातलें, ह्मणजे मनाचे ठिकाणीं तरी कांहीं क्रिया केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. यावरून रिकामें बसून सुद्धां कांहीं कर्तव्य (negative duty) केलें असें होतें. सारांश मनाचे ठिकाणीं कांहीं तरी क्रिया सदोदित चालू असते; आणि ती क्रिया आपली सदसद्विवेक बुद्धि

सांगेल त्याप्रमाणें सन्मार्गानें केली ह्मणजे आपण आपलें इष्ट कर्तव्य कर्म केलें असें होईल. सदसद्विवेकबुद्धीशीं कर्तव्यकर्माचा इतका निकट संबंध आहे कीं, ती असल्याशिवाय वेळोवेळीं आपलें खरें कर्तव्य कोणतें हें आपणांस कळणार नाहीं. मनाचे ठिकाणीं बरे वाईट विचार नेहमीं चालू असतात; व त्यांच्या ओघाप्रमाणें मन आपणास वागण्यास प्रवृत्त करतें; परंतु सदसद्विवेकरूपी न्यायदेवता त्यांची निवड करून व त्यांच्या परिणामाकडे आपलें लक्ष पोंचवून आपणास योग्य मार्गास लाविते. आणि त्या मार्गानें चालून आपणास जें करावें लागतें तें आपलें कर्तव्यकर्म होय. तर अशीं जीं कर्तव्यकर्में आहेत तीं शक्त्यनुसार सांगतों.

प्रत्येक मनुष्यास समजूं लागल्यापासून सुखाची आवड फार असते. मनुष्य आपल्या आयुष्यांत जितके उद्योग करतो तितक्यांनें इच्छित पर्यवसान सुख असतें. आणि कोणताही उद्योग करण्यापूर्वी त्याचे विचार उद्योगाचे परिणामाकडे जात असतात. सुख संपादन करण्याकरितां त्याचे स्वाधीन जितक्या गोष्टी असतात तितक्या तो हरप्रयत्नानें करीत असतो. सुखाचे अनेक मार्ग आहेत. ते मार्ग प्रत्येकजण आपल्या आवडीप्रमाणें धरितो. कोणास द्रव्य संचयाचे योगानें सुख होतें, कोणास शरीरसामर्थ्याचे योगानें सुख होतें, कोणास दानधर्म परोपकार वगैरे केल्यानें सुख होतें किंवा कोणास केवळ योगसाधन करून सुख होतें. तर असे अनेक हेतु ज्या ज्या गोष्टींनीं साधतील त्या त्या गोष्टी प्रत्येकजण करितो. अमुक एक गोष्टीपासून एकास सुख होतें तर त्याच गोष्टीपासून दुसऱ्यास सुख होईल असा मुळींच नियम नाहीं. कारण (भिन्नरुचिर्हि लोकः) प्रकृतीप्रमाणें प्रत्येकाची रुचि निराळी असते. आतां परमेश्वरीनियमाप्रमाणें किंवा ज्याच्या त्याच्या

उद्योगगांभीर्यमानानें कोणाचे हेतु साधतात किंवा निष्फल होतात. सृष्टींतील व्यवहार सुखावर इतका अवलंबून आहे कीं, सुख हा लोहचुंबक जर मनुष्यास नसता किंवा सुख ह्मणजे काय याची कल्पना जर कांहीं त्यास नसती तर एवढाल्या उलाढाली झाल्या नसत्या. सृष्टिक्रमाप्रमाणें मनुष्य जन्मास आल्यावर किंबहुना जशाचा तसाच लयास जातो. तात्पर्य इतकेंच कीं, सुख जसें उद्योगाचा परिणाम आहे तशी सुखाची इच्छा उद्योगाचें मूळ कारण आहे.

पहा मनुष्य जसा उत्तरोत्तर जगांतील व्यवहार पहात जातो तसतशी उद्योग करण्याविषयींची त्याची इच्छा वाढत जाते आणि आपल्या स्वतःचे अदमासाप्रमाणें जसें आपलें बुद्धिसामर्थ्य किंवा इतर कर्तृत्व असेल त्या मानानें ज्यांत अधिक सुख होईल असा उद्योग तो करूं लागतो. आतां विशेषेंकरून त्याची नजर जरी आपले सुखाकडे असते तरी कोणताही उद्योग आरंभिताना लोकरीतीला अनुसरून आपल्या विचाराचें सुकाणूं त्यास वळवावें लागतें. कारण जगांत सत्कीर्तीची आवड सर्वांस आहे आणि ती संपादिली तरच इतर सुखाची किंमत आहे. लोक जर एकाद्यास तुच्छवत् मानूं लागले तर त्याचे समजुतीप्रमाणें लोक ज्या वेळेस त्यास मान देत होते, त्यावेळचेंच सुख त्यास पुढें तुच्छवत् भासतें हें कोणीही मनुष्य कबूल करील. एकंदरींत त्याचे उद्योगसाफल्याचें जें सुख तें प्रत्यक्ष कमी ज्यास्त न होतां केवळ लोकमताप्रमाणें तें त्यास कमी ज्यास्त वाटूं लागतें हें खरें आहे. ह्मणून कोणताही उद्योग करितांना लोकमत कसें आहे याचा पहिल्यानें प्रत्येकानें विचार करावा. ह्मणजे आपला उद्योग ज्या मानानें जगमान्य किंवा लोकरीतीस अनुसरून असेल त्या मानानें तो प्रत्येकास कीर्तिप्रद होतो. परंतु लोक-

मताची पारख करणें हें फारच कठीण काम आहे. जो उद्योग कांहीं लोक स्तुत्य मानतात त्याचाच इतर लोक उपहास करितात; तशांत अमुक एक उद्योग स्तुत्य मानणारे लोक सुद्धां तो उद्योग करणाऱ्या इसमास त्यांत यश आलें तरच त्यास वाखाणतात नाहींतर अपयश आलें ह्मणजे कधीं कधीं त्याची कुचेष्टा करण्यास कमी करीत नाहींत. याकरितां प्रत्येक इसमाची स्थिति इतर लोकांशीं पाहूं गेलें असतां मोठी चमत्कारिक असते, आणि आपल्या योग्यतेप्रमाणें आपण ज्या मंडळींत वागत असतों त्या सर्वांकडून बरें ह्मणून घेणें फारच थोडयास साधतें. परंतु व्यवरांतील एखाद्या उद्योगांत अपयश आलें तरी तो लोकनिंदेस पात्र होत नाहीं. कारण उद्योगांत यश किंवा अपयश येणें हें केवळ उद्योग करणाऱ्यावरच सर्वथा अवलंबून नसतें, समुद्रांत होडी ढकलिली ह्मणजे ती इच्छित तीरास नेणें हे केवल नावाड्यांचे स्वाधीन नसतें; तिला वादळ वगैरे पुष्कळ अडथळे असतात; परंतु एकादी फुटकी होडी जर नावाडी समुद्रांत ढकलतील व त्यामुळें ती मध्येंच बुडून परतीरास न जाईल तर ते नावाडीलोक निंदेस पात्र होतील. यदा कदाचित जरी त्यांची होडी फुटकी असून सुदैवानें इच्छित स्थळीं पोंचली तरी सुद्धां त्यांच्या अविचाराबद्दल त्यांची निंदा करण्यास लोक कमी करणार नाहींत. तशीच गोष्ट मनुष्याचे उद्योगाची आहे. मनुष्यास प्रत्येक उद्योगास यश येतेंच असें नाहीं. त्याच्या उद्योगांत त्यानें आपलेकडून कोणतेही तऱ्हेची हयगय न केली तरी त्याच्या स्वाधीन नसणाऱ्या गोष्टी त्याच्या यश प्राप्तीमध्यें अडथळा करतात. तथापि यामुळें तो मनुष्य लोकनिंदेस पात्र होत नाहीं. लोक एकाद्याची निंदा त्याच्या दुराचरणामुळेंच फार करितात. मनुष्य

कोणताही धंदा करो; त्यांत त्यास यश येवो किंवा न येवो; परंतु तो सदाचरणी असेल तर त्यास सर्वांपासून चांगलेपणा मिळतो, व तो कीर्तीमान होतो, आणि सत्कीर्तीचा लाभ झाला ह्मणजे तो इतर दुःखास बाजूला टाकतो; आणि त्या कीर्तीपासून सुख पावतो. खरोखर पाहिलें तर मनाचें समाधान हेंच मोठें सुख आहे, आणि हें जर सत्कीर्ति संपादल्यानें होतें तर ती संपादण्याकडे प्रत्येकानें लक्ष्य दिलें पाहिजे. सर्वांकडून बरेपणा मिळविण्यास सदाचरणासारखा दुसरा सुलभ उपाय नाहीं, ह्मणून मनुष्याचें पहिलें कर्तव्यकर्म आपलें आचरण निर्दोष राखण्याविषयीं झटणें किंवा सद्वर्तन ठेवणें हें होय. सद्वर्तन हा असा कांहीं अमोलीक गुण आहे कीं तो संपादन करण्यास जे मनापासून निरभिमानानें यत्न करतात त्यांस अतिसोपा असून सद्वर्तनी मनुष्यास फारच लोकप्रिय करणारा आहे. साधेल त्यास अति सोपा ह्मणजे असा कीं तो संपादण्यास कांहींएक प्रयास करावे लागत नाहींत. ह्मणजे एकादी कला शिकण्यास श्रम घ्यावे लागतात तसे सद्वर्तनी होण्यास लागत नाहींत. तर उलट अमुक प्रकारच्या गोष्टी आपले हातून न होऊं देण्याविषयीं मात्र काळजी घ्यावी लागते. अर्थात अशा गोष्टीं पासून अलिप्त राहावें लागते. आणि हें ज्यांस साधतें त्यांस लोक सद्वर्तनी म्हणतात.

कोणीही मनुष्य कबूल करील कीं मनुष्य निरुपद्रवी असला, ह्मणजे त्याजकडून दुसऱ्याच्या मनास इजा पोंचण्यासारखें कोणतेंही वर्तन न घडलें ह्मणजे तो लोकांस एकाद्या गुणानें जरी विशेष प्रिय झाला नाहीं तरी त्याचा कोणी तिरस्कार करीत नाहींत. पहा कीं एक इसम चोरी, चहाडी व्यभिचार, वगैरे दुर्गुणापासून दूर राहून कोणत्याही प्रकारची

इजा दुसऱ्यास करीत नाहीं तर लोक त्याचा तिटकारा करणार नाहींत. आतां त्याचे अंगीं एखादा मोहक गुण नसला तर लोकांची आपणावर विशेष प्रीति तो बसवूं शकणार नाहीं. तथापि सर्वत्र तो लोकमान्य होईल. परंतु दुसरा असा एक घ्या कीं तो अतिशय परोपकारी असून विद्वानही आहे पण वर लिहिल्यापैकीं एखादा दुर्गुण त्याचे अंगीं आहे. तर मला वाटतें तो फार थोड्यांसच प्रिय होईल. व त्याच्या परोपकाराची व विद्वत्तेची किंमत राहणार नाहीं. कारण अशा मनुष्याच्या दुर्वर्तनापासून लोकांस इजा होईल. अर्थात ह्यापेक्षां पहिल्या प्रकारचा मनुष्य अधिक चांगला असें सर्व ह्मणतील. ह्मणून सद्वर्तन ठेवणें हें मनुष्याचें पहिलें कर्तव्यकर्म आहे. व हें कर्तव्यकर्म जो सदोदित करतो तो लोकांस कधींहि अप्रिय होत नाहीं.

सत्य भाषण करणें हा सद्वर्तनाचा पाया आहे. हा पाया जर मजबूत असेल तर मनुष्याचा वर्तनरूपी इमला ढासळण्याचा फार थोडा संभव रहातो. सत्य भाषण करण्याबद्दल पक्का निग्रह असला ह्मणजे मनुष्य वाईट कृत्य कधींच करणार नाहीं. कारण आपण केलेलें वाईट कृत्य प्रसंगीं आपणास दुसऱ्या जवळ कबूल करावें लागेल. व तें कबूल करून लोकांस कळलें ह्मणजे आपल्या अब्रूस धक्का बसून ते आपली विटंबना आणि निंदा करतील. व जगापासून होणारा फायदा बाजूस राहून उलट अपकीर्तीनें नुकसान होईल; अशी त्यास भीति वाटते. यामुळें उघडपणें चारचौघांस सांगण्यास हरकत नाहीं असेंच काम मनुष्य नेहमीं करतो. याकरितां खरें बोलण्याविषयीं प्रत्येकानें निग्रह करावा. खोटें बोलण्याचा स्वभाव नफा नुकसानीची परवा न बाळगितां मुख्यत्वेंकरून सवयीनें फार बनतो. जे लोक खोटें बोलतात ते केवळ लोकांचें नुक-

सान किंवा आपला फायदा करण्याकरितां सदोदित तसें करितात असें नाहीं. नफानुकसानाचा कांहीं संबंध नसला तरी साहजिक त्यांचे तोंडांतून खोटे शब्द येतात. एकादे इसमानें स्वतः करितां बाजारांतून कांही जिन्नस विकत आणिला व आपण त्यास त्या जिनसाची किंमत विचारिली तर कांहीं कारण नसतांना तो साहजिक त्यांत पैसा दोन पैसे कमीजास्त सांगतो, अशा रीतीनें सर्वच लोक खोटें बोलतात असें नाहीं, परंतु खरोखर जगाचा कांहीं अंशीं कलच असा, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. खोटें बोलण्याची संवय मनुष्यास लहान पणापासून लागते. लहान मुलांचे व्यवसाय क्षुल्लक ह्मणून खोटें बोलण्या पासून होणाऱ्या नुकसानाकडे आईबापांचें किंवा पालकांचें लक्ष जात नाहीं. कधीं कधीं आईबाप स्वतः खोटें बोलतात व त्यांच्या अनुकरणानें त्यांचीं मुलेंही खोटें बोलण्यास शिकतात. कित्येकांनीं असें पाहिलें असेल कीं कोणीं मनुष्य एकाद्या गृहस्थास बोलावूं आला किंवा कांहीं कामाकरितां त्याजकडे आला तर, ' बाबा घरांत नाहींत " ह्मणून सांग असें आपल्या मुलास पुष्कळ इसम शिकवितात. व आपण खोटें बोलून मुलासही खोटें बोलण्यास लावितात. मग पुढें असेंच त्या मुलानें केलें ह्मणजे त्यांजकडे काय दोष आहे बरें! कितीहि नुकसान झालें तरी हरकत नाहीं असें जाणून सत्यापासून न ढळणारे लोक खरोखर विजयी होतात यांत संशय नाहीं. कारण, खरे बोलणाराचे खरेपणाबद्दल कालांतरानें तरी लोकांची खात्री होऊन त्याचे कल्याणाची इच्छाधरून त्याचे बऱ्याकरितां लोक शक्त्यनुसार झटतात. सत्यवादी मनुष्य सर्वांस प्रिय होतो असत्य बोलण्यापासून क्षणभरच फायदा होतो व त्या पासून क्षणिकच सुख होतें. आपण जर एकाद्यास खोटी गोष्ट

सांगितली तरी ती खोटी गोष्ट आहे असें सत्यजेतोपर्यंतच तो आपला मान ठेवील. परंतु तिचा खोटेपणा त्यास कळून आला ह्मणजे आपली त्याजवळ किंमत रहाणार नाहीं. आपण एकादे वेळेस त्यास खरी गोष्ट सांगितली तरी सुद्धां तो ती खोटी मानील. खरी गोष्ट बोलल्यापासून कदाचित आपणास किंवा दुसऱ्यास क्षणभर दुःख होतें ह्मणजे तें खरें बोलण्यापासून होतें असा अर्थ कोणी घेऊनये; तर गोष्टीच्याच दोषीपणामुळें दुःखास कारण होतें. तथापि खरें बोलल्यापासून मन समाधानी राहून आपले सद्वर्तनाविषयीं सुख वाटतें. खोटें बोलणाराची लबाडी कधींनाकधीं दृष्टोत्पत्तीस आल्यावाचून रहात नाहीं. व मागून झालेली उघडकी पहिली पेक्षां फारच मोठा घात करिते. कोणी एका गृहस्थाकडे एक गवळी दुधाचा रतीब देत असे. आपल्याधंद्यांत फायदा व्हावा ह्मणून त्यानें दुधांत पाणी मिसळून दूध पाणचट लागूनये ह्मणून त्यांत थोडी साखर मिळवावी. हा क्रम पुष्कळ दिवस चालला. दूध चवदार लागतें, परंतु पोराबाळास बाधतें याचें कारण काय ह्मणून त्या गृहस्थानें गवळ्यास दोन चार वेळां विचारिलें. गवळ्यानें शपथ वाहून खात्रीपूर्वक सांगितलें कीं " रावसाहेब आपल्या घरीं मी विशेष काळजीनें ताजें दूध देतों. " कर्म धर्म संयोग असा कीं एक दिवस त्या गवळ्याची दुधाची चरवी सांडली; आणि दूध जिरतें नाहीं जिरतें तोंच त्या दूध सांडल्या ठिकाणीं पुष्कळ मुंग्या आल्या; त्यांजवर त्या गृहस्थाची नजर जाऊन त्याला गवळ्याचें लबाडीबद्दल पक्का संशय आला. मग त्यानें त्या गवळ्याचे दुधाची योग्य पारख करवून आपला संशय फेडिला. नंतर गवळ्यास दम दपडशा दिल्यावर गवळ्यानें आपलें कृत्य कबूल केलें व यथान्याय त्यास शासनही मिळालें. मग

आदे.

त्यांच्या अविश्वासूपणाची सर्वांस माहिती होऊन त्याचा धंदा अगदीं बुडाला. तात्पर्य आपलें खोटें कृत्य जर तो गवळी त्या गृहस्थास पहिल्यानें कबूल करता, तर फार झालें तर त्या गृहस्थाकडील रतीब बंद होण्यापेक्षां जास्त शासन त्यास झालें नसतें; त्या गृहस्थाकडील रतिब बंद झाला असता तरी त्यास दुसरीकडे तो चालू करता आला असता. परंतु त्याच्या लबाडीची पुनरावृत्ति फार वेळ झाल्यामुळें व खोटें बोलण्यामुळें त्याचें सद्योदितचें नुकसान झालें. याप्रकारचीं अनेक उदाहरणें व्यवहारांत प्रत्येकाचे नजरेस आलीं असतील अस्तु. आपले हातून एखादा अन्याय घडला तर शासन चुकविण्याकरितां किंवा दोष न येऊं देण्याकरितां खोटें बोलावयाचें नाहीं, असा प्रत्येकाचा निश्चय असावा. व असा निश्चय असला ह्मणजे बहुतकरून अन्याय घडणार नाहीं. सत्याची आवड ही आपल्या वर्तनास चाबूकच आहे. आपलें वाईट वर्तन लोकांस सांगण्यास स्वभावतः लाज वाटते. याकरितां सत्याची आवड असली ह्मणजे लोकांत चांगलेपणा मिळविण्याकरितां व दोष न येऊं देण्याकरितां मनुष्य सद्वर्तन ठेवतो यांत संशय नाहीं.

खोटें बोलण्यापासून अनेक तोटे होतात. एखादे वेळेस फायदाही होतो; परंतु तो नेहमींचा नसतो. त्याचा परिणाम केव्हांना केव्हां तरी वाईट झाल्यावाचून राहात नाहीं. पैशाच्या लोभानें लोक खोटी साक्ष देतात, व त्याबद्दल पैसा मिळवून क्षणभर सुखी होतात. परंतु खोटी साक्ष दिल्याबद्दल न्यायाधिशानें खटला करून शिक्षा देवविली ह्मणजे तें दुःख जिवापेक्षां भारी वाटतें. याकरितां कधीं कोणी खोटें बोलूं नये; त्यांतच यश आहे. खरें बोलणाऱ्याचा खरेपणा व खोटें बोलणाऱ्याचा खोटेंपणा हे कालांतरानें उघडकीस येतात. व

तदनुसार बरे वाईट परिणाम घडतातच. म्हणून हें चांगलें लक्षांत ठेवावें; व मनाची वृत्ति खऱ्याकडे सदोदित वळवावी म्हणजे सद्वर्तनाचें मोठेंच अंग संभाळल्यासारखें झालें.

आपलें वर्तन चांगलें ठेवण्यास आपलें मन आपणास उत्तम शिक्षक आहे. जसें आपणाशीं लोकांनीं वागावें असें आपणास वाटतें तसेंच आपण लोकांशीं वागलें पाहिजे हें आपलें मन शिकवितें. परंतु आपलेच मनावरून वर्तन सुधारणारे लोक थोडे असतात. दुसऱ्यानें आपणास मारिलें किंवा शिवी दिली म्हणजे जसें आपणास वाईट वाटतें तसेंच आपण लोकांस मारिलें किंवा शिवी दिली तर लोकांस वाईट वाटेल, हें आपलें मनांत बिंबलें पाहिजे. आणि अशी गोष्ट मनुष्याचे मनांत बिंबून तो तदनुसार वर्तन करूं लागला म्हणजे निरुपद्रवी बनलाच असें समजावें. कारण एखाद्यानें आपणास उपद्रव करावा अशी कोणाची इच्छा नसते. लोकोपद्रवापासून त्रास होतो अशी त्याची पक्की समजूत असते. आणि हीच समजूत त्यानें आपणाविषयीं लोकांबद्दल घेतली म्हणजे लोकांस त्रास देण्याविषयीं त्याचें मन कधींही प्रवृत्त होणार नाहीं. अर्थात तो अशा रीतीनें निरुपद्रवी झाला तर लोकमान्य होईल यांत काय नवल आहे? तात्पर्य इतकेंच समजूं लागल्यापासून प्रत्येकानें आपलें आचरण लोकांत स्तुत्य होईल असें ठेवण्याविषयीं पहिल्यानें झटलें पाहिजे; म्हणजे आयुष्यक्रमांत पाहिजे तो दरवाजा त्यास मोकळा असतो.

सद्वर्तन कायम राहण्यास मनोनिग्रह व स्वावलंबन हीं अवश्य आहेत. हे गुण ज्याचे ठिकाणीं आहेत त्याचें सद्वर्तन दुसऱ्याचे अनुकरणानें किंवा मोहानें कधीं ढळणार नाहीं. असे पुष्कळ लोक असतात कीं सद्वर्तन ठेवण्याविषयीं मना-

पासून त्यांची इच्छा असली तरी त्यांचे अंगीं वरील शक्ति नसल्यामुळें त्यांचें सद्वर्तन कायम राहत नाहीं मनुष्याचें आचरण जन्मतःच बनलेलें नसतें तें भोंवतालच्या मंडळीच्या अनुकरणानें बरें वाईट होतें व सृष्टीक्रमाचा असा कांहीं चमत्कार आहे कीं, चांगल्यापेक्षा वाईट खोडी साहजिक त्यास लवकर लागतात ह्मणून त्याची काळजी असणाऱ्या मंडळीनीं चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें त्यास समजावून त्याच्या मनाची प्रवृत्ति चांगल्या मार्गाकडे होईल असें केलें पाहिजे आणि हें होण्यास पहिला उपाय ह्मटला ह्मणजे आपलें स्वतःचें वर्तन अनुकरणीय ठेविलें पाहिजे. लहानपणांत अनुकरण शक्ति मनुष्याचे आंगीं इतकी असते कीं त्याचा स्वभाव पंधरा सोळा वर्षाचे वयापर्यंत बनून जातो. त्याच्या पुढील आयुष्याची पारख बहुत करून त्या वेळेसच करितां येते, लहानपणीं दुर्मार्गास लागलेलीं मुलें मोठेपणीं क्वचितच सदाचरणीं निपजतात. ह्मणजे त्यांचें लहानपणचें दुराचरण मोठेपणीं बहुत करून कायम राहतें तथापि सदाचरणी निपजण्याची आशा दाखविणारीं मुलें मनोनिग्रह नसल्यामुळें पुढें दुराचरणीं निपजलीं अशीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील.

मनो निग्रहाच्या योगानें एकदा लावून दिलेला मार्ग मनुष्य कधीं सोडणार नाहीं. आणि मनो निग्रह स्वावलंबनाशिवाय कधीं जडणार नाहीं. स्वावलंबन ह्मणजे आपल्या वर्तनावर आपला भरंवसा असणें हें होय. मनुष्याचें वर्तन चांगलें असलें व चांगलें असल्याबद्दल त्याच्या मनाची खात्री असून त्याची त्यास आवड असली ह्मणजे तें वर्तन सोडून दुसऱ्याचें अनुकरण न करण्याविषयीं त्याचा मनोनिग्रह आपोआप होतोच. ह्मणून मनाची वृत्ति इतकी दृढ होण्यापूर्वीच मुलांचे आईबापांनीं किंवा इतर पालकांनीं त्यांचे वर्त-

नाचा पाया चांगला मजबूत घालून दिला पाहिजे. अर्थात त्यांची गृहशिक्षा चांगली असली पाहिजे. ह्मणजे तीं मुलें बहुधा सद्वर्तनी निपजल्याशिवाय राहणार नाहींत. अशा रीतीनें सद्वर्तनी झाल्यावर दुसऱ्याचे दुराचरणाचें अनुकरण न करून मनोनिग्रह व स्वावलंबनाचे शक्तिपासून सदाचरण कायम राहण्याविषयीं मोठा फायदा होतो. त्या शक्तिपासूनच दुसरा फ़ायदा हा कीं मनुष्य दृढ निश्चयी होतो. दृढ निश्चय व मनोनिग्रह यांचा अर्थ बहुतेक जवळ जवळच आहे. मनोनिग्रहामुळें एकदा धरलेल्या एका मार्गापासून दुसऱ्या मार्गाकडे मनुष्य प्रवृत्त होत नाहीं. मनुष्य फक्त मनोनिग्रही असेल तर त्याचे हातून उत्तरोत्तर मोठालीं व स्तुत्य कृत्यें होणार नाहींत एकदा बनलेला स्वभाव तो कायम ठेवील परंतु दृढ निश्चयी मनुष्य आपले शक्तीप्रमाणें पाहिजे तें करूं शकेल. शिवाजीनें मोंगलांस जिंकून ब्राम्हणांचें संरक्षण करण्याचा दृढनिश्चय केला होता ह्मणूनच त्यानें अनेक संकटें भोगून मोठ्या प्रयत्नानें त्यांचा मुलुख घेतला व अखेरीस राजपद मिळविलें. रामशास्त्र्यांचीही अशीच गोष्ट आहे. यजमानानीं केलेल्या अपमानामुळें ईर्षा चढून त्यांजकडून सन्मान मिळवीन तरच पुण्याचें तोंड पाहीन असा जबर निश्चय केल्यामुळें काशीक्षेत्रीं बारा वर्षें अध्ययन करून राम्या शागीरदाचे रामशास्त्री झाले. रामशास्त्र्याचे विद्वत्तेस मूळकारण जरी ईर्षा झाली तरी दृढनिश्चयानेंच त्यांचा पण सिद्धीस गेला. त्यांनीं दृढनिश्चय केला नसता तर त्यांचे ईर्षेपासून कांहीं फायदा झाला नसता. असो तात्पर्य इतकेंच कीं प्रत्येकानें सदाचरण कोणतें दुराचरण कोणतें सत्कीर्ति कशापासून होते, अपकीर्ति कशापासून होते हें चांगलें ध्यानांत ठेवून मनोनिग्रहाच्या योगानें आपलें मन दुर्मार्गास जाऊं न देतां दृढनिश्चयानें मोठालीं कृत्यें

करावीं आणि आपलें नांव गाजवून जगत्रयीं मोठें भूषण मिळवून जन्माचें सार्थक्य करावें.

येथपर्यंत सद्वर्तनाविषयीं सांगितलें. आतां मनुष्याचें दुसरें कर्तव्य कर्म शरीर संरक्षण हें होय. मागें सांगितलेंच आहे कीं मनुष्य जें जें करतो त्याचें इच्छित फल सुख असतें. सुख प्राप्तीकरितां जसें सद्वर्तन अवश्य आहे तसें आरोग्य हेंही आहे. याकरितां शरीर निरोगी व सुदृढ ठेवण्याविषयीं प्रत्येकानें जपलें पाहिजे. आरोग्य हें सुखाचें साधन आहे. शरीर निरोगी असल्याशिवाय सर्व सुखांचा अनुभव मिळणें कठीण आहे. कारण मनुष्याचे सर्व व्यवहार शरीर बलावर अवलंबून असतात. ह्या जगांत आल्यावर धर्मअर्थ काम मोक्ष असे जे चार पुरुषार्थ आपणास साधावयाचे असतात ते शरीर निरोगी असल्याशिवाय साधणार नाहींत. फार तर काय शरीर निरोगी नसेल तर मनुष्याचे हातून कोणतें एकादें मोठें कृत्य होणें अगदीं अशक्य आहे. कारण शरीर रोगी असल्यामुळें मन उद्विग्न असतें. त्याची विचार शक्ति बंद होते. आणि मनुष्याचा सर्वकाळ आपल्या जिवाची काळजी करण्यांत जातो. मग अशा स्थितींत एकादें कृत्य करण्याविषयीं त्यांस उल्हास येईल कोठून?

मनुष्याचे सर्व व्यवहार आरोग्यावर अवलंबून असतात. व आरोग्य राखण्यास शरीरास फार जपावें लागतें. शरीराचें कोणतेहि अवयवास थोडी इजा झाली तर इतर अवयव आपलीं कामें बरोबर करीत नाहींतसे होतात. कारण सर्व अवयवांचा एकमेकांशीं सारखा व निकट संबंध आहे. जसें घड्याळाची एकखीळ ( पिव्हट ) फक्त सैल झाली ह्मणजे तें नीट चालत नाहींसें होतें तसें आपल्या शरिराच्या जरी एका भागास इजा झाली तरी ती इतर सर्व भागांना कमजोर

करितें ह्या कारितां प्रत्येकानें आपल्या शरीराचे कोणतेंही भागास इजा न होऊं देण्याविषयीं होईल तितकें जपून शरीर निरोगी व सुदृढ राखण्याविषयीं काळजी घेतली पाहिजे. सर्व संपत्ति अनुकूल असून जर शरीरसंपत्ति नसेल तर सर्व तुच्छवत् भासतें. मिष्टान्न खाऊन नानातऱ्हेचे ऐषआराम भोगणाऱ्या एकाद्या दुखणाईत राजापेक्षां चटणभाकर खाऊन घोंगडीवर निजणारा मजूरदार शरीर संपत्तिमुळें अधिक सुखी असतो. कारण शरीर सामर्थ्य असेल तरच राजास इतर सुखांचें अनुभव घेतां येतील. दांत पडलेल्या एकाद्या वृद्ध मनुष्यास कडक दाण्यांपासून जितकें सुख होतें तितकेंच सुख दुखणाईत राजास संपत्तिपासून होईल. ह्मणून शरीर निरोगी राखणें हें कोणतेही प्रकारचे सुखानुभव इच्छिणाऱ्या मनुष्याचें मोठें महत्वाचें कर्तव्यकर्म आहे.

वैद्य शास्त्राप्रमाणें म्हटलें तर मनुष्यास फक्त जन्मल्यापासूनसुद्धां जपून चालणार नाहीं. मातेच्या उदरांत गर्भ आहे तेव्हांपासूनच तिला खाण्यास जे पदार्थ घालावयाचे व तिला ज्या तऱ्हेनें वागवावयाची ते पदार्थ व ती तऱ्हा तिच्याभावी मुलास सुखकारक होईल अशी असली पाहिजे. अकालीं होणाऱ्या रोगांचा संभव बाजूला ठेवून जर अशा तऱ्हेनें एकाद्या मनुष्याची जपणूक सतत केली तर तो खरोखरी निरोगी झाल्याशिवाय राहणार नाहीं. मनुष्याची प्रकृति सुदृढ राहणें हें त्याच्या आईबापांवर किंवा इतर रक्षकांवर सर्वथा अवलंबून असतें. मनुष्य वयांत येईतोंपर्यंत त्यास प्रकृतीचें विशेष बरें वाईट कांहीं कळत नाहीं. त्याचे रक्षकांस त्याची जोपासना करावी लागते. व ती त्यांनीं काळजीपुरस्कर न केली तर त्यांचे हयगयीचा परिणाम त्या मनुष्यास पुढें भोगावा लागतो. लहानपणापासून जडलेला रोग मोठेपणीं काढ-

ज्यास फारच प्रयास पडतात ह्म करितां लहान मुलांची प्रकृति उत्तम राखण्याबद्दल वडील माणसांनीं फारच जपलें पाहिजे. कित्येक लोक तर मुलांची बरीच हेळसांड करितात. एक गृहस्थ आपल्या आईस म्हणाला; आई तूं मला या पोराबिरांच्या दुखण्याबद्दल वारंवार त्रास देऊं नको. मला त्याचे कांहीं महत्व वाटणार नाहीं. त्या अनुभवीक व शहाण्या आईनें शांतपणानें उत्तर दिलें अरे थोरांच्याच दुखण्यांबद्दल महत्व मानावयाचें असें तुझें ह्मणणें पण तीं तरी, लहानाचींच मोठीं झालेलीं असतात. हींच पोरें उद्यां नांवारूपास येणार नाहींत ह्मणून कशावरून," धन्य त्या माउलीची! हे तिचे शब्द प्रत्येक आईबापानीं ध्यानांत ठेवण्यास रखे आहेत. असो. शरीर निरोगी राखण्यास नियमितपणा लागतो. व तो बाळगण्याची संवय मुलांस पहिल्यापासून लावावी, ह्मणजे तीं वयांत येतात त्यावेळेस नियमितपणानें चालतात.

शरीरसामर्थ्य असलें ह्मणजे मनुष्य फक्त आपलेंच कल्याण करितो असें नाहीं. परंपरेनें त्याचे हातून दुसऱ्याचेंही कल्याण होतें. व त्याचे अंगीं स्वाभाविक ईर्षा व परोपकारबुद्धि असली ह्मणजे आपल्या देशाचेंही तो कल्याण करितो. कारण उद्योगाशिवाय शरीर कधींही निरोगी राहणार नाहीं. एकाद्या आळशी मनुष्याचें उदाहरण घ्या. त्याचे शरीरास कांहींनाकांहीं व्यथा नेहमीं असतेच कारण त्याच्या इंद्रियाचे व्यापार सदोदीत व्यवस्थेनें चालत नाहींत. व यामुळें असें एकादें हत्यार न वापरल्यामुळें गंजून जातें व निरुपयोगी होतें, तद्वत् गोष्ट आळशी मनुष्याची होते. ह्या करितां ज्या देशांतील लोक निरोगी व सदृढ असतात, तो देश बहुधा ऊर्जित दशेंत आल्यावांचून रहात नाहीं. कारण जर लोक निरोगी आहेत, तर उद्योगी असलेच पाहिजेत;

आणि उद्योग हा देशकल्याणाचें मोठें साधन आहे. शिवाजी व बाजीरावासारखे उद्योगी व शूर पुरुष निपजले, ह्मणूनच त्यांनीं मुसलमानापासून मुलूख मिळविला. परंतु शाहू व दुसरे बाजीरावासारखे आळशी व भित्रे लोक अधिकारावर येतांच इंग्रज सरकारच्या स्वाधीन तो त्यास करावा लागला. एकंदरींत शरीरसामर्थ्य योग्य कामीं लाविल्यास सर्व प्रकारें फायदेशीर आहे. शरीरसामर्थ्यासंबंधानें आपणांस विशेषेंकरून आहार, व्यायाम व ब्रह्मचर्य या तीन गोष्टींचा विचार करणें आहे. कारण या तीन गोष्टी शरीररूपी इमारतीचा पाया आहेत. यथा कालीं आहार, व्यायाम व ब्रह्मचर्य हीं योग्य रीतीनें चालविलीं ह्मणजे शरीर उत्तम राहील, यांत संशय नाहीं. ज्याचे हातून या तीन गोष्टीबद्दल थोडीशी हयगय होईल ते रोगी व अशक्तच रहातील. आहार, व्यायाम व ब्रह्मचर्य यांचीं कार्यें पोषण, पचन व रक्षण हीं अनुक्रमें आहेत. या तीन कार्यांतून फक्त एक कार्य पुरतें न झालें, तर मनुष्याची प्रकृति बिघडल्याशिवाय रहाणारच नाहीं.

शरीराची वृद्धि होण्यास व त्याचे व्यापार चालण्यास अन्नाची अवश्यकता आहे. नियमितपणें स्वच्छ अन्न बेतवार खाल्ल्यास रक्त, मांस मज्ज्या हाडें वगैरे जे शरीराचे घटकावयव ते ठराविक कालपर्यंत सदोदित वृद्धिंगत होऊन मनुष्यास शक्ति आणितात. अन्न हें ज्याच्या त्याच्या स्थितीप्रमाणें व पाचकशक्तीप्रमाणें खावें लागतें. एकादा नाजुक श्रीमंत गृहस्थ किंवा फक्त मानसिक श्रम करणारा एकादा विद्वान जर, ओझीं वाहणाऱ्या हेलकऱ्याप्रमाणें कांदा भाकर खाईल तर ती त्यास पचणार नाहीं. कारण ती पचण्यास शारीरिक मेहनतच पुष्कळ व्हावी लागते, व ती अशांचे हातून होत नसते. तसेंच एकादा हेलकरी दूध भातासारखें ना-

जूक अन्न जेवलि तर तें त्याच्या राकट कामास टिकाव धर णार नाहीं. त्याच्या पिंडास सकस व जड अन्नाची संवय झाल्यामुळें त्यास कदाचित् तें नाजुक अन्न मानवणारही नाहीं. लहानपणापासून जशी संवय ठेवावी तसें अन्न मनुष्यास पचतें. मागें सांगितलेंच आहे कीं, सदाचरण हें मनुष्याचें पहिलें कर्तव्यकर्म आहे, तर तें राखण्याकरितां मद्यमांस खाण्याची संवय कधींही कोणी लावूं नये. आतां कोणी ह्मणेल कीं, मद्यमांसाची संवय न करितां ह्मणजे त्याविषयीं व्यसनी न बनतां एकादे वेळेस त्याचा स्वीकार करण्यास विशेष हरकत नाहीं. कारण त्यापासून नुकसानीचा किंवा अब्रूहानीचा संभव कमी. परंतु ही समजूत चुकीची आहे, प्रसंगोपात एकच वेळ मोठ्या हानीस कारण होते हें खूप लक्ष्यांत ठेवावें. याकरितां तें कधींच कोणी खाऊं नये. जाती धर्मप्रमाणें तीं खाण्यास जरी कित्येकांस प्रतिबंध नाहीं, तरी त्यांनीं सुद्धां त्याचा निषेध करावा. कारण मद्यपान शरीरास अवश्य नसून उलट अपायकारक आहे. मद्यपानापासून भान नाहींसें होऊन त्या स्थितीमध्यें मनुष्य पाहिजे तो अविचार करण्यास प्रवृत्त होतो. अंगीं शहाणपण असतां मद्यपानानें क्षणभर मुद्दाम वेडें बनणें हें केवढें मूर्खपण आहे? याकरितां मद्यपान सर्वथा वर्ज करावें हें फार उत्तम. तसेंच मांसाहार जरी शरीरपुष्टीस मदत करितो, तरी त्याची विशेष जरूरी नाहीं. कित्येक विद्वान वैद्यांनीं मांसाप्रमाणें पुष्टीकर गुण पुष्कळ वनस्पतींत आहेत, असें दाखविलें आहे, हत्ती, घोडा, वगैरे पशूंचे भक्ष मांस नसतां ते किती बळकट आहेत. हें प्रत्यक्ष सर्वांस माहितच आहे. बापुगोखल्यासारखे ताकभात खाणारे पुरुष मांसाहारी लोकांपेक्षां शूर व बळकट होते. हें इतिहासावरून समजतें. हल्लींही कोठें कोठें अशीं उदाहरणें सांपडतील.

सर्वांस माहिती असेल कीं गुजराथेंत सर्व हिंदुलोक कुळंब्या-पासून तो अति उच्च जातीपर्यंत कोणी मांसाहार करीत नाहींत तथापि तेथील अंगमेहनत करणारे लोक इकडील मांसाहारी लोकांप्रमाणें मजबूत असतात. ज्यांनीं मुंबईंत दाणेवाल्याचे व्यापार करणारे व बंदरावर काम करणारे वाणी लोक पाहिले असतील त्यांची याबद्दल खात्री झालीच असेल. तर वस्तुतः कोणतेही प्रकारचा विशेष फायदा नसतां परमेश्वरानें आपणाप्रमाणेंच निर्माण केलेल्या प्राण्यांची हिंसा करणें यांत काय अर्थ! कित्येक मांसाहारी व मद्यपी जातींतसुद्धां मांस न खाणारे व मद्य न पिणारे असे थोर पुरुष आहेत, त्यांचें अनुकरण सर्वांनीं करावें, मद्यमांस खाल्यापासून आंगीं क्रौर्य उत्पन्न होतें, परंतु मनुष्यास क्रौर्याची कांहींच गरज नाहीं हें विचारांतीं कोणीही कबूल करील. तात्पर्य इतकेंच कीं प्रत्येकानें मद्यमांस न खातां आपले स्थितीचें मानानें व नियमितपणानें आहार करावा.

शरीराचे व्यापार सुरळीत चालण्यास जसा आहार अवश्य आहे तसा व्यायामही आहे. व्यायाम न केला तर अन्न पचत नाहीं व भूक लागत नाहीं. यामुळें शरीरास पुष्कळ रोग उत्पन्न होतात. व्यायाम ह्मणजे हल्लींचे समजुतीप्रमाणें मजेखातर फिरावयास जाणें असें नाहीं. तर अन्न पचण्याजोगे नित्यक्रमांतील मानसिक किंवा शारीरीक श्रम करणें किंवा नित्यक्रमांत तसें श्रमाचें काम नसेल तर मुद्दाम एकादे प्रकारची मेहनत करणें हें होय. व्यायाम हा आयुष्यक्रमांत लहान थोरास स्वाभाविक होणेंच. तथापि शरीर सामर्थ्याची ज्यांस आवड आहे, त्यांनीं विशेष प्रकारचा व्यायाम नेहमीं करावा हें उत्तम. व्यायाम केल्यानें शरीरांतील मल व रक्ताचा अशुद्धपणा घाम येऊन नाहींसा होतो. पूर्वींच्या

सरदार लोकांत दांड, पट्टा, व घोड्यावरील फेर पटका, वगैरे प्रकारचा व्यायाम नेहमीं जारीनें चालू असे; ह्मणूनच ते बळकट व शूर असत. रानटी व काबाडकष्ट करणारे लोक बळकट व शूर असतात, याचें कारण तरी हेंच आहे. त्यांची मेहेनत फार होते ह्मणूनच त्यांचें अन्न चांगलें पचून अन्नाचा सद्गुचय उत्तरोत्तर जास्त होऊन ते बळकट राहतात. शरीर-सामर्थ्य हें पाचनशक्तीवर फारच अवलंबून आहे. पाचनशक्ति नसेल तर शरीरांत अन्नाचा सद्गुचय होणार नाहीं. व अन्न न जिरलें ह्मणजे रोगाचा उद्भव होईल. याकरितां व्यायाम सर्वांनीं अवश्य केला पाहिजे. साहाजिक किंवा मुद्दाम केलेला व्यायाम झाला ह्मणजे मनुष्यास विश्रांतीहि अवश्य आहे. विश्रांति घेतल्यामुळें श्रमाचा परिहार होऊन पुन्हा काम कर-ण्यास नवी उमेद येते. बहुतेक सर्व उद्योगी लोकांस अनु-भव असेल कीं एक दिवस झोंप न घेतली तर दुसरे दिवशीं काम करण्यास हुशारी येत नाहीं. कारण विश्रांति नसल्या-मुळें अगोदरचा थकवा मोडलेला नसतो. झोंप ही मनुष्यास मोठी विश्रांति आहे. झोंप न घेतली तर खाल्लेलें अन्नसुद्धां पचण्यास जड जातें, व आपल्या आरोग्यास धक्का बसतो. ह्मणून योग्य तितकी विश्रांति घेऊन व्यायाम अथवा मेहनत करून शरीर निरोगी व सुदृढ राखण्याविषयीं सर्वांनीं जपावें.

शरीरसामर्थ्याचा तिसरा खांब ब्रह्मचर्य होय. हें जे खरो-खर सदोदित पाळणारे आहेत त्यांचा इतर सर्व गोष्टीविषयीं नियमितपणा असेल तर त्यांची शक्ति फारच विलक्षण अस-ली पाहिजे. असे पुरुष विरळा आढळतात. शरीर सुदृढ राखण्यास हें व्रत अगदीं कडक पाळावें लागतें असें नाहीं. सृष्टीनियमाप्रमाणें यापासून कधीं कधीं पराङ्मुख व्हावें लागतें. तथापि या व्रताचें उल्लंघन वाजवीपेक्षां जास्त झालें तर तें श-

रीर घातक होतें. प्रत्यक्ष सुद्धां उल्लंघन होण्यास नको. नुस्ती कामवासना वारंवार झाली तर ती देखील घातक आहे. ब्रह्मचर्याचे अनियमित उल्लंघनामुळें व कामवासनेमुळें अन्नाचे परिणाम जे शरीरांतील धातु त्यांचा क्षय होतो व शरीरसामर्थ्याची जीं अशीं महत्वाचीं तत्वें तीं नाहींशीं झालीं ह्मणजे अर्थात तो मनुष्य क्षीण होऊन लवकर लयास जातो. याकरितां प्रत्येकानें इंद्रिय निग्रहाची संवय ठेवावी ह्मणजे शरीरसामर्थ्यास धक्का बसणार नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें आहार, व्यायाम, व ब्रह्मचर्य यांचे नियम पाळून वर्तन केलें ह्मणजे शरीरसामर्थ्य चांगलें राहून मनुष्य सर्व सुखांचा अनुभव घेऊं शकतो. व अंगीं उमेद येऊन मोठालीं कृत्यें करतो, याशिवाय शरीर निरोगी व सुदृढ असल्यामुळें रोगाच्या ज्या वेदना त्यांचें दुःख आपणांस होत नाहीं. तर अशी अमोलिक शरीरसंपत्ति काळजी पुरःसर मिळवावी हें सर्वांस योग्य आहे.

आतां मनुष्याचें तिसरें कर्तव्यकर्म ज्ञान संपादन हें होय. हें त्यानें केलें ह्मणजे परमेश्वरानें मनुष्य जातीच्या प्राण्यास बुद्धिरूप देणगी दिल्याचें सार्थक्य झालें. मागें सांगितलेंच आहे कीं, मनुष्य जो सर्व प्राण्यांत श्रेष्ठ झाला तो आपल्या बुद्धिसामर्थ्यानें झाला. मग परमेश्वरानें तें सामर्थ्य त्यास दिलें असून त्याचा उपयोग जर तो ज्ञानसंपादण्याकडे न करील तर त्याचें अंगीं मनुष्यत्व नाहीं, असें म्हणावयाचें. ज्ञान हें मनुष्यास भूषण आहे. ज्ञानी मनुष्यावर सर्व लोक प्रीति करितात. ज्ञान ही महत्वाची संपत्ति आहे, इतर संपत्ति चोरली जाते, तशी ज्ञानसंपत्ति कोणास चोरतां येत नाहीं, आणि विशेष गोष्ट ही कीं, हिचा खर्च केला तर अधिक वाढते. ज्ञानी मनुष्य सर्वांस पूज्य होऊन राजद्वारीं त्यांस मोठा मान

मिळतो व त्याची विद्या देशोदेशीं त्याच्या कीर्तीस कारण होते. विद्येचे योगानें मनुष्य धनसंचय करून अनेक प्रकारचे सुखोपभोग घेऊं शकतो. मनुष्य विद्वान् व ज्ञानी असला म्हणजे व्यवहारांत तो आपणावर कोणतेही कठीण प्रसंग येऊं देत नाहीं; आणि दुर्दैवानें कदाचित् असे प्रसंग आलेच तर त्याची विद्वत्ता व ज्ञान हीं मोठ्या जिवलग मित्राप्रमाणें त्यास युक्तीनें पार पाडतात, याकरितां प्रत्येकानें नेहमीं ज्ञानाचा संचय करावा.

आयुष्यक्रमांत अमुक एका काळींच मनुष्यास ज्ञान संपादन करावयाचें असतें असें नाहीं. जन्मापासून मरणकाळपर्यंत ज्ञान संपादन केलें पाहिजे. ज्ञानभांडाराचा अंत कोणास कधींच लागला नाहीं. जों जों ज्ञान संपादन करावें तों तों तें अधिक अधिक उरलें आहे असें उत्तरोत्तर वाटत जातें. तथापि ज्ञान संपादन करण्याचा अगदीं योग्य काळ ह्मटला ह्मणजे तरुणपण हें होय. बाल्यावस्थेंत सुद्धां मनुष्य अनुकरणानें ज्ञानसंपादन करितो. ज्ञान संपादण्यास हा काळ फारच महत्वाचा आहे. जन्मतःच ईश्वरानें मनुष्याला बुद्धि दिलेली असते. व बुद्धि ही ज्ञान संपादन करण्याजोगी शक्ति आहे, व ज्ञान हें आपणांस नवीन अशा गोष्टींचें अनुकरणभांडार आहे. लहान मुलांस पहिल्यानें जें थोडथोडें समजूं लागतें तें अनुकरणानें लागतें. अनुकरण करण्यासारखें लहान मुलाच्या भोंवतालें जर कांहीं नसेल तर तें जन्मल्याबरोबर ज्या स्थितींत असतें त्याच स्थितींत सदोदित राहील. मनुष्य दृष्टीस न पडे अशा तजविजीनें एकाद्या लहान मुलाची खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवून जर त्यास निराळ्या खोलींत वाढविलें तर त्यास ती एकांत स्थिति आहे तोंपर्यंत चालतां बोलतां वगैरे कांहीं एक येणार नाहीं असें वाटतें. ह्याचें कारण एवढेंच कीं, अनुकरण करण्यास

त्याचे नजरेपुढें कांहींच नसतें: मनुष्य जन्मभर अनुकरणच करीत असतो. परंतु जसजसा मोठा होत जातो, तसतसा अनुकरण करण्याचा मार्ग त्यास स्वतंत्रतेचा होतो. पांच वर्षांचे वयापर्यंत मनुष्य बोलणें, चालणें, वागणूक, हीं शिकतो. मूल लहानपणांत एक एक शब्द बोलण्याचा यत्न करून अनुक्रमानें भाषा कशी शिकतें हें नीट विचार करून पाहत गेलें असतां कोणासही सृष्टीनियमाचें आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच पांचवर्षांपासून पंधरावीस वर्षेपर्यंत आपल्या स्थितीप्रमाणें व जातीप्रमाणें तें विद्या शिकतें. हा काल महत्वाचा आहे. कारण या कालांत त्याचें मन संसाराचे काळजीनें भारलें जात नाहीं. विद्या शिकण्याची खरी संवय व हौस या मुदतींत लागते. व ती पुढें आयुष्यभर कायम राहते. या काळांत बुद्धीस एकदां मांद्य आलें ह्मणजे मोठेपणीं तें तसेंच राहून एकादी गोष्ट शिकण्याविषयीं कितीही यत्न केला तरी तिजबद्दल समजत नाहीं. कोणताही वेल ओलेपणीं पाहिजे तसा लवतो. परंतु वाळून एकदां त्याचें लांकूड झालें ह्मणजे लवविण्याचा यत्न केला तर तो मोडतो. तद्वतच गोष्ट विद्येसंबंधानें लहानपणाची आहे. ह्मणून पंधरा किंवा वीस वर्षेपर्यंत मुलाचा काळ विद्या संपादण्यांत गेला ह्मणजे ती संवय सदोदीत कायम राहून मोठेपणींही त्याचा काल तसाच जातो. कारण मनुष्याच्या कालक्रमणांत सवयींचें प्राबल्य फार असतें. आणि तशांत मोठेपणच्या संवईपेक्षां लहानपणाच्या संवई दृढतर असतात. ह्याकरितां मुलांचें लहानपण व्यर्थ न जाऊं देण्याविषयीं फारच जपलें पाहिजे. लहानपण हें विद्येचा एक हंगामच आहे. जसें वेळेवर पेरण्या न केल्यामुळें पुढें कितीही मेहनत केली तरी धान्य पिकत नाहीं, तसें एकदां वीस वर्षें ज्ञान संपादल्याशिवाय गेलीं

णजे तो मनुष्य जन्माचा मतिमंद झालाच असें समजावें. व तो मतिमंद होतो एवढेंच नाहीं तर त्याला विद्याभ्यासंग नसल्यामुळें कसें तरी कालक्रमण झालेंच पाहिजे, म्हणून त्या कालांत त्याचें चित्त दुर्मार्गाकडे वळतें. कारण असा नियम आहे कीं चांगल्यापेक्षां वाईट खोडींचें अनुकरण मनुष्य शिकविल्याशिवाय सहजो करितो. व त्या एकदां जडल्या म्हणजे बहुतकरून कायम राहून मोठेपणीं त्याचे दुःखास कारण होतात. तर असा परिणाम न व्हावा म्हणून लहान मुलांच्या हितेच्छूंनीं वीस वर्षेंपर्यंत त्यांस जपण्याबद्दल फार काळजी घेतली पाहिजे. त्यांस हरप्रयत्नानें विद्या शिकविली पाहिजे. एवढेंच नव्हे तर अनुकरण करण्यास योग्य असें आपलें स्वतःचेंही वर्तन ठेविलें पाहिजे.

वर सांगितल्याप्रमाणें वीस वर्षेंपर्यंत ज्ञान संपादण्यांत काळ गेला म्हणजे विद्येविषयीं परतंत्रता संपली. पुढें आपले मतीप्रमाणें मनुष्य ज्ञान संपादन करितो. वीस वर्षांनंतर त्याचें ठराविक शिक्षण नसतें. जशी त्याची आवड असेल तशा प्रकाराचे ग्रंथ वाचून ग्रंथावलोकनानें तो आपलें ज्ञान वाढवितो. त्यास ग्रंथ वाचण्याची आवड मात्र पाहिजे ती असली तर उत्तरोत्तर त्याचें ज्ञान वाढत जाऊन मनाची तृप्ति कधींच होत नाहीं. परंतु विद्येचे इतके शोकी पुरुष थोडे असतात. ज्या देशांत असे ज्ञानी व विद्वान पुरुष फार असतात तो देश ऊर्जितदशेस आलाच पाहिजे.

ज्ञान संपादण्यापासून जे अनेक फायदे आहेत त्यांपैकीं समाधानवृत्ति हा मोठा फायदा आहे. कारण समाधानवृत्ति ही सर्व सुखाचें मूळ आहे. मनुष्यास कितीही ऐश्वर्य प्राप्त होवो, परंतु त्यापासून त्याचे मनाचे ठिकाणीं जर समाधान नसेल तर त्यास सुखाचा लेश मिळणार नाहीं.

सुखाचें प्रमाण ऐश्वर्यावर नाहीं. मनुष्य ज्या मानानें समाधानी असेल त्या मानानें सुख पावेल; आणि ज्ञानाशिवाय समाधानवृत्ति रहाणार नाहीं. समाधानवृत्ति न रहाण्याचें मुख्य कारण मनुष्याचे आंगची आशा ही होय. आशा ही स्वभावतः त्याचे अंगीं हळूहळू ज्यास्त वाढत जाते व तिचें ज्ञानाशिवाय खंडण होत नाहीं. ज्ञानापासून सृष्टी व्यवहाराचीं तत्वें ओळखून मनुष्य आशामुक्त होतो आणि सदोदीत समाधानी राहून सुखी होतो.. ह्याकरितां ज्याला सुखाची इच्छा असेल त्यानें यथासंपादित ऐश्वर्यामध्यें समाधानी असावें. आतां कोणी म्हणेल कीं, मनुष्य आशाविरहीत झाला ह्मणजे त्याचे सर्व उद्योग बंद पडतील. परंतु तसें नाहीं. आशा शब्दाचा अर्थ ईर्षा असा कोणी करूं नये. आशा ही अनंत आहे, ती कधींच संपत नाहीं. तशी ईर्षा नव्हे. ईर्षा ही प्रासंगिक उमेद आहे. ईर्षेपासून उद्योगाचे अंकुर वृद्धिंगत होऊन मनुष्य उदयास येतो पण ईर्षा नसून फक्त आशाच असेल तर तो जागच्या जागींच व्यर्थ दुःखी रहातो. सबब ईर्षेनें उद्योग करून यशप्राप्तीकरितां सदोदीत यत्न करणें हें फार उत्तम होय. वर लिहिलेंच आहे कीं, यश किंवा अपयश येणें हें केवळ उद्योग करणारावरच फक्त अवलंबून नसतें. तथापि सदाचरणानें मनःपूर्वक यत्न करणें हें नेहमीं त्याचे स्वाधीन असतें. अशा यत्नांत अपयश आलें तर वाईट वाटेल, परंतु आंगचें समाधान नाहींसें होणार नाहीं. समाधान कायम राहण्यास मनुष्याची अशी समजूत असली पाहिजे कीं, सदोदीत यत्न करणें हा माझा धर्म आहे. व्यवहारांत जशा कांहीं नियमित गोष्टी आपण स्वाभाविक करतों, त्यांपैकीं किंवा त्यांप्रमाणेंच आयुष्योन्नति करितां अनेक प्रकारचे यत्न आपणांस केले पाहिजेत; ह्मणजे उत्तरोत्तर अमुक स्थिति मिळावी अशी

ज्याप्रमाणें प्रत्येकाची स्वभाविक इच्छा असते त्याप्रमाणें तिचें साधन जे मनुष्याचे यत्न ते होण्याविषयींही स्वाभाविक आवड पाहिजे. अशा पासून जरी खिन्नता उत्पन्न झाली तरी असमाधान होण्याचें कांहीं कारण नाहीं. कधीं कधीं अपयशापासून अधिक उमेदही येईल. व त्या उमेदीमुळें स्तुत्य व कल्याणकारक अशीं कामें त्याचे हातून होतील. अलीकडे सर्व लोकांचे नजरेपुढें कैलासवासी महादेव मोरेश्वर कुंठे यांचें उदाहरण आहे. त्यांचे आचार व मतें यांविषयीं पुष्कळांचा परस्पर मत भेद असेल; त्याविषयीं सर्व तर्क बाजूला ठेऊन कोणीही निःपक्षपाती इसम त्यांचें ज्ञान, त्यांचे उद्योग, त्यांची ईर्षा, व समाधानवृत्ति यांबद्दल स्तुति केल्याशिवाय राहणार नाहीं. या त्यांच्या सद्गुणांनीं हिंदुस्थान देशांतच काय परंतु परदेशांत सुद्धां त्यांनीं आपणास प्रसिद्धीस आणिलें. वरील गुण व्यक्त करणारीं अनेक उदाहरणें त्यांनीं आपल्या बांधवांस दाखविलीं. सिस्पेन्सिलीचा कारखाना काढल्यावर पेन्सिलीची चांगली भट्टी उतरली नाहीं, हवें तसें मऊ लांकूड मिळत नाहीं, असें पाहून तो थोर पुरुष कधीं निराश झाला नाहीं. आपण मेहनत करितों आहों तर इच्छित काम केव्हां तरी यथास्थित होईल अशी त्यांची खातरी असून मारलेल्या मजलीबद्दल ते सदोदीत समाधानी असत. आणखी कांहीं वर्षें वांचून उद्योगस्वातंत्र्य जर त्यांस पूर्णपणें आलें असतें तर खरोखर देशाचें कल्याण त्यांनीं केलें असतें. परंतु दुर्दैव आमचें! असो. त्यांच्या समाधानवृत्तीस त्यांचें ज्ञान कारण झालें. ग्रंथावलोकनानें त्यांचे अंगीं मोठें गांभीर्य आलें होतें. अनेक थोर पुरुषांचीं चरित्रें व देशांचे इतिहास वाचून यशप्राप्तीचे मार्ग त्यांचे मनांत बिंबले होते यामुळें एकादे वेळीं अपयश आलें ह्मणून निराश न होतां त्यांस दुप्पट ईर्षा उत्पन्न होई. एकं-

दर्शीत असे थोर पुरुष ग्रंथावलोकनानें व अनुकरणानें मागें घडून आलेल्या अनेक गोष्टींविषयीं अनुभवीक बनून उदयास येतात हें प्रत्येकानें चांगलें ध्यानांत ठेविलें पाहिजे. कारण ग्रंथावलोकन हें ज्ञानसंपादण्याचें मोठें साधन आहे. ग्रंथावलोकनापासून अंगीं विद्वत्ता येते. यश कशांत आहे व अपयश कशांत आहे हें चांगलें समजतें. व उगीच आशा करण्याची संवय जाऊन योग्य वेळीं ईर्षा धरून आपल्या उद्योगांत झटण्याविषयीं बुद्धि होते व यामुळें आपलें आयुष्यक्रमण फार सुलभ व सुखी होतें.

तसेंच ग्रंथावलोकनानें अनेक देशांची माहिती होते. आजमित्तीला कित्येक राष्ट्रांचें जें व्यापारादि दळणवळण आहे व त्यांचे अनेक भागांची पुष्कळांस माहिती आहे याचें कारण ग्रंथ होत. नाईल नदीमध्यें अमक्या अक्षांश रेखांशावर मोठा घातक भोंवरा आहे हें त्या भागांत जलपर्यटण करणाऱ्या दर्यावर्दी लोकांस माहित असतें व त्या भागाकडे ते आपलें सुकाणूं कधीं फिरवीत नाहींत; याचें कारण तो सर्वांनीं पाहिला आहे असें नाहीं परंतु त्या भोंवऱ्याची माहिती मागील लोकांचें अनुभवावरून किंवा ग्रंथावलोकनानें सर्वांस झालेली असते. प्रत्यक्ष त्या भोंवऱ्याच्या कचाट्यांत कांहींसे सांपडून मोठ्या प्रयासानें कदाचित् बाहेर निघालेले किंवा त्याच्या आसमंतात भागीं जाऊन तपास काढलेले असे थोडेच लोक असतात. तर अशा प्रकारचे दुसऱ्याच्या अनुभवांवरून शहाणे झालेले किती तरी लोक जगांत असतील.

दुसरें असें कीं, ग्रंथावलोकन ज्ञान संपादण्याचें साधन असून करमणूकही आहे. पुष्कळांस अनुभव असेल कीं, सृष्टीक्रमाप्रमाणें एकादे वेळेस कठीण प्रसंग गुदरला किंवा दुसरें एकादे प्रकारचें दुःख झालें तर त्या दुःखाचा विसर पाडण्यास

मराठी ... महालय, नवे.

ग्रंथावलोकनाची फार मदत होते. अशा प्रसंगीं मनुष्याचा वेळ कंटाळवाणा न जातां दुःख शमन होतें एवढेंच नाहीं, तर तें मनास धीट करतें.

ज्ञान संपादन नुसत्या सहवासानेंही होत असते. या देशाच्या रीतीप्रमाणें घर कामांत दक्ष असणाऱ्या स्त्री वर्गापैकीं पुष्कळांस मत्र लिहितां वाचतां येत नाहीं तथापि कित्येक स्त्रिया मोठ्या ज्ञानी आहेत असें आढळून येतें; हें त्यांचें ज्ञान बहुतकरून त्यांस सहवासानें प्राप्त झालें असतें. यावरून ज्ञानी लोकांचा नुसता सहवास जरी असेल तरी त्यांचे ज्ञानाचा लाभ ग्रंथावलोकनाशिवाय घेतां येईलसें दिसतें. तथापि ग्रंथावलोकनासारखा उत्तम व्यवसाय सर्वांनीं करून त्यापासून होणारा फायदा जो ज्ञानसंपादन तो करून घेण्याविषयीं फार झटलें पाहिजे. यथाशक्ति ज्ञान मिळविल्यावर त्याचा उपयोग आपल्या आवडीप्रमाणें व सन्मार्गानें मनुष्य पाहिजे त्या उद्योग धंद्यांत किंवा इतर कामांत करो; परंतु तें न मिळवील तर सर्व प्राण्यांवर वर्चस्व मिळविण्यासारखी परमेश्वरानें दिलेली देणगी जी बुद्धी, तिचा उपयोग न केल्यामुळें परमेश्वराकडे तो दोषी होईल व आपलें अमोलिक आयुष्य व्यर्थ घालवून दुःखास अंतरेल. याकरितां प्रत्येकानें आपल्या वेळाचा सदुपयोग करून जन्माचें सार्थक्य करावें आणि कीर्तियश मागें ठेवावें यांत मोठें भूषण आहे.

## आर्या.

पालवि नूतन येतां तरु दिसतो कुरुप मधुनि दृष्टीतें ॥
स्वरुपा चढतो परितो, वाढु दिल्या, रमवुनीहि सृष्टीतें ॥१॥
अस्पष्ट बाल बोले परि तेणेंही सुजाण जन रमती ॥
वळविति योग्य दिशेला आनंदति बघुनि त्या पुढें सुमती ॥२॥

समाप्त.

पुस्तक छापत असतां आमचें एकाएकीं बाहेरगांवीं जाणें झाल्यामुळें शुद्धिपत्र देण्याची वेळ आली; त्याबद्दल वाचक क्षमा करतील.

प्रकाशक.

## शुद्धिपत्र.

| पान, | ओळ, | अशुद्ध, | शुद्ध, |
|---|---|---|---|
| ३ | १९ | पशुपक्षांदिकां | पशुपक्ष्यांदिकां |
| ४ | २ | कुंटुंबाचा | कुटुंबाचा |
| ४ | १० | विशेप | विशेष |
| ८ | १७ | बुद्धी | बुद्धि |
| ९ | १४ | कांहीं | पुत्र |
| १० | १९ | परवानें | परवाने |
| १० | १६ | निरापराधी | निरपराधी |
| ११ | १७ | याचे | याचें |
| १३ | २६ | गनु'य | मनुष्य |
| १४ | २ | सर्वांशीं | सर्वांशीं |
| १४ | ३ | वयां | वयांत |
| १५ | १० | उदरनिर्वासारखें | उदरनिर्वाहासारखें |
| १६ | ५ | ज्याचा | ज्यांचा |
| १६ | ५ | त्यास | त्यांस |
| १७ | २१ | जाउ | जाउं |

| पान, | ओळ, | अशुद्ध, | शुद्ध |
|---|---|---|---|
| १९ | ७ | जोतो | जाता |
| २० | १० | थोडयास | थोडयांस |
| २० | १४ | केवल | केवळ |
| २१ | ७ | लक्ष्य | लक्ष |
| २१ | २९ | दुर्गुणापासून | दुर्गुणांपासून |
| २२ | १५ | मनुष्याचा | मनुष्याचा |
| २४ | ७ | घेऊ | घेऊं |
| २५ | २७ | खोटेंपणा | खोटेपणा |
| २६ | २७ | इतकेंच | इतकेंचकीं |
| २७ | ९ | चांगल्यापेक्षा | चांगल्यापेक्षां |
| २७ | ११ | आंगीं | अंगीं |
| २८ | १४ | ब्राम्हणांचें | गोब्राम्हणांचें |
| २८ | २० | वर्षें | वर्षें |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | २० | शागिरदाच्र | शागीर्दाचे |
| २८ | २९ | अपाकिर्ति | अपकीर्ति |
| २९ | ६ | आहें | आहे |
| ३० | ८ | सखांचें | सुखांचे |
| ३० | १२ | मनृष्याचें | मनुष्याचें |
| ३१ | ६ | त्याचे | त्याचें |
| ३१ | १८ | तों | तों |
| ३२ | १ | मोंठे | मोठें |
| ३२ | ४ | आधिकारावर | अधिकारावर |
| ३२ | ५ | त्यास | त्यांस |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | १२ | ज्याचें | [illegible] |
| ३२ | १२ | [illegible] | [illegible] |
| ३३ | १२ | लक्ष्यांत | [illegible] |
| ३३ | २३ | भक्ष | [illegible] |
| ३४ | ५ | [illegible] | [illegible] |
| ३४ | ११ | आंगीं | [illegible] |
| ३४ | १३ | [illegible] | विचारानि |
| ३५ | २२ | गोष्टीविषयीं | गोष्टींविषयीं |
| ३६ | २७ | त्यांस | त्यास |
| ३९ | ९ | खोडीचें | खोडींचें |
| ४३ | ४ | असते | असतें |

# विक्रीस तयार.

सुलभ आरत्या ( भाविक लोकांकरितां ) किं० ।

बोधपर गणपतीचीं पदें ( प्रत्येकास आपल्या स्थितीचें चांगलें स्वरूप कळण्यासारखें बोधपर गायनोपयोगी पुस्तक ) किं० ॥

स्त्रियांकरितां गाणीं ( स्त्रियांस संसारांतील बरें वाईट साहजिक कळण्यासारखें अति उपयुक्त व नीतीपर व मनोरंजक पुस्तक ) किं० ॥

# छापत आहे.

( आश्रय पाहिजे. )

अभिनव पद्यसुधा.

सदरहु पुस्तकांत मनुष्याच्या हातून निरनिराळ्या स्थितीं जे गुणदोष घडतात त्यांचें चित्र दाखविलें आहे आणि त्या ध्यास इष्ट कोणतें याविषयीं मनावर ठसा उमटविण्यास रखें पद्यात्मक वर्णन आहे. यांतील कविता अनेक वृत्तांवर असून, त्यांत आठ उपयुक्त विषयांचा समावेश केला आहे व विशेषेंकरून यांत "तथापि रामायण" ह्मणून सार्थ रामायणावर सुरस आर्या आहेत. पुस्तकाचीं पृष्ठें ६० होतील. किंमत ६ आणे. आगाऊ सही पाठविणारांस ४ आणे

कृष्णाजी गणेश अभ्यंकर

पत्ता:-शेणव्याचे ठाकुरद्वारानजिक खऱ्याची चाळ मुंबई

# कराचे सामान्य नियम.

व त्या संबंधानें.

# लायसेन्सट्याक्स म्हणजे उदीमपट्टी

# ह्याविषयीं विचार.

—— 000 ——

**सातार** जिल्ह्यांत **वांई** म्हणून एक क्षेत्र आहे. तेथें **नारायणराव** ह्या नांवाचा एक गृहस्थ पेनशन घेऊन सुखवस्तु जाऊन राहिला आहे. हा मुळचा **वांईचाच** राहणारा; पण रोजगार निमित्त कितीएक वर्षें बाहेर होता. **गंगाधरशास्त्री** म्हणून त्याचा एक पूर्वीचा **पुणेंकर** मित्र होता. हाही मुळचा **वांईचाच** राहणारा; पण प्रथम विद्याभ्यासाच्या व पुढें नौकरीच्या कारणानें त्याचें फार दिवस **पुण्यास** राहणें होतें. हा गृहस्थ **नहरास** जात असतां **नारायणरावास** भेटण्याकरितां मध्यें **वांईस** उतरला. मित्र फार दिवसांनीं भेटण्यास आला म्हणून त्या दिवशीं **नारायणरावांनीं** मेजवानीचा थाट करून त्याच्या पंगतीस दुसरे गांवचे चार संभावित बोलाविले होते. त्या वेळेस **खंडभट** म्हणून **नारायणरावाचा** कूलउपाध्या व **वासुदेव**नाईक सराफ हेही मेजवानीस आले होते. भोजन आटपल्यानंतर पानसुपारी खात असतां हिकडल्या तिकडल्या गप्पाटप्पा चालल्या होत्या, तेव्हां **नारायणरावांनीं** **गंगाधरशास्त्री** यांस विचारलें.

**ना० रा०**—शास्त्रीबोवा पुण्याकडील काय हाले हवाल आहे.

**गंगा० शास्त्री.**—हाल हवाल म्हणून कांहीं विशेष सांगण्यासारखी नाहीं; पण एक आहे. **लायसेन्सट्याक्स** म्हणजे उदी-

मपट्टी बसविण्याकरितां सरकारानें एक नवीन आक्ट केला आहे. हा आक्ट तारीख पहिली मे पासून सुरू झाला. येणेंकरून शहरचे व्यापारी, उदमी, शेट सावकार वगैरे लोक फार हवालदील होऊन गेले आहेत. ह्या पट्टीपासून लोकांवर फार जुलूम होईल, तर ती बंद करावी म्हणून विलायत सरकारास अर्ज करण्याकरितां तेथें एक सभाही भरली होती. व सर्वांच्या विचारें एक अर्ज तयार होऊन मुंबई सरकारचे मार्फत विलायत सरकाराकडे जाण्याकरितां रवानाही झाला.

**वासुदेव ना०**—होय मलाही माझ्या स्नेहाचें एक पत्र आलें आहे; त्यांत त्यानें ह्या कराविषयीं मजकूर लिहिला आहे; व त्याणें आणखी असें लिहिलें आहे कीं, **इन्कंटयाक्स** म्हणजे प्राप्तीवर कर हा ज्या वेळेस कर बसला, त्या वेळेस जो लोकांत गवगवा झाला होता, त्यापेक्षांही आतां अधिक झाला आहे. व ती पट्टी बंद होण्याकरितां विलायत सरकारास अर्ज करण्याविषयीं पुष्कळ लोकांची फार खटपट चालली आहे.

**खंडभट**—ही उदीमपट्टी बसविण्यास येथेंही आरंभ झाला आहे. कितीएक लोकांनीं फर्मे भरून दिले आहेत; व कितीएक देत आहेत. व्यापार, उदीम ह्यांवर कर बसणार ही खबर ऐकल्यापासून येथील लोकांचीं मनें अगदीं बावरलीं आहेत; पण त्यांच्या अंगांत पुण्यांतील लोकांसारखें पाणी नाहीं. ह्या कामांत योग्य तजवीज काय करावी हेंही त्यांस अज्ञानामुळें कळत नाहीं. पण अलीकडे ह्या सरकारानें नीत सोडली. राजानें प्रजेचें पुत्रवत पालन करावें म्हणून जी ऋषींनीं राजनीति लिहून ठेविली आहे, तिच्या अगदीं विपरीत ह्या सरकारची कृति आहे. आधींच लोकांस खाण्यास अन्न नाहींसें झालें आहे. त्यांत वरचेवर करांचा त्रास. आज मिठावर, उद्यां घरावर, परवा छापील कागदावर, तेरवां व्यापारावर ह्याप्रमाणें नानाप्रकारचे कर बसल्यामुळें रयतेस फार पीडा झाली आहे. असो, पण

शास्त्रीबोवा जी ही पुण्यांतील लोकांनीं अर्जी केली आहे, तिच्यापासून कांहीं होईल?

**गं० शा०**—होईल कीं नहोईल, हें कोणीं सांगावें. यत्न करीत असावा. फळ प्राप्त होणें अगर नहोणें हें पराधीन आहे; म्हणून उद्योग करण्यांत कमतरपणा करून उपयोगीं नाहीं.

**ना० रा०**—भटजी आपण म्हणतां कीं इंग्रज सरकारची नीत आलीकडे बिघडली; पण मला तसें वाटत नाहीं. एकंदर त्यांच्या सर्व गोष्टींचा जर तुम्ही निष्पक्षपातानें विचार कराल, तर सरकार रयतेविषयीं पूर्वीपेक्षां हल्लीं पुष्कळ कळकळीनें वाळगूं लागलें आहे असें तुमच्या नजरेस येईल. नवीन कर बसल्या-कारणानें आपल्यास पैसा द्यावा लागतो येवढ्यावरून सरकारास नांव ठेवणें बरोबर नाहीं. आपल्या जिवाचा व मालमत्तेचा बचाव होण्याकरितां सरकारानें जो येवढा अफाट कारखाना ठेवला आहे, तो चालण्यास पैशाचें बळ पाहिजे. त्या शिवाय तो चालाव-याचा नाहीं. आतां सरकारास जो पैसा पाहिजे तो आकाशांतून तर पडतच नाहीं. तो रयतेपासूनच त्यांस मिळाला पाहिजे. आणि म्हणूनच सरकार लोकांवर कर बसवून पैसा उत्पन्न करतें.

**बा० ना०**—ज्या अर्थीं सरकार शरीराचें व मालमत्तेचें संरक्षण करतें त्या अर्थीं त्यांचा खर्च भागण्यास पैसा देणें हा प्रजेचा धर्म आहे. पण उगीच करणावांचून अथवा अदकरीदवा खर्च करून जर सरकार पैसा मागेल तर तो रयतेनें द्यावा? आतां हा जो सरकारानें नवीन कर बसविला आहे, तो बसविण्याची सरकारास काय व कोणच्या कारणानें जरूर पडली आहे? थोड्या वर्षांपूर्वीं जो **इन्कमटाक्स** म्हणजे प्राप्तिवर कर बसविला होता, त्यावेळेस लढाईच्या कारणानें सरकारास कर्ज झालें होतें. आतां काय व कोणच्या योग्य कारणानें ज्यास्ती खर्च झाला आहे कीं लायसेन्सटाक्सा सारखा त्रासदायक कर बसविणें त्यांस अगदीं भाग पडलें?

ना० रा०—आलीकडे ज्याप्रमाणें इतर सर्व लोकांचा खर्च वाढला आहे, त्याप्रमाणें सरकारचाही वाढला आहे; पण त्या मानानें उत्पन्न कांहीं वाढलें नाहीं. बजेट म्हणजे जमा खर्चाचा तक्ता सरकारानें प्रसिद्ध केला आहे. त्यावरून सुमार ५००००० रुपयांची तूट आहे, ती भरून काढण्याकरितां ही नवीन पट्टी काढली आहे.

गं० शा०.—आतां ही जी तूट आली आहे, ती स्वाभाविक कारणानें आली आहे, किंवा सरकारच्या दोषामुळें आली आहे, हें निश्चितपणें सांगवत नाहीं; तथापि सरकारच्या कांहीं कारखान्यांत अशी कांहीं अंदाधुंदी आहे, कीं तशी अंदाधुंदी साधारण मनुष्याच्या संसारांत असली, तर त्यास सुद्धां लज्जेनें खालीं पाहवें लागेल. आज एखादा पूल अगर इमारत तयार झाल्याचा दाखला येतो. व मागून त्याच दिवशींच्या टपालांत त्याच कामाची दुरुस्ती केली पाहिजे, व त्यास अमूक खर्च लागेल अशाविषयीं एस्टीमेट तयार होऊन येतें; अशीं देखील कांहीं उदाहरणें घडलीं आहेत. पब्लिकवर्क्स म्हणजे लोकोपयोगीं खातें ह्या खात्यासारखा अव्यवस्थित खर्च प्रायः कोणच्याही खात्यांत नसेल. तर ह्या खात्यांत चांगली व्यवस्था केली, व तसेंच इतर खात्यांतले कित्येक गैरवाजवी खर्च तोडले, तर बहुत करून तूट म्हणून येणार नाहीं; व ह्याप्रमाणें पूर्वींच व्यवस्था केली असती तर आतां हा कर बसविण्याचा प्रसंगही आला नसता. शिवाय प्रस्तुत जी सरकारानें तूट दाखविली आहे, ती बरोबर आहे ह्यास त्यांच्या जमाखर्चाच्या तक्त्याशिवाय दुसरें प्रमाण नाहीं. त्याच्याशीं पडताळा पाहण्यास कच्चे कागदपत्र पाहिजेत; पण ते मागण्यास अद्याप आपली तशी स्थितिही नाहीं. असो. तेव्हां त्यांनीं जी तूट दाखविली आहे, तीच खरी आहे असें जरी धरलें, तरी ती भरण्यास हा जो नवीन कर काढला आहे, तो जसा कर असावा तसा नाहीं—आणि म्हणूनच त्यापासून लोकांची फार छळणा होईल ह्यांत कांहीं संदेह नाहीं.

खं० भ० व वा० ना०—तरेंच शास्त्रीबोवा ह्या करापासून रयतेस फार पीडा होईल.

नारा० रा०—शास्त्रीबोवा आपण म्हणतां कीं हा कर असावा तसा नाहीं. बरें, कर तरी कसा असावा हें कृपा करून सांगाल?

गंगा० शा०—कर कसा असावा ह्याविषयीं चार पांच व्यापक नियम आहेत तें मी तुम्हास यथानुक्रमें सांगतों.

वा० ना०—सांगावे शास्त्रीबोवा.

गंगा० शा०—पहिला नियम असा आहे, कीं प्रत्येक मनुष्यानें आपल्या ऐपतीप्रमाणें म्हणजे सरकारच्या छायेखालीं जो जें उत्पन्न उपभोगीत आहे त्यानें त्या उत्पन्नाच्या मानानें सरकारास मदत करावी हें योग्य आहे. ह्या नियमाचें पालन अथवा उलंघन ह्यांतच ज्यास अर्थशास्त्रकार कराची समता अथवा असमता म्हणतात ती आहे. ह्या नियमास अनुसरून जो कर आहे तो सर्वांवर सारखा बसतो; व जो ह्या नियमास अनुसरून नाहीं तो सर्वांवर सारखा बसत नाहीं; म्हणजे कोणावर ज्यास्ती बसतो, कोणावर कमी बसतो.

खं० भ०—शास्त्रीबोवा प्रथम आपण म्हणालात कीं, प्रत्येक मनुष्यानें आपल्या ऐपतीप्रमाणें सरकारास मदत करावी, व लागलीच आपण असें म्हणतां, कीं सर्वांवर सारखा कर असावा, तेव्हां हें कसें? सरसकट सर्वांवर सारखा कर बसविला तर श्रीमंताच्या योग्यतेप्रमाणें जो कर आहे, तो गरीबास त्याच्या योग्यतेप्रमाणें ज्यास्ती होईल. व जो गरीबाच्या योग्यतेप्रमाणें आहे, तो श्रीमंतास त्याच्या योग्यतेप्रमाणें कमी होईल. तेव्हां अर्थातच जो कर सर्वत्र सारखा आहे, तो देणें म्हटलें म्हणजे प्रत्येक मनुष्यानें आपल्या ऐपतीप्रमाणें सरकारास मदत करणें असें होत नाहीं.

गं० शा०—प्रत्येक मनुष्यानें आपल्या ऐपतीप्रमाणें सरकारास मदत करावी ह्या म्हणण्यांत व करांत सारखेपणा असावा ह्या म्हणण्यांत प्रथम दर्शनी विरोध आहे, असें वाटतें; पण त्यांत वास्त-

विक विरोध नसून उलटा मेळ आहे. सरकारानें कर घेणें ह्याचा अर्थ रयतेनें आपल्या संपत्तीचा अंश कमी करून तो सरकारास देणें हा होय. तेव्हां सर्वांवर सारखा कर असावा म्हणजे सरकार देणें सर्वांससारखें पडावें. कोणास अधिक अगर कोणास उणें असें होऊं नये. एकास जर त्याच्या वाजवी हिशापेक्षां कमी देणें पडलें, तर तो अंश दुसऱ्या कोणावर पडलाच पाहिजे. आणि एकास कमी द्यावें लागलें म्हणून जें त्यांस सुख होईल त्यापेक्षां ज्याच्यावर ज्यास्ती अंश बसला त्यास फार दुःख होईल. समजा कीं दोन गड्डी आहेत. त्यांपैकीं एक अगदीं म्हातारा व लुसकान आहे, व दुसरा तरणा ताठर आहे. दोघांच्याही डोईवर सारखीं ओझीं दिलीं, तर तीं ओझीं दोघांस सारखींच वाटतील काय? जो अशक्त आहे त्यास त्या दुसऱ्या सशक्तापेक्षां अधिक ओझें आहे असें नाहीं कां वाटणार? आतां आपण असें कल्पूं कीं दोन्हीही गड्यांस ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणें कमी ज्यास्त ओझें वाटून दिलें. तर एकास अधिक व एकास कमी असें होणार नाहीं. दोघांसही सारखें ओझें वाटेल. पण समजा, कीं जें कांहीं नियमित ओझें आहे तें दोघासच न्यावयाचें आहे. आणि एकास त्याच्या योग्य वाट्यापेक्षां कमी झालें, तर तो अंश दुसऱ्यावर गेलाच पाहिजे. एकास कमी झाल्यापासून जितकें त्यास हलकें वाटेल, त्यापेक्षां ज्यावर ज्यास्त ओझें बसेल त्यास अधिक जड वाटेल व अधिक इजा होईल ह्यांत संशय नाहीं. ह्याचप्रमाणें सरकार देण्याचा प्रकार आहे. राज्याचा एकंदर खर्च रयतेवरच वाटून दिला पाहिजे; आणि तो सर्वांवर सारखा वांटला म्हणजे सर्वांपासून सरसकट चार चार रुपये घेतले, तर ते देण्याचें गरीबास जितकें जड वाटेल तितकें श्रीमंतास वाटणार नाहीं; तेव्हां कर सर्वांवर सारखा असावा म्हणजे सरकार देण्याचें ओझें सर्वांवर सारखें पडावें; आणि हें ओझें सर्वांवर सारखें पडणें म्हटलें म्हणजे प्रत्येक मनुष्यानें आपल्या ऐपतीप्रमाणें सरकारास मदत करणें होय. ह्यावरून

सरकारास मदत करणें व कर सारखा असणें ह्या गोष्टी निराळ्या नसून एकच आहेत, हें तुमच्या आतां दृष्टोत्पत्तीस आलें असेल.

**ना० रा०**—कराच्या सारखेपणाविषयीं जें आपण आतां मला उलगडून सांगितलें तें माझ्या मनांत आलें; पण तो सर्वांवर सारखा असावा ह्याचें कारण काय तें मला कळत नाहीं.

**वा० ना०**—राव साहेब, जसें ज्याचें कमी ज्यास्त उत्पन्न असेल, तसा त्यानें सरकारच्या खर्चाचा कमी ज्यास्त वांटा उचलावा म्हणून जो शास्त्री बोवानीं नियम सांगितला आहे, त्याचें कारण मला असें वाटतें, कीं ज्याची संपत्ती फार त्यास सरकारच्या संरक्षणाची मदत फार होते; ज्याची कमी त्यास कमी होते. तेव्हां ज्यास फार मदत होते, त्यावर सरकारच्या खर्चाचा ज्यास्त अंश बसावा. आणि म्हणूनच गरीबापासून श्रीमंतापेक्षां कमी कर घ्यावा व श्रीमंतापासून ज्यास्त घ्यावा हें स्पष्ट झालें.

**खं० भ०**—नाईक तुम्हीं जें कारण सांगितलें तें एकांशीं खरें आहे, सर्वांशीं खरें नाहीं, असें मला वाटतें. मालमत्तेचा बचाव करणें एवढेंच सरकारचें काम नाहीं. जिवास धोका न लागूं देणें हेंही सरकारचें मुख्य काम आहे. कमी ज्यास्त संपत्तीचें कमी ज्यास्त संरक्षण होत असेल; पण सर्वांच्या शरीराचें सारखेंच संरक्षण होतें; एकाच्या कमी होतें व एकाच्या ज्यास्ती होतें, असें म्हणतां येत नाहीं. तर शरीराच्या संरक्षणाबद्दल सर्वांपासून सारखी नियमित रक्कम घ्यावी, व मालमिळकतीच्या संरक्षणाबद्दल प्रत्येक मनुष्याच्या ऐपतीप्रमाणें कमी ज्यास्त पैसा घ्यावा. हें मला रास्त दिसतें.

**ना० रा०**—वास्तविक पाहिलें तर ज्यांस सरकारच्या आश्रयाची विशेष गरज आहे त्यांजवर कराचें ओझें ज्यास्त पडावें. कल्पना करा कीं आज मुळींच सरकार नाहींसें झालें; व चोहोकडे झोटिंगपाच्छाई झाली, तर तोटा कोणाचा होईल?

**खं० भ०**—जे मनानें व शरीरानें दुर्बळ आहेत त्यांचा विशेष तोटा होईल ह्यांत संशय नाहीं. जे त्यांच्या पेक्षां अकलेनें व बलानें ज्यास्त आहेत, ते त्यांस दाबून टाकून आपले दास करून ठेवतील ह्यांत कांहीं भ्रांती नाहीं.

**ना० रा०**—तर मग आतां हें सहजच सिद्ध झालें, कीं जे अकलेनें व बलानें दुसऱ्यापेक्षां कमी आहेत, त्यांस सरकारच्या आश्रयाची विशेष जरूर आहे. आणि मालमत्तेचें व शरीराचें संरक्षण होण्याकरितां जर सरकारास आपण पैसे देतों, तर न्याय म्हटला म्हणजे ज्यांस त्यांच्या संरक्षणाची फार गरज आहे त्यांनीं सरकारास विशेष साह्य करावें म्हणजे त्यांच्यावर कर ज्यास्त असावा हें उघड झालें.

**गं० शा०**—आपण त्रिवर्गांनीं ह्या ज्या बारिक बारिक कल्पना काढल्या त्या ऐकून मला फार संतोष झाला. व आपल्या कुशाग्रबुद्धीची तारीफ केल्यावांचून मला राहवत नाहीं. असो. केवळ जिवाचा व मालमत्तेचा बचाव करावा इतकेंच सरकारचें काम आहे; ह्यापेक्षां अधिक नाहीं, असें आपलें म्हणणें आहेसें दिसतें; पण हें म्हणणें ग्राह्य नाहीं. सरकारचीं कामें नानाविध असून सरकार असण्याचे हेतुही ह्यापेक्षांही फार गहन व श्रेष्ट आहेत. लोकांच्या एकंदर सुखवृद्धीस व दुःख निवृत्तीस ज्या गोष्टी कारण आहेत, त्या साक्षात अथवा परंपरेनें सरकारच्या हातून घडण्यासारख्या असल्या, तर त्याही करणें सरकारचें कर्तव्य आहे. आणि ह्या दृष्टीनें पाहिलें म्हणजे जिवाचें व मालमत्तेचें संरक्षणाखेरीज आणखी शेकडों कामें सरकारावर येतात. तेव्हां रयतेच्या जिंदगीचें वगैरे संरक्षण करणें एवढेंच सरकारचें काम आहे, असें समजून ज्या आपण कल्पना केल्या, त्या आतां अर्थांतच नाहींतशा झाल्या; पण मालमत्तेचें संरक्षण करणें इतकेंच सरकारचें काम आहे, असें जरी धरलें, तरी नाईक, आपण म्हणतां, कीं ज्याची दौलत विशेष त्यास सरकारच्या संरक्षणाची मदतही

विशेष होते; परंतु हें म्हणणें कोणीही सुज्ञ पुरुष मान्य करील असें मला वाटत नाहीं. अहो १०००० रुपयांचें रक्षण करण्यास १००० रुपयांपेक्षां दसपट खर्च लागतो काय? जे न्यायाधीश, पोलीस सैन्य व आरमार १०००० चें रक्षण करतात तेच १००० चें करतात. मोठ्या उत्पन्नाच्या रक्षणास अवश्यक फार खर्च लागतो, व लहान उत्पन्नाच्या रक्षणास थोडा खर्च लागतो असें कांहीं प्रमाण नाहीं.

वा० ना०—सर्वांच्या शरीराचें सारखेंच संरक्षण होतें सबब तेवढ्यांबद्दल सर्वांनीं सारखाच पैसा देऊन सरकारास सहाय करावें असें भटजींचें म्हणणें पडलें, त्यावर रावसाहेबांनींही एक उत्तर दिलें; तर ह्याविषयीं आपलें कसें काय मत आहे?

गं० शा०—सरकारच्या आश्रयाचा लाभ फार कोणास होतो, हेंच जर पाहणें आहे, तर रावसाहेबांचेंच म्हणणें बरोबर आहे. व त्या दृष्टीनें पाहिलें तर जे निशक्त, भोळवट व थापडवाईक आहेत त्यांवर जे बळकट, धूर्त व कावेबाज आहेत, त्यांच्यापेक्षां कर ज्यास्त असावा असें सहजच होतें. पण हा अगदीं बाजारी न्याय झाला. ज्यानें ज्यास्त माल घेतला त्यानें ज्यास्त किंमत द्यावी ह्याप्रमाणेंच हें वरचें म्हणणें आहे; आणि ह्या न्यायानें पाहिलें तर सडकेबद्दल दस्तुरी डोळसापेक्षां अंधळ्यापासून ज्यास्त घ्यावी हें अर्थातच ठरतें. कारण सडकेपासून अंधळ्यास जितका फायदा आहे, तितका डोळस मनुष्यास नाहीं. आणि अंधळ्यापासून ज्यास्त घेणें म्हणजे ज्यावर ईश्वरानें अवकृपा केली त्यावर लोकांनींही अवकृपा करणें होय. परंतु एकंदर लोकघटनेचा पाया असा नाहीं. एकंदर ओघांत सर्वांस सारखा लाभ व्हावा असा मूळचा उद्देश आहे. आणि म्हणून अमुक एकास ज्यास्ती लाभ होतो असा कांहीं विचार नाहीं. लहान पंगू वगैरेस कमी व थोर व निकोप वगैरे लोकांस लाभ ज्यास्ती असा कांहीं भेद नाहीं.

ना० रा०—तर मग कर सर्वांवर सारखा असावा हा नियम आहे ह्याचें कारण तरी काय?

गं० शा०—वर्गणी करून एकाद्रें आपण काम करतों त्याचें जें कारण तेंच करच्याचें कारण समजावें. वर्गणी घालतांना त्या कामापासून फायदा फार कोणास होणार ह्याचा आपण कांहीं विचार करीत नाहीं. जो तो आपल्या अनुकुलतेप्रमाणें आंकडा टाकतो. तद्वतच सरकाराविषयीं प्रकार आहे. अत्यंत जुलमी सरकार असलें, तरी तें असल्यापासून जे लाभ आहेत त्यापेक्षां त्याच्या अभावीं शेकडोंपट हानी आहे. म्हणून सरकार असणें ह्यांत सर्वांचेंच हित आहे. अमुक एकाचें ज्यास्ती व अमुक एकाचें कमी असा कांहीं भेद करतां येत नाहीं. म्हणून सर्वत्रांनीं आपआपल्या ऐपतीप्रमाणें सरकारचा खर्च भागण्यास मदत करावी, म्हणजे कर सर्वांवर सारखा असावा.

ना० रा०—कर सर्वांवर सारखा असावा ह्याचा अर्थ व सारखा कां असावा ह्याचें कारण हीं आपण सांगितल्यावरून आम्ही स्पष्ट समजलों. आतां कराचे दुसरे नियम सांगा.

गं० शा०—नियम दुसरा. प्रत्येक मनुष्यानें सरकारास जो कर द्यावयाचा त्याची निश्चिती असली पाहिजे, म्हणजे कर वसूल करणारास तो हवा त्यावेळीं घेतां येऊं नये, अगर हवा तेव्हां वाढवितां येऊं नये अथवा कमी करतां येऊं नये. कर कोणाच्या वेळीं कसा व किती द्यावयाचा हीं सर्व कर देणारास व इतर लोकांस स्पष्टपणें माहीत असलीं पाहिजेत.

ना० रा०—हा जो आपण नियम सांगितला हा फारच उत्तम आहेसें दिसतें. हा नियम नसेल तर कर देणाराची शेंडी कर घेणाऱ्या अंमलदाराच्या हातांत पुष्कळ अंशीं राहील. जो मनुष्य त्यास त्रासदायक वाटेल त्याच्यावर ज्यास्त कर बसवितां येईल. अथवा ज्यास्त बसविण्याचें भय घालून त्याच्यापासून नजर नजराणा

काढतां येईल. ह्याप्रमाणें कर वसूल करणाऱ्या अंमलदारापासून कितीएक लोकांस फार तसदी पोहोंचेल.

**गं० शा०**—असा अंमलदार जुलूम करतील. पण ह्याशिवाय कराचे बाबतींत अनियमितपणा असल्यानें लोकांत जे अप्रिय असतात त्यांस उद्धटपणा व लबाडया करण्यास फार उत्तेजन मिळतें. आणि ह्याच कारणास्तव कराचें ओझें सर्वांवर सारखें नपडतां बरेंच कमी ज्यास्त पडलें, तरी त्याच्यापासून इतकी पीडा होत नाहीं, अशी कराचे कामांत यत्किंचित अनियमितपणा असल्यानें होते, असें कितीएक महान् महान् अर्थशास्त्रकारांचें दृढ मत आहे.

**खं० भ०**—कां नाईक हा नियम फारच चांगला आहे. बरें आणखी कोणचे नियम आहेत?

**गं० शा०**—तिसरा नियम. कोणचाही कर अशा वेळीं व अशा रीतीनें घ्यावा कीं तो देणारास बहुत करून त्यापासून गैरसोय वाटूं नये. उदाहरण. सरकारी नौकरांच्या पगारावर जो कर घ्यावयाचा तो पगाराच्या दिवशीं पगारांतून कापून घेतला तर त्यांत देणारास फारशी अडचण पडणार नाहीं. ह्याप्रमाणें घराच्या वगैरे भाड्यावरील कर ज्या वेळेस तें भाडें येतें त्या वेळेस वसूल करावा म्हणजे तो देणारास सोयीवार पडतें. साखर, चहा, बुंद वगैरे ऐष आरामीचे पदार्थ आहेत, त्यांवर जे कर असतात, ते कर अखेरीस जो मनुष्य देतो तो ते आपल्या सोयीनेंच देतो.

**वा० ना०**—शास्त्रीबोवा, चहा वगैरे ऐषआरामीचे जे पदार्थ आहेत त्यांवरील कर जो दुकानदार वगैरे प्रथम ते विकत आणतो तो ते देऊन आणतो; तेव्हां त्यास सोयीवार तें कसें पडतें?

**गं० शा०**—ऐषआरामीचे वगैरे जेवढे पदार्थ आहेत, त्यांवरील कर अखेरीस जे त्याचा उपभोग घेतात, त्यांच्यावर पडतो. प्रथम तो कर दुकानदार देतो खरा, पण त्या मालांची त्या प्रमाणानें किंमत वाढवून तो आपण दिलेला पैसा काढून घेतो,

असा सामान्य नियम आहे. पण सर्वच पदार्थांवर सारखा कर बसला तर तो देणारावर पडतो, उपभोग घेणारावर पडत नाहीं. असो. ऐषआरामांचे पदार्थ ज्या ज्या वेळेस मनुष्य ते विकत घेतो त्या त्या वेळेस थोडथोडा कर देऊन तो ते विकत घेतो आणि ज्याअर्थीं ते पदार्थ घेणें हें प्रत्येक मनुष्याच्या खुषीवर आहे. त्याअर्थीं त्यावरील करापासून त्याची गैरसोय झाली असतां, त्या मनुष्याचा तो दोष आहे. सरकारचा नाहीं.

**वा० ना०**—तर मग आतां करांत दोन भेद झाले. कांहीं कर आपण साक्षात देतों; व कांहीं दुसऱ्याच्यां द्वारानें देतों.

**गं० शा०**--होय असे दोन भेद आहेत. असो. चवथा नियम असा आहे कीं, कर असा असावा कीं, तेणेंकरून रयतेच्या घरांतून जो पैसा निघेल, त्यापैकीं जितका सरकारच्या पेटींत जाईल तितका जावा म्हणजे जितका पैसा रयतेच्या घरांतून निघेल तितका सरकारच्या तिजोरींत जावा अगर सरकारच्या तिजोरींत जातो तितकाच रयतेच्या घरांतून निघावा.

**ना० रा०**—ह्या नियमाचा हेतु मला समजत नाहीं. जितका पैसा रयतेच्या घरांतून जातो तितका सरकारच्या घरांत जात नाहीं काय? जर जात नाहीं म्हणावा तर त्याचें मध्यें काय होतें?

**गं० शा०**—कराच्या रकमेपेक्षां रयतेपासून ज्यास्त पैसा निघतो अथवा सरकारांत जितका कराचा पैसा येतो त्यापेक्षां ज्यास्ती बाहेर मुरतो म्हणून सांगितलें, त्यास तसें घडण्याचे दोन चार प्रकार आहेत. एक प्रकार असा आहे कीं, कर वसूल करण्यास पुष्कळ नौकर लागून वसुलाचा बराच अंश त्यांचे पगार खाऊन जातात. शिवाय त्यांची नजर नजराण्याच्या लोकांवर कदाचित आणखी कर बसतो. दुसरा प्र० चांगल्या उत्पन्नाच्या कारखान्यांतून भांडवल व श्रम निघून कमी उत्पन्नाच्या कारखान्यांत कदाचित जातात. तिसरा प्र० जे लोक कर देण्याची टाळाटाळ करतात, पण अखेरीस तो देण्याचे कांहीं त्यांस सुटत नाहीं, अशा लोकांस जो दंडखंड होतो.

त्या दंडाचा वगैरे पैसा करापेक्षां ज्यास्ती त्यांचे घरांतून निघतो आणि तेणेंकरून ते कधीं कधीं इतके मातीस मिळतात कीं त्यांचे भांडवलापासून लोकांस विपक्षीं जे लाभ झाले असते, ते होत नाहींत. एखादा असा कांहीं अविचारानें कर बसविला असतो, कीं तो चुकवून जाण्याचा मोहच उत्पन्न व्हावा. चवथा प्र० कर गोळा करणारे अम्मलदार वारंवार लोकांकडे जाऊन तपासणी करतात तेणेंकरून रयतेस त्रास व इजा व जुलूम हीं होतात. ह्याशिवाय आणखी एक असा प्रकार आहे, कीं कर चुकवितां येऊं नये म्हणून उदीम, कारखानें ह्यांवर कांहीं प्रतिबंध ठेवले असतात; त्यांपासून उगीच फार खर्च लागतो इतकेंच नाहीं; पण त्या त्या कामांत सुधारणा होण्यास अनिवार्य हरकती येतात.

वा० ना०—शास्त्रीबोवा, आपण जे वर प्रकार सांगितले, त्यांत एक असा प्रकार सांगितला, कीं चांगल्या उत्पन्नाच्या कारखान्यांतून भांडवल निघून कमी उत्पन्नाच्या कारखान्यांत जातें, तें कसें हें मी समजलों नाहीं; तर तेवढें कृपा करून फोडून सांगा.

**गं. शा.**—एखाद्या विशेष प्रकारच्या मालाच्या कारखान्यावर अथवा विशेष प्रकारच्या मालावर कर बसला तर त्या मालाची किंमत चढते. आणि एकच माल जर दोन तऱ्हेनें तयार होत असेल तर ज्या तऱ्हेनें तो स्वस्ता पडेल त्या तऱ्हेनें तो अर्थाच लोक तयार करूं लागतील. कारण एकच माल असून त्यांत दोन भेद आहेत; पण दोन्हींही गुणानीं प्राय: सारखे आहेत. तर ज्या जातीचा स्वस्ता मिळेल तो लोक फार घेतील; आणि ज्याचा लोकांत खप फार तो तयारही फार होईल हें उघडच आहे. आतां कर बसल्यामुळें ज्या जातीच्या मालाची किंमत ज्यास्त वाढली तो जरी पूर्वी थोड्या श्रमानें व पैशानें पुष्कळ उत्पन्न होत असला, तरी तो पुढें तयार होण्याचा बंद होईल, म्हणजे लोक त्या कारखान्यांतलें

भांडवल काढून कमी उत्पन्नाच्या कारखान्यांत घालतील. तें मी तुम्हास उदाहरणानें व्यक्त करून दाखवितों. ऊस व खजूर यां-पासून साखर तयार होते हें तुम्हास माहीत आहे. आतां समजा, कीं १०० रुपये खर्च केले व २०० मनुष्यें खपलीं म्हणजे उसा-ची १०० मण साखर तयार होते; व तितक्याच खर्चानें व श्रमानें खजुराची ८० मण साखर तयार होते. २०० मजुरांची मजुरी ७०० रुपये धरली तर उंसाची साखर ८ रुपये मण पडते व ख-जुराची १० रुपये मण पडते. आतां आपण असें कल्पूं कीं उसाच्या साखरेवर सरकारानें मणी तीन रुपये कर बसविला. त्या कारणानें ती अकरा रुपये मण झाली. व महाग झाली म्हणून ती लो-कांनीं मुळींच खावयाची सोडून देऊन ते खजुराची साखर खाऊं ला-गले, आणि खजुराच्या साखरेचा खप वाढला म्हणून अर्थातच लोक ती फार पिकवूं लागले. आतां पूर्वींपेक्षां मणी जे दोन रुपये हल्लीं ज्यास्ती बसतात, ते साखर पिकविणाराचे अंगावर बसत नाहींत; ती खाणाराचे अंगावर बसतात. ह्यावरून उसाच्या साखरेवर कर बसविल्या कारणानें खजुराची साखर खाणारा जे दर मणास दोन रुपये पूर्वींपेक्षां ज्यास्त देतो, ते सरकारचे घरांत न जातां खजुरा-ची साखर पिकविणारास ज्यास्ती खर्च बसतो तो निघण्याकरितां त्याचे घरांत जातात, इतकेंच नाहीं; पण जे शंभर रुपये व २०० मजूर ह्यांजवर १०० मण साखर पिकत होती, तेच रुपये व तेच मजूर ८० मण आतां साखर तयार करतात, म्हणजे तेंच भांडवल व तोच श्रम हीं कराच्या कारणानें चांगल्या उत्पादक कारखान्यांतून निघून कमी उत्पादक कारखान्यांत गेलीं.

**ना. रा.**—शास्त्रीबोवा, आतां हें आपण फारच चांगलें मनांत भरवून दिलेंत. असो, ह्याखेरीज आणखी एखादा नियम आहे?

**गं. शा.**—कितीएक ग्रंथकारांनीं आणखी असा एक नियम घालून ठेविला आहे, कीं कोणाचाही कर भांडवलावर पडूंनये, उ-त्पन्नावर पडावा; पण ह्या नियमाची तादृश अवश्यकता मला दिस-

त नाहीं. कारण कर भांडवलावर पडणें, हें कांहीं विशेष प्रकारच्या कराचें फल नाहीं. जो कर माफक आहे, तो प्राय: भांडवलावर पडत नाहीं; पण जो कर असावा त्यापेक्षां ज्यास्ती आहे, तो बहुत करून भांडवलावर पडतो. जो देश गरीब आहे, त्या देशांत भांडवलावर थोडा बहुत कर बसत नाहीं, असा कर विरळा. जेथें भांडवल पराकाष्ठेचें वाढलें आहे, व दिवसें दिवस सपाट्यानें वाढत आहे, त्या देशांत कर थोडा बहुत भांडवलावर पडल्यास चिंता नाहीं; पण जो देश अत्यंत दरिद्री आहे, व जेथें भांडवल नसल्यामुळें फारसे उद्योग होत नाहींत, अथवा मोठाले कारखाने चालत नाहींत, तेथें भांडवल कमी न होतां वृद्धिंगत होण्याची तजवीज राखणें अवश्यक आहे. आणि म्हणूनच ज्या करांच्या योगानें देशांतील भांडवल कमी होईल, असे कर मुळींच न बसविण्याची सरकारानें फार खबरदारी ठेविली पाहिजे.

वा० ना० आपण आतां कराविषयीं दोन चार नियम सांगितले, त्यांत कर सर्वांवर सारखा असावा असा पहिला नियम आहे. ह्या नियमाच्या संबंधानें पाहिलें असतां मला असें वाटतें, कीं सर्व मनुष्यांच्या मिळकतींतून एक नियमित अंश घेतला तर कराचें कोणास जास्त अथवा कमी ओझें वाटणार नाहीं.

ना० रा० नाईकानीं जी कल्पना काढली ती फार सुंदर आहे; पण त्यावर माझें एक बोलणें आहे. प्रत्येक मनुष्याच्या मिळकतीचा नियमित अंश घेतला तर सर्वांस सारखेंच ओझें वाटेल असें नाहीं. ज्यास ५०० रुपये उत्पन्न आहे त्याच्या पासून त्या उत्पन्नाचा दशांश म्हणजे ५० रुपये कर घेणें हें पांचशें रुपये उत्पन्नवाल्यास जितकें जड वाटेल तितकें १,००००० रुपयांच्या उत्पन्नांतून १,००० रुपये घेणें दहा हजार रुपये उत्पन्नवाल्यास वाटणार नाहीं. म्हणून जसजसें उत्पन्न वाढत जाईल तसतसा शेंकडा वाढविला असतां सर्वांवर कराचें सारखें ओझें पडेल. कोणावर जास्ती पडणार नाहीं, व कोणावर कमीही पडणार नाहीं.

**गं० शा०** रावसाहेब, नाईकांच्या बोलण्यावर जो आपण अ-क्षेप घेतला त्यांत थोडासा तथ्यांश आहे. लहान उत्पन्नावरील कर खाण्यापिण्याच्या पदार्थांत कमी करून द्यावा लागतो; व मोठ्या उ-त्पन्नावरील कर ऐषअरामीच्या पदार्थांत कमी करून द्यावा लागतो. ज्यास २०० रुपये सालीना उत्पन्न आहे व तितक्या उत्पन्नांत जो मोठ्या काटाकांटीनें संसार करतो त्यास वर्षास २० रुपये कर देणें म्हटलें म्हणजे खाण्यापिण्यांत अगर वस्त्राप्रावर्णांत कसर काढून तो दिला पाहिजे. पण ज्यास हजार रुपये उत्पन्न आहे त्याची गोष्ट निराळी आहे.

**खं० भ०**—खरेंच शास्त्रीबोवा; ज्यास थोडें उत्पन्न आहे, त्यास कर देणें म्हणजे पोटास चिमटाच घ्यावा लागेल, पण ज्यास पुष्कळ उत्पन्न आहे त्याच्या खाण्यापिण्यांत कमतर न होतां फक्त चैनींत मात्र कमी पडेल. म्हणूनच गरीबास जितकें कराचें ओझें आहे तितकें श्रीमंतास नाहीं.

**गं० शा०**—ह्याच कारणास्तव ज्यावेळेस आपल्यावर इन्कंमटयाक्स म्हणजे प्राप्तीवर कर बसला होता, त्यावेळेस दोनशें रुपयांच्या आंतील उत्पन्नें अजी सोडलीं होतीं.

**ना० रा०**—हल्लीं जी आपल्यावर उदीम पट्टी बसली आहे ती देखील दोनशें रुपयांच्या वरील उत्पन्नावर आहे; आंत नाहीं. मी आपल्यास त्याबद्दलचा आक्टातील ठराव दाखवितो

**वा० ना०**—परंतु दोनशेंच रुपये सर्वांच्या निर्वाहास पुरतात असें कोणाच्यानें म्हणवेल? कोणास दोनशें रुपये लागतात कोणास, चारशें रुपये लागतात.

**गं० शा०**—सर्व साधारण नियम करतांना कांहीं विशेष गोष्टी मनांत आणून चालत नाहीं. पुष्कळ लोकांस जी सामान्यतः गोष्ट लागू पडेल तिच्या धोरणानें नियम करावा लागतो. तसें नकेलें तर लोकांस लबाड्या जुलूम वगैरे करण्यास सवड फावेल. पूर्वीं तीन चार मनुष्यांच्या कुटुंबाला सालीना दोनशें

रुपयांचें उत्पन्न रगड होई. आणि अशाच विचारानें प्राप्तीव-रच्या कराच्या वेळेस दोनशें रुपयांच्या आंतील उत्पन्नावर कर माफ केला होता. ह्याप्रमाणें जेवढी रक्कम साधारण कुटुंबाच्या निर्वाहास अवश्य आहे तेवढी बाद करून बाकीच्या उत्पन्नावर सरसकट सारखा अंश घेतला असतां **इनकंटॅक्स** म्हणजे प्राप्तीवर कर ह्यासारखा कर प्रायः नाहीं.

**ना० रा०**—शास्त्रीबोवा, आपण म्हणता कीं सर्व उत्पन्नावर सारखा अंश बसवावा; पण हें मला वाजवी दिसत नाहीं. कितीएक उत्पन्नें निरंतर चालणारीं असतात व कितीएक कांहीं नियमित कालपर्यंत चालणारीं असतात. तर दोन्हीही उत्पन्नांतून एकसारखाच अंश घ्यावा? गहाणदार, जमीनदार, इनामदार वगैरे ज्यांस निरंतर चालणारीं उत्पन्नें आहेत, त्यांच्यापासून त्यांच्या उत्पन्नाचा दशांश घेणें; व नौकर, उदमी, सावकार वगैरे ज्यांचीं शाश्वत उत्पन्नें नाहींत, त्यांच्या उत्पन्नाचाही दशांश घेणें म्हणजे अन्याय करणें नाहीं काय?

**गं० शा०**—दोन्हीं प्रकारच्या उत्पन्नांतून एकच अंश घेऊं नये असें जें आपलें म्हणणें आहे, ह्याचें कारण तरी काय?

**ना० रा०**—ह्याचें कारण मिळून इतकेंच कीं ज्याचें निरंतरचें उत्पन्न आहे, त्यास वृद्धापकाळाकरितां अथवा पुढें आपल्या पोराबाळाकरितां द्रव्य संचय करून ठेवण्याची गरज नसते; परंतु ज्याचें उत्पन्न अशाश्वत आहे, त्यास चार पैसे संग्रह करून ठेवावा लागतो. तेव्हां सर्व प्रकारच्या उत्पन्नांवर सारखा अंश बसविला तर संग्रह केलेल्या द्रव्यावर व खाण्यापिण्यांत उडविलेल्या द्रव्यावर सारखाच कर घेतला असें होणार नाहीं. आणि असें झाल्यानें कराचें ओझें सर्वांवर सारखें असावें हा जो कराच्या सारखेपणाविषयींच्या नियमांचा पाया त्याचा अगदीं भंग होईल.

**गं० शा०**—संचय करून ठेवलेल्या पैशावर कर कमी असावा अथवा प्रायः नसावा असा जो आपल्या म्हणण्यांतला

भावार्थ तो खरा आहे; पण कोणीं मनुष्यानें किती पैसा शिलक टाकला हें कळणें फार कठीण आहे. तें बराबर कळण्यास शेंकडों हरकती आहेत. शिलक टाकलेल्या पैशावर कर सुटतो म्हणून कोणीं एक साल टाकलेली शिलक पुढल्या सालांत खर्च करील; अथवा एका हातानें संचय करील आणि दुसऱ्या हातानें कर्ज काढील; ह्या प्रमाणें कर टाळण्याकरतां लोक शेंकडों युक्त्या लढवितील. बाकी संग्रह कोण किती करतें बरोबर कळेल तर संग्रह केलेल्या द्रव्यावर कर न सावा असें माझें ही मत आहे. पण व्यवहारांत तसें होणें मुष्कल आहे. शिवाय ह्या मतावर एक दोन अक्षेपही आहेत; पण ते फारसे विचार करण्यासारखे नाहींत. असो, रावसाहेब आपण ह्या नवीन बसलेल्या उदीमपट्टीच्या आक्टांतील कांहीं एक विशेष ठराव दाखवितों म्हणून म्हणालांत, तर तो आक्ट आपल्या जवळ असल्यास एकदा समग्र वाचा पाहूं.

**ना० रा०**—होय शास्त्रीबोवा त्या आक्टाची मी एक प्रत आणविली आहे, ती मी आपणास एकवार वाचून दाखवितों. ( असें म्हणून आक्ट वाचतो. )

**गंगा० शा०**—हा जो आपण आक्ट वाचला ह्यावरून हें तर स्पष्ट झालें, कीं कांहीं थोड्या प्रकारचीं उत्पन्नें खेरीज करून बाकी सर्व प्रकारच्या उत्पन्नावर हा कर आहे. तेव्हां इन्कंटयाक्स आणि हा कर जवळ जवळ सारखेच आहेत असें म्हटल्यास कांहीं बाध नाहीं.

**वा० ना०**—शास्त्रीबोवा, मघाशीं आपल्लें एक दोनदां असें म्हणणें पडलें, कीं एक दोन गोष्टी सोडून जर प्राप्तीवर कर बसविला, तर त्या करासारखा चांगला कर नाहीं. आणि आतां आपण असें म्हणालांत, कीं नवीन बसलेला कर व प्राप्तीवरचा कर हे दोन्ही जवळ जवळ सारखेच आहेत. तेव्हां हा नवीन बसलेला करही चांगलाच आहे, असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं.

गं० शा०—इनकंटयाक्स चांगला म्हणून मी आपल्यास मेघाशीं सांगितलें, पण सर्व दृष्टीनें तो चांगला नाहीं. केवळ उपपत्तीच्या दृष्टीनें पाहिलें असतां त्यासारखा चांगला कर नाहीं खरा; पण व्यवहार दृष्टीनें पाहिलें, तर त्यासारखा जुलमी व अन्यायाचा कर प्राय: नसेल.

खं० भ०—त्या करास व्यवहारदृष्ट्या कोणच्या अडचणी आहेत?

गं० शा०—प्रत्येक मनुष्याची प्राप्ती काय हें समजण्यास अनिवार्य अडचणी आहेत. भाडीं, मुषाहिरे, वार्षीक नेमणुका इत्यादिक जीं निश्चित उत्पन्नें आहेत; तीं कळण्यास फारशी अडचण नाहीं; परंतु व्यापार, उदीम, धंदे इत्यादिकांत जे फायदे होतात ते निश्चित नसतात. एखाद्या धंद्यांत अमुक कमाई होईल हें जर निश्चयरूप तो धंदा करणारास कळत नाहीं, तर इतरांस कळण्याविषयीं बोलावयासच नको. तेव्हां लोक जीं उत्पन्नें लिहून देतील, त्यांवर अर्थातच भरंवसा ठेवला पाहिजे.

खं० भ०—कोणीं आपलें खोटें कां उत्पन्न लिहून देईल? खोटें लिहून देणारास सरकारची धास्ती नाहींकां?

गं० शा०—भटजी आपल्यावरून जगाची परिक्षा करूं नका. तुम्ही कदाचित आपलें खरें उत्पन्न लिहून द्याल; पण सर्वच लोक तुमच्या सारखे प्रामाणिक कोठें आहेत. सर्व जग जर नीतीमान असतें, तर सरकारची व सरकारच्या एवढ्या खटाटोपाची व तन्मूलक कराची प्राय: गरज नसती; पण तसा प्रकार नाहीं, म्हणून सिबंदी, पोलीस, न्यायाची कोडतें ठेवलीं आहेत. तथापि शेंकडो लोक लबाड्या करीतच आहेत. शिवाय उत्पन्नाची अशी कांहीं एक विशेष गोष्ट आहे, कीं अमुक मनुष्याचें निश्चित अमुक एक उत्पन्न आहे हें दुसऱ्यास सांगतां येणें फार कर्म कठीण आहे. प्राय: सांगतां येणारच नाहीं. आणि कोणचीही गोष्ट निर्विवादपणें सिद्ध झाल्याखेरीज कोणीही मनुष्य शिक्षेस पात्र होत नाहीं असा कायदा

चा मूलभूतसिद्धांत आहे. ह्यावरून खोटीं उत्पन्नें लिहून दें णारास शिक्षा होण्याचा किती संभव कमी आहे, हें आतां तुमच्या लक्ष्यांत आलें असेल.

**वा० ना०**—प्रत्येक मनुष्याचें उत्पन्न बरोबर कळण्याची खरोखर पंचाईत आहे खरी. पण ह्याशिवाय ह्या करापासून होणाऱ्या आणखी कांहीं अडचणी आहेत काय?

**गं० शा०**—ही जी आतां अडचण सांगितली ही काय जबरदस्त कमी आहे? हिच्यापासून आणखी एक दोन अन्याय होतात; त्याचा विचार केला तर तुम्हास वाईट वाटल्यावांचून राहणार नाहीं.

**वा० ना०**—शास्त्रीबोवा, असे कोणचे ते अन्याय?

**गं० शा०**—जे प्रामाणिक व पापभिरु आहेत, ते आपलीं खरीं खरीं उत्पन्नें लिहून देतील; व जे लबाड असून ज्यांस पाप पुण्याची भीति नाहीं ते पैशाच्या लोभानें आपलीं खरीं उत्पन्नें लिहून देणार नाहींत. आणि मग अर्थातच प्रामाणिक लोकांवर ज्यास्त कर बसेल आणि अप्रामाणिक लोकांवर कमी बसेल. म्हणजे सद्गुणावर कर आणि दुर्गुणास माफी असें सहज होईल.

**ना० रा०**—परंतु टयाक्स **कमिशनर** म्हणजे कराच्या कामावरील अधिकारी ह्यास ज्याचें जसें कमी ज्यास्त उत्पन्न वाटेल, तसा त्याच्यावर कर कमी ज्यास्त करण्याचा अधिकार असतो. तेव्हां लबाड लोकांनीं आपला आदाय बरोबर न लिहून दिल्यास त्यांच्यावर त्यांच्या आदायाप्रमाणें त्यास कर वाढविता येईल; मग अर्थातच लबाड लोक योग्य कराच्या अंशापासून सुटतील असें कसें होईल?

**गं० शा०**—रावसाहेब, कोणा मनुष्यास एखादा रोग झाला असला म्हणजे वैद्य त्यावर औषध देतो; पण कधीं कधीं औषध असें कांहीं चमत्कारिक असतें, कीं त्यापासून तो रोग बरा न होतां, दुसरीच व्याधी उत्पन्न होते. तद्वत ह्या आपल्या बोलण्याचा प्रकार झाला. करापासून होणारी जी अडचण मी दाखवि-

ली, तिचें निवारण करण्यास आपण दुसरें कारण दाखविलें, त्यापासून दाखविलेली अडचण तर दूर होतच नाहीं; पण त्या लोकांस आणखी पीडा मात्र होण्याचा विशेष संभव आहे.

**खं० भ०**—-तो कसा शास्त्रीबोवा?

**गं० शा०**—कराच्या कामावरील अधिकारी निश्चयें करून प्रामाणिक व निःपक्षपाती असेल असा कांहीं नेम नाहीं. बरें तो खरा व ज्याप्रमाणें त्याच्या मनास भावेल तसा वर्तणारा आहे, असें जरी आपण धरलें, तरी तो मनुष्यच आहे. मनुष्य कांहीं अंतरसाक्ष नाहीं. शिवाय त्याची मतीही कोती आहे. अमुक मनुष्य लबाड किंवा अमुक मनुष्य प्रामाणिक ह्याची पारख करणें अलौकिक बुद्धिवान पुरुषास देखील कठीण, मग साधारण मनुष्यापासून त्याची अपेक्षाच करावयास नको. खेरिज लबाड, पण तोंडपुजे, मिठ्ठा बोलणारे, व आर्जवी अशा प्रकारचे लोक सामान्यतः जनास प्रिय असतात, व जे खरे पण खडखडीत, कटु भाषण करणारे व निर्भिड असे मनुष्य प्रायः लोकांस आवडत नाहींत. आणि मनुष्य जरी स्वतः सच्चा व निर्भिड असला, तरी दुसऱ्याचा सच्चेपणा व निर्भिडपणा हीं त्यास अवडतीलच असें नाहीं. इतकेंच नाहीं, पण कधीं कधीं तीं त्याची इतराजीही होण्यास कारण होतात. शिवाय मनुष्याची न्यायबुद्धी ढळविण्यास जसा पैसा कारण आहे. तद्वतच राग, लोभ, मद मत्सर इत्यादिक अंतःकर्णवृत्तिही कारण आहेत. ह्यावरून खरा व निःपक्षपाती अधिकारी असला तथापि त्याच्या हातून नेहमी बरोबरच कांम होईल असें निश्चयानें म्हणवत नाहीं. खेरीज सर्व लोकांची त्यास माहिती असणें अशक्य आहे. तेव्हां ती मिळण्याकरितां त्यास हाताखालच्या नौकरांवरच अवलंबून राहिलें पाहिजे. इत्यादिक सर्व गोष्टींवरून रयतेवर जुलूम होण्यास किती वाटा आहेत हें आतां तुमच्या मनांत आलें असेल.

**खं० भ०**—-ही जर खऱ्या व निःपक्षपाती अधिकाऱ्याची गोष्ट

आहे तर लबाड व पक्षपाती अधिकाऱ्यांविषयीं बोलावयासच न
को. त्याचा आपल्यास अनुभव आहेच.

गं० शा०—ह्याचप्रमाणें **इनकंटॅक्स**च्या अंगीं दोन चार
दोष आहेत, त्यामुळें तो कर सर्वांवर सारखा पडतो हा जो कां
हीं त्याच्या अंगचा गुण त्यावर पाणी पडतें. ह्या इनकं
टॅक्साच्याच जोडीचा प्रस्तुतचा **लायसेन्सटॅक्स** आहे; पण
त्यांत जे गुण आहेत तेही ह्या **लायसेन्सटॅक्स**ांत नाहींत.
असो. व्यवहारदृष्ट्या **इनकंटॅक्स** व त्यासारखे दुसरे कर फार
त्रासदायक व छळणुकीचे आहेत; आणि म्हणून कितीएक महान
महान पंडितांचें असें मत आहे, कीं सरकारावर एखादी मोठी
बलकुबल येऊन पैशाची मोठी तंचाई पडेल व पैसा उत्पन्न
करण्यास दुसरा मार्ग नसेल त्यावेळेसच तेवढे मात्र असले कर
बसवावे इतर वेळीं बसवूं नये.

**ना० रा०**—आपण आतां म्हणालांत, कीं **इनकंटॅक्स**ांत
जे गुण आहेत तेही हल्लींच्या **लायसेन्सटॅक्सां**त नाहींत; तर ते
कोणचे गुण हें कृपाकरून सांगा.

**गं० शा०**—तें सांगण्यापूर्वी ह्या कराचें ओझें कोणावर
पडतें ह्याचा विचार प्रथम केला पाहिजे. साधारण अनुमा
नानें असें दिसतें, कीं रात्रंदिवस खपून निढळच्या घामानें पैसा
मिळविणारे जे कारागीर, उदमी, मजूर वगैरे लोक ह्यांजवर हा
कर प्राय: पडतो. आणि ज्यांच्यावर कर वास्तविक बसावा
असे जे मोठमोठे जमीनदार वगैरे श्रीमान लोक त्यांवर तो
पडत नाहीं हें तुमच्या आतां पुढें दृष्टोत्पत्तीस येईल. तुम्ही
एकदां तो उदीमपट्टीविषयींचा आक्ट कलमवार वाचा. आ
णि जसजसा तो तुम्ही वाचीत जाल तसतसा आपण त्यांतील
प्रत्येक कलमाचा विचार करूं.

**वा० ना०** शास्त्रीबोवा, आपण आतां असें म्हणालांत कीं,
पोटा करितां रात्रंदिवस श्रम व दगदग करणारे व्यापारी, उ-

द्मी, मजुर कारागीर वगैरे लोकांस हा कर द्यावा लागतो. व पूर्वीं एक आपण असें सांगितलें आहे कीं, रयत किती एक कर साक्षात देते व किती एक दुसऱ्याच्या मार्फत म्हणजे परंपरेनें देते. तर त्या पैकीं दुसऱ्या जातीचा हा कर आहेसें दिसतें. ज्या उदम्यांवर व कारागिरांवर हा कर बसेल, ते आप आपल्या मालाची किंमत चढवून आपण दिलेला कर काढून घेतील. व अखेरीस जे त्या मालाचा उपभोग घेतील त्यांवर हा कर पडेल. सारांष हा कर कितीकांवर दुबार बसेल; म्हणजे कितीएकांस आपल्या धंद्याच्या उत्पन्नाबद्दल कर द्यावा लागेल तो एक व जे पदार्थ ते खातील अथवा ज्याचा ते उपभोग घेतील त्या पदार्थास ज्यास्त किंमत देऊन दुसऱ्यांनीं दिलेला कर ही त्यास द्यावा लागेल तो एक अशा दोन तऱ्हांनीं त्यावर कर बसेल.

**गं० शा०**——आतां हा प्रस्तुचा कर सर्वप्रकारचे धंदे व पेशे ह्यांजवर आहे हें तर तुम्हास ठाऊकच आहे. बरें, तुम्ही म्हणता, कीं उदमी वगैरे लोक आपआपल्या मालाची किंमत चढवितील. जर सर्व प्रकारच्या धंद्यांवर हा कर आहे. तर सर्वप्रकारच्या मालाच्या किंमती चढल्या पाहिजेत हें उघड आहे.

**बा० ना०**——हो अलबत सर्व जातीच्या जिन्नसांच्या किंमती चढतील हें सांगावयासच नको.

**गं० शा०**——सर्वप्रकारच्या मालाच्या किंमती वाढतील हें जें आपलें म्हणणें आहे हें केवळ भ्रांतीमूलक आहे. उदाहरणार्थ आपण दोन तीन जिन्नस घेऊं. समजा, आज गहूं रुपायाचे दोन पायली आहेत, बाजरी रुपायाची चार पायली आहे, व डाळ रुपायाची एक पायली आहे. उद्यां कांहीं कारणानें वर सांगितलेल्या तिन्हीही धान्याचा भाव उतरला. म्हणजे गहूं रुपायाचे ४ पायली, बाजरी ८ पायली व डाळ दोन पायली मिळूं लागली. आतां हें एक तुम्ही लक्ष्यांत धरलें पाहिजे कीं कोणचा एखादा पदार्थ देऊन त्याबद्दल दुसरा एखादा पदार्थ

मिळण्याची जी त्याची योग्यता तिचें नांव किंमत. द्रव्यरूपानें जी पदार्थाची किंमत तीस मोल अशी पारिभाषिक संज्ञा आहे. अमुक एक पदार्थ रुपयास अमुक मिळतो म्हणजे त्या पदार्थास अमुक मोल पडतें. असा लोकांतही म्हणण्याचा परिपाठ आहे.

वा० ना०—मोल व किंमत ह्या दोन शब्दांत आपण आज चमत्कारिक भेद सांगितलात रूढींत दोन्ही ही शब्दांची एकाच अर्थीं योजना करतात. व आपण सांगितला असा यांत कांहीं भेद करित नाहींत.

गं० शा०—असो जें आपण धान्यांचें उदाहरण कल्पिलें आहे. त्या धान्यांत परस्पर संबंध दाखविणारा जो रुपाया तो गाळून टाकूं. कारण रुपये, पैसे हीं केवळ टिकिटें आहेत. त्यांपासून मनुष्यास डोळ्याच्या संतोषापलीकडे कांहीं सुख होत नाहीं. परंतु सुखाचा पाया मुख्य पैसा अशी जी सामान्य सर्व लोकांची समजुत आहे, तिचें कारण इतकेंच कीं सुखोप भोगाचे पदार्थ मिळण्या करितां सर्वत्र सोईसाठीं तो साधन करून ठेविला आहे. म्हणून पैसाच काय तें सुख असें लोकांस वाटतें. असो त्या उदाहरणांतून रुपया गाळून टाकला तर मग प्रथम असें प्रमाण राहील. दोन पायली गहूं देऊन चार पायली बाजरी मिळेल अगर एक पायली डाळ मिळेल. अथवा चार पायली बाजरी देऊन दोन पायली गहूं अगर एक पायली डाळ मिळेल. अथवा एकपायली डाळ देऊन दोन पायली गहूं अगर चारपायली बाजरी मिळेल. पुढे भाव उतरल्यावर किंमतींत कांहीं तफावत होणार नाहीं. चार पायली गव्हांस आठ पायली बाजरी व दोन पायली डाळ, अथवा आठ पायली बाजरीस चार पायली गहूं व दोनपायली डाळ, अथवा दोन पायली डाळीस चार पायली गहूं व आठ पायली बाजरी ह्याप्रमाणें दुप्पट देऊन दुप्पट माल मिळेल किंमतीच्या संबंधानें कांहीं एक भेद होणार नाहीं. भाव मात्र बदलेल. ह्याप्रमाणेंच सर्व प्रकारच्या जिनसांची गोष्ट आहे तेव्हां सर्व पदा-

यांच्या किंमती वाढतील ह्या म्हणण्यांत अगदीं चूक आहे. एका-द्या बागांतील सर्व झाडें एकाच वेळीं एकमेकांपेक्षां उंच होतील अथवा शर्तीचे घोडे धांवतांना एकाच वेळीं सर्व एकमेकांपुढें जातील हें म्हणणें जितकें सयुक्तिक आहे, तितकेंच सर्व मालाच्या एकदम किंमती वाढतील हेंही म्हणणें सयुक्तिक आहे.

वा० ना०——सर्व मालाच्या एकदम किंमती जरी न वाढल्या तरी भाव चढेल ह्यांत कांहीं शंका नाहीं. मालाच्या किंमती चढतील असें जें मी मघाशीं म्हणालों त्याचा अर्थ मोल अगर भाव चढेल असाच होता.

गं० शा०——सर्व प्रकारच्या फायद्यांवर सर्व साधारण सारखा कर बसविला तर कोणच्याही मालाची किंमत वाढत नाहीं. एखाद्या विशेष प्रकारच्या उत्पादक कारखान्यापासून होणाऱ्या फायद्यावर कर बसविला तर त्या कारखान्यांतून उत्पन्न होणाऱ्या मालाची किंमत व भाव हीं चढतात; असा साधारण नियम आहे.

खं० भ०——शास्त्रीबोवा, ह्या नियमाचें कारण तरी काय?

गं० शा०——ह्याचें कारण मिळून इतकेंच, कीं एखाद्या विशेष प्रकारच्या व्यापारावर कर बसल्यामुळें त्यांत निवळ फायदा कमी राहूं लागला तर पूर्वीसारखा फायदा होण्याकरितां व्यापारी वगैरे माल महाग विकतील. आणि माल महाग झाल्यामुळें त्या मालाचा खप कमी होऊं लागून कमी कसर राहूं लागली तर लोक तो धंदा अथवा उदीम सोडून देऊन दुसरा एखादा धंदा अगर उदीम करूं लागतील. पण सर्व फायद्यांवर कर असला तर तसें करतां येत नाहीं. कोणचाही व्यापार करण्याचें मनांत आणलें तर त्यावर कर आहेच. तेव्हां सर्व प्रकारच्या धंद्यांपासून होणाऱ्या फायद्यांवर कर असला म्हणजे तो आपल्यावरचा टाळून दुसऱ्यावर घालतां येत नाहीं. आतां नाईकांच्या म्हणण्याप्रमाणें सर्व प्रकारचा माल महाग झाला असें जरी धरिलें तरी

सर्व लोक महाग देतील महाग घेतील. त्यांत कोणाचें वास्तविक नुकसान म्हणून होणार नाहीं; ज्यांच्या नक्त नेमणुका अथवा नक्त उत्पन्नें आहेत त्यांचें मात्र थोडें बहुत नुकसान होईल. ह्यावरून सर्व प्रकारच्या फायद्यांवर जो सारखा कर आहे, तो देणारावर पडतो. दुसऱ्या कोणावर पडत नाहीं. ह्याप्रमाणेंच प्रस्तुतच्या लायसेन्सटॅक्साची गोष्ट आहे. असो, रावसाहेब मी मघाशीं विनंती केल्याप्रमाणें एकदा तो आक्ट कलमवार वाचा.

ना॰ रा॰—होय वाचतो (असें म्हणून तो आक्ट वाचूं लागतो).

गं॰ शा॰—प्रथम तर नेहमींप्रमाणें आक्टाचा उद्देश सांगितला आहे. पण तो तरी पूर्णपणें दर्शविला आहे काय?

ना॰ रा॰—अशा कायदेशीर ठरावांत किती बरें उद्देश दर्शवावयाचा? कांहीं पाल्हाळ तर लिहून उपयोगच नाहीं. थोडक्यांत जितका सांगवेल तितका सांगितला आहे.

गं॰ शा॰—पेशे व धंदे चालविणारे मनुष्यांनीं परवानें घेऊन त्याबद्दल पैका द्यावा हें योग्य आहे. ह्यावरून पैका देणें योग्य कां ह्याचा कांहींच बोध होत नाहीं. असो. पुढलें कलम पाहूं.

ना. रा.—(तें वाचल्यानंतर म्हणतो) ह्यांत वहिवाटीप्रमाणें शब्दांचे अर्थ सांगितले आहेत.

गं॰ शा॰—शब्दपरिभाषा व अर्थाची व्याप्ति ह्याविषयीं हें जें कलम आहे, त्यांत ज्या शब्दांचा अर्थ देणें अवश्यक होतें त्यांचा दिला नाहीं. व ज्यांचा देण्याची तादृश इतकी गरज नव्हती, त्यांचा दिला आहे. "माजिस्त्रेट" "ठिकठिकाणचें सरकार" "वचन लिंग" इत्यादि शब्दांची अर्थव्याप्ति देण्याची फारशी जरूर नव्हती. ह्या शब्दांविषयीं सर्व आक्टांत सांगितलें असतें. येथेंही प्रायः तेंच सांगितलें आहे. परंतु पेशे व धंदे हे जे मुख्य दोन शब्द त्यांच्या अर्थाचा कोठेंही उल्लेख नाहीं. हा केवढा चमत्कार आहे!

ना० रा०--ह्या शब्दाचा अर्थ काय हें सर्व लोकांस माहीत आहे. त्यांचें विशेष स्पष्टीकरण करण्याचें मला कांहीं प्रयोजन दिसत नाहीं. त्यांचा अर्थ न सांगितल्यामुळें कोणची अडचण पडणार आहे?

गं० शा०---कोणची अडचण पडणार आहे ती मी तुम्हास दाखवितों. मघाशीं जेव्हां एकदां हा आक्ट आपण वाचला, त्या वेळेस सालीना हजार रुपयांच्या आंत ज्याचें उत्पन्न आहे अशा सरकारी नौकरांस माफी आहे असें आपण वाचलें व आलीकडे आणखी असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे, कीं हेंच कलम सर्व नौकरांस लागूं केलें आहे. ज्यास नौकर हीं अक्षरें लागलीं व ज्याचें वार्षिक उत्पन्न हजार रुपयांच्या आंत आहे त्यावर हा कर नाहीं. बरें एकादा मजूर अथवा कारागीर दोन महिन्यांच्या बोलीनें माझ्या जवळ नौकरीस राहिला, तर त्यास नौकर समजावें किंवा धंदा करणारा समजावें. धंदा करणारा म्हणावा तर नौकर आहे; नौकर म्हणावा तर नेहमीं चाकरी करणारा नाहीं. अशी मोठी पंचाईत आहे.

ना० रा०—ह्यांत मोठीशी पंचाईत आहे, असें मला वाटत नाहीं. ज्यानें सरसाल नौकरी पतकरली आहे त्यांस नौकर म्हणावें, व जो तुटमुदतीनें नौकर राहतो त्यास धंदा करणारा म्हणावें. म्हणजे आपण म्हणतां ही अडणच दूर झाली.

गं० शा०—आतां दोन महिने चाकरी करणारास नौकर कां म्हणू नये व वर्षभर चाकरी करणारास नौकर कां म्हणावें ह्याचें कांहीं समर्पक कारण मला सुचत नाहीं. शिवाय राव साहेब आपण जो अर्थ केला तो म्हणजे सर्व लोक करतील असा कांहीं नेम नाहीं. एक कर वसूल करणारा अंमलदार एक अर्थ करील व दुसरा दुसरा अर्थ करील. ह्याप्रमाणें जी गोष्ट अंमलदारांच्या मर्जीवर राहूं नये तीच गोष्ट त्यांच्या मर्जीवर राहिल्या कारणानें लोकांस विनाकारण त्रास होण्याचा किती सं-

भव आहे बरें? ह्या पेक्षां त्या शब्दांचा अर्थ सांगितला असता तर लोकांस जो त्रास होईल तो चुकला नसता काय?

**वा० ना०**—खरेंच शास्त्रीबोवा, हवा तो अधिकारी हवा तसा त्या शब्दांचा अर्थ करील. व त्यापासून लोकांस फार त्रास होईल ह्यांत कांहीं शंका नाहीं.

**ना० रा०**—दुसरें कलम इतर कायदे कायम ठेवण्याविषयीं आहे. तिसऱ्या कलमावरून सालीना ६००० रूपयांच्या आंत ज्यांचें उत्पन्न आहे असें कांहीं लष्करी अंमलदार व दुसऱ्या प्रकारचे फौजेंतील अधिकारी सोडले आहेत; हजार रुपायांच्या उत्पन्नाच्या आंतील सरकारी नौकर सोडले आहेत; व जमिनीचे लागवड करणारे म्हणजे शेतकरी वगैरेही सोडले आहेत.

**गं. शा.**—लष्करअिम्मलदार व सरकारी नौकर ह्यांस जी माफी केली आहे, ती काय म्हणून केली आहे. ते काय एवढे सरकारचे प्यारे आहेत?

**ना. रा.**—जिवाचा व मालमतेचा जो बचाव होतो तो फौजेपासूनच होत आहे. तेव्हां लढाऊ व शूर फौज असणें हें किती अवश्य आहे हें सांगण्याचें कारण नाहीं. तें तुम्हास कळतच आहे. शिवाय सरकारचे सर्व कारखानें चालण्याकरितां कर बसवून पैसा उत्पन्न करावा लागतो; म्हणजे रयतेपासून पैसा घेऊन नौकरांस द्यावा लागतो व इतर कामीं खर्च करावा लागतो. तेव्हां सरकारी नौकरांपासून पैसा घेऊन त्यांसच तो परत देणें ह्यांत काय मतलब आहे? त्यापेक्षां तो मुळींच न घेतला तर बरें नाहीं काय? खेरीज फक्त ५०००००० रूपयांची जर सरकारास गरज आहे, तर सरकार सर्व लोकांवर कर बसवित नाहीं, ह्यांत उलटा सरकारचा चांगुलणा नजरेस येत नाहीं काय?

**गं० शा०**—लष्करी लोकांचा उपयोग फार म्हणूनच त्यांपैकीं कांहीं लोकांवर जो कर सोडला आहे, तो वाजबी सोडला आहे असें आपण दर्शविलें. आपलें जें संरक्षण होतें तें लढाऊ

फीजेपासून फार होतें व पोलीस, माजिस्त्रेट, जज्ज इत्यादिकांपासून कमी होतें, असें कांहीं म्हणवत नाहीं. यद्यपि आपण म्हणता, असें जरी कबूल केलें तरी जी ६००० रांस गोष्ट लागू तीच ७००० रास लागू. व सात हजारांस लागू तीच १०००० रांस लागू. एकाचा उपयोग विशेष व एकाचा कमी असा कांहीं भेद आहे काय? तसेंच १००० रुपयांच्या आंतील सरकारी नौकर सोडले आहेत, त्याचें कारण आपण असें सांगितलें कीं त्यांच्याकरितां पैसा त्यांच्यापासूनच घेऊन त्यांसच परत द्यावा ह्यांत कांहीं अर्थ नाहीं; तेव्हां त्यांस सोडलें हें बरोबर आहे. आतां हें तुमचें म्हणणें कबूल करवत नाहीं. इतर लोक व्यापार, धंदा करून जसा पैसा मिळवितात, तसाच सरकारी नौकर नौकरी करून पैसा मिळवितात. व्यापारी वगैरे लोकांचा जनाशीं संबंध व सरकारी नौकरांचा सरकाराशीं संबंध इतकाच काय तो दोघांत भेद; पण तितक्यावरून एकावर कर सोडावा व एकावर बसवावा हें पर्यान्याय होत नाहीं. बरें तुमचें म्हणणें घटकाभर कबूल केलें, तरी देखील तुमच्या पक्षाचें मंडण होत नाहीं. हजारच रुपयांच्या खालचे नौकर कां सोडले आहेत? कराचा जो पैसा येतो तो तेवढ्यांसच मिळतो? व त्या रकमेवर ज्यांचीं उत्पन्नें आहेत त्यांस तो मिळत नाहीं? तसेंच हजार रुपयांच्या आंत ज्यांचें वार्षिक उत्पन्न आहे अशा खासगी नौकरांवर हा कर आलीकडे माफ केला आहे. जो नौकरी करतो त्यानें काय असें पुण्य केलें आहे? व स्वतंत्र धंदा करणारानें पातक केलें आहे? हजारांच्या आंत ज्यास नौकर हीं अक्षरें लागलीं तो करापासून मुक्त होतो; व स्वतंत्र रीतीनें धंदा करणारावर कर. हा काय तरी न्याय? सरकारच्या दृष्टीनें दास्यत्व हा गुण झाला व स्वतंत्रपणा हा दुर्गुण झाला. असो. शेतकऱ्यांवर जी माफी केली आहे ती काय म्हणून केली आहे बरें?

**ना० रा०**—शेतकऱ्यांवर कर सोडला आहे, तें अगदीं

रास्त केलें आहे. सरकारचा सर्व वसूल सुमारें ४७।४८ कोट रुपये आहे. त्यापैकीं नुसता काळीचा म्हणजे जमीनीचा वसूल २० कोट रुपये आहे. म्हणजे एकंदर उत्पन्नाचा दोन त्रितियांशावर हिस्सा जमीन खेडणाऱ्या कुळव्यांनीं वगैरे उचलला आहे. तेव्हां ज्या लोकांची सरकरास एवढी थोरली मदत आहे, त्यांच्यावर आणखी कराचें ओझें कोलावयास पाहणें अगदीं गैर आहे.

**गं० शा०**——रावसाहेब काळीचा वसूल एक तृतियांशावर आहे खरा; पण हा जो शेतकरी वगैरे लोक सरकारास पैसा देतात तो कशाबद्दल देतात हें कांहीं तुम्हास ठाऊक आहे?

**ना० रा०**——ज्या जमीनीची ते लागवड करतात, तीबद्दल ते तो पैसा देतात.

**गं० शा०**——तर मग जमीन लागवड करण्यास मिळते, तीबद्दल जो पैसा देतात, तो कांहीं त्यांच्या श्रम संपादित द्रव्याचा अंश नाहीं. हें तुमच्याच म्हणण्यावरून दिसतें.

**ना० रा०**——असा माझ्या म्हणण्याचा रोख नाहीं. शेतकऱ्यांस जो पैसा मिळतो तो श्रम केल्याशिवाय कां मिळतो? दोन चार महिनें जेव्हां सारखे ते खपतात तेव्हां माल तयार होतो. उगीच घरीं निजून होत नाहीं.

**गं० शा०**——शेतकीचें जें सर्व उत्पन्न होतें तें शेतकऱ्यांच्या श्रमाचेंच फल आहे काय?

**ना० रा०**——सगळें शेतकऱ्यांच्या श्रमाचें फळ कसें होईल. कांहीं जमीनीचा गुण कांहीं त्यांच्या श्रमाचा गुण.

**गं० शा०**——तुमच्याच म्हणण्यावरून इतकें स्पष्ट झालें, कीं साधारण मनुष्य एखादा धंदा करून जें मिळवितो, त्यापेक्षां त्याच योग्यतेच्या मनुष्यास तितक्याच श्रमानें व खर्चानें जमीनीपासून पुष्कळ उत्पन्न होतें. परंतु सर्वच प्रकारच्या जमीनींत सारखें उत्पन्न होत नाहीं. कांहीं खराब जमीनींची लागवड केल्यापासून इतर

कामांत तितक्याच श्रमानें व पैशानें जी किफायत होतें तितकी सुद्धां होण्याची मोठी मारा मार पडते. सुपीक व बाजाराच्या समीप जी जमीन आहे तींत जें खराब व बाजारापासून दूर अशा जमीनी-पेक्षां ज्यास्त उत्पन्न होतें, तें कांहीं शेतकऱ्याच्या मेहनतीमुळें होत नाहीं. तें जमीनीच्या स्वाभाविक गुणाचें फळ होय.

आतां जमीनीच्या स्वाभाविक गुणामुळें जें जाफा उत्पन्न होतें त्यास म्हणजे उंच प्रतीच्या ( बाजाराला जवळ असून पिकाऊ आहे तिच्या ) व नीच प्रतीच्या जमिनींतल्या उत्पन्नांतील जें अं-तर त्यास भाडें असें म्हणतात. व सरकारास हल्लीं जो काळीचा वसूल होतो, त्यांतील मोठा अंश जमिनीचें भाडेंच आहे.

**ना० शा०**—उंच प्रतीच्या व नीच प्रतीच्या जमिनींतील उत्पन्नांत जें अंतर तें भाडें असें आतां आपण म्हणालांत, त्या-वरून हें स्पष्ट दिसतें, कीं चांगल्या जमीनीस मात्र भाडें पडतें, खराब ( वाईट मगदुराची व बाजारापासून दूर ) जमिनीपासून भाडें मिळत नाहीं. हल्लीं जी ह्या देशांत जमीन आहे ती सगळीच कां चांगल्या प्रतीची आहे? त्यांत कांहींच का खराब नसेल? बरें खराब जमीन जर आहे तर कोणचाही शेतकरी मुफत जमीन खेडतो असें मुळींच कोठें एकिवांत नाहीं. सरकार सर्वांपासून थोडा बहुत सारा घेतें, तेव्हां खराब जमिनीस भाडें नाहीं म्हणून म्हणता हें कसें?

**गं० शा०** चांगली जमीन (उत्तम मगदुराची व बाजाराला जवळ) करणारे जितके आहेत, त्यांपेक्षां चांगली जमीन फारच थो-डी आहे म्हणून तीवर पुष्कळ झडी पडतात. एकापेक्षां एक ज्यास्त सारा देऊन ती करण्यास तयार होतात. आतां हा जो आ-पण सारा म्हणतो तो प्रायः भाडेंच आहे. असो. आतां ज्यास्त भाडें देण्याची चढाओढ लागते तीस मर्यादा आहे. कोणच्याही जमीनी-ची लागवड करण्यास जो खर्च व श्रम लागतो, त्यावर जें ज्यास्ती उत्पन्न होतें, त्या ज्यास्ती उत्पन्नाच्या रकमे इतकें भाडें देण्यापर्यंत

चढाओढ येऊन ठेपते. पुढें सरकत नाहीं. मूर्ख मनुष्य असल्याशिवाय कोणीही त्यावर पैसासुद्धां चढविणार नाहीं. कारण जो शाहणा आहे, तो पोट बांधून व मुदलांत तोटा येणारा असा धंदाच करणार नाहीं. त्याचप्रमाणें ज्या जमीनींत खर्चा इतकेंसुद्धां उत्पन्न होणें मुष्काल अशा खराब जमीनीची लागवड कोण करील? जेथपर्यंत केलेला खर्च निघून पोटापुरतें उत्पन्न होत आहे, तेथपर्यंत कोणीही कोणचाही उद्योग करील नाहीं तर करणार नाहीं. ह्यावरून कोणत्याही देशांत जितक्या जमीनीची वहिती होत असेल तितक्या जमीनी पैकीं खराब जमीनीच्या उत्पन्नांत व तीपेक्षां जी चांगली जमीन तिच्या उत्पन्नांत जी तफावत त्यास भाडें असें म्हणतात. *आणि आतां दाखविलें त्यावरून खराब जमीनीस मुळींच भाडें पडत नाहीं.* सरकार जो त्यांच्यावर सुद्धां सारा घेतें त्यास जमीनीवरचा कर असेंच म्हटलें पाहिजे. त्यास भाडें असें म्हणतां येत नाहीं. आणि ह्या आपल्या हिंदुस्थान देशाचा जो एकंदर काळीचा वसूल आहे तो कर व भाडें मिळून आहे; पण त्यांतील कराचा हिस्सा फारच थोडा असून भाड्याचेंच उत्पन्न मोठें आहे असें पुष्कळांचें मत आहे.

**वा० ना०**—काळीचा जो वसूल आहे, तो भाडें असो अथवा दुसरें कांहीं असो. सरकारास पैशाची मोठी मदत शेतकऱ्यांपासून आहे, इतकें खरें आहे.

**गं० शा०**—सरकारास जी पैशाची मोठी मदत मिळत आहे, ती शेतकरी व जमीनीपासून ज्यांची प्राप्ति आहे, असे जमीनदार वगैरे लोक ह्यांच्यापासून मिळत आहे असें नाहीं. जमिनीच्या जातीच्या गुणामुळें खराब जमीनीपेक्षां चांगल्या जमीनींत जें ज्यास्ती उत्पन्न होतें त्यांतील मोठा भाग सरकार सार्वजनिक कामाकरितां घेतें हें तुमच्या लक्ष्यांत आलें असेल. तो देण्याचें कोणासही ओझें नाहीं. कराचें मोठें ओझें शेतकऱ्यांनीं वगैरे उचललेलें आहे असें मुळींच नाहीं. एखाद्याच्या घरांत राहून जसें आ

पण मालकास घराबद्दल भाडें देतो, तद्वतच जे शेतकरी चांगली जमीन खेडण्यास घेतात, तीबद्दल ते सरकारास भाडें देतात. तें देण्याचें त्यांच्या आंगावर नाहीं, म्हणून शेतकऱ्यांवर हल्लीं कराचें ओझें फारच मोठें आहे सबब आणखी ओझें त्यांच्यावर लादणें यथान्याय नाहीं; अशा कारणानें हीं जी उदीमपट्टी त्यांच्यावर सोडली हें वाजवी केलें आहे काय?

ना० रा०—सरकारास जो जमिनीचा वसूल आहे, तो बहुतकरून जमीनींचें भाडें आहे; हें भाडें ईश्वरदत्त जी चांगली जमीन तिच्या आंगच्या गुणांमुळें जें खराब जमीनीपेक्षां जास्त उत्पन्न होतें, त्यांतून सरकारास मिळतें; तें शेतकऱ्यांच्या वगैरे श्रमाचें अथवा पैशाचें फळ नसल्या कारणानें तें देण्याचें त्यांस बिलकुल जड नाहीं; आणि ह्याच कारणानें जी हल्लीं त्यांच्यावर माफी ठेवली आहे, हें रास्त केलें नाहीं असें आपलें म्हणणें आहे, हें बरोबर आहे. पण त्यांच्यावर कर बसविण्यास एक अनिवार्य अडचण आहे?

गं० शा०—अशी अनिवार्य आडचण ती कोणची राव साहेब,

ना० रा०—अहो, शेतकऱ्यांस वगैरे सरकारानें तीस तीस वर्षांचे कौल करून दिले आहेत; व त्या कौलांत अशी स्पष्ट शर्त आहे, कीं तुमच्या जमीनीवरचा धारा वाढविला जाणार नाहीं; अगर कोणचाही तुमच्यावर कर बसविला जाणार नाहीं. असें धडधडीत दिलेलें अभिवचन मोडून विश्वासघात करणें राज्यास श्रेयकर आहे काय? सर्व राज्याचा पाया जो विश्वास त्याच्याच आज मुळावर कुऱ्हाड घातली तर काय स्थिति होईल हें आपल्यासारख्या सूज्ञास सांगण्याची गरज नाहीं. हा सर्व कारभार विश्वासानें चालला आहे. आणि तोच विश्वास जर नाहींसा झाला, तर हा कारभार चालेल? लोक सरकारावर यत्किंचित तरी भरंवसा ठेवतील?

**गं० शा०** दिलेलें वचन पुरें करावें, व दिलेला भरंवसा रक्षण करावा हें यथा न्याय आहे इतकेंच नाहीं, पण राज्याच्यासुद्धां बळकटीस कारण आहे. परंतु गैरसमजुतीनें जर कोणीं वचन देऊन फसला असला तर तें पुष्कळ लोकांच्या कल्याणाकरितां योग्य प्रसंगानें मोडल्यास त्यांत कांहीं दोष नाहीं; असेंही कितीएक ज्ञात्यांचें मत आहे. 'शिवाय आपण म्हणता तशी त्या कौलांत प्राय: शर्त नसेल. त्यांत शर्त अशी आहे कीं जो कर सर्व रयतेवर नाहीं; असा कोणचाही विशेष कर तुमच्यावर (शेतकऱ्यांवर वगैरे) बसविला जाणार नाहीं." शिवाय सरकारानें वचनें किती प्रसंगीं मोडलीं आहेत बरें?

**ना० रा०**—एकदां चोरी केली म्हणून दहादां करावी हा कोठें न्याय नाहीं. एकदां वचन मोडलें म्हणून आणखी चारदां मोडावें असें कांहीं नाहीं. असो. आपण म्हणता कीं गैरसमजुतीनें वचन दिलें असलें तर मोडण्यास कांहीं चिंता नाहीं. पण हें वचन मुळींच अज्ञानानें दिलें आहे, असें आम्हास वाटत नाहीं. मालमशागत करून ज्या जमीनीचा मगदूर वाढविला, जींत विहिरी बांधल्या व पाट काढले अशी जमीन आपल्यापासून हिसकावून घेऊन सरकार दुसऱ्यास देईल असें जर प्रत्येक जमीनीच्या मालकास वाटेल तर कोणीं तरी जमीनीची खटपट करील? कोणीं करणार नाहीं. ती काय आपल्या धर्मानें पीक देईल तें देईल. आणि अशी स्थिति झाल्यावर आज जीं हिरवींचार शेतें व मनोरमबाग आपल्या दृष्टीस पडताहेत, ते पडतील काय?

**गं० शा०**—आपण म्हणता अशा प्रकारचें अभिवचन देऊं नये असें माझें मुळींच म्हणणें नाहीं; पण त्यांत अशी एक सवड ठेविली असती कीं ज्यावेळेस धारा चढविणें योग्य होईल त्यावेळेस तो चढविला जाईल, म्हणजे झालें असतें. हल्लीं शेती करणारे व जमीनीचे मालक ह्यांची काय रेपा उपटली आहे! अमेरिकेंत लढाई झाल्याकारणानें तिकडून विलायतेस वगैरे जो कापूस जात

होता तों बंद झाला.' म्हणून एकदम कापसास दर येऊन शेतकऱ्यांची वगैरे चैन झाली आहे; आणि एकदां जें कापूस पिकविण्याचें खूळ माजलें आहे, तें तसेंच आहे. कापूस फार पिकूं लागला म्हणून धान्य कमी पिकूं लागलें. तेणेकरून त्यांचें जे एकदां उत्पन्न वाढलें आहे त्यांत फारसें कमी झालें नाहीं. आतां हें जें त्यांचें उत्पन्न वाढलें आहे तें कांहीं त्यांच्या उद्योगामुळें वाढलें नाहीं. झोंपेंत जशी लक्ष्मी घरांत चालून यावी तशी त्यांच्या घरांत चालून आली आहे व येत आहे. कांहींएक खर्च वेंच व आयास वगैरे न करितां स्वाभाविक कारणांनीं जी देशाची संपात्ति वाढली तिचा अंश सार्वजनिक् कामाकरितां सरकारानें घेणें अगदीं न्याय आहे. असें किती मोठमोठ्या मुत्सद्यांचें व अर्थशास्त्रकरांचें मत आहे. व ज्या वेळेस कराचे सामान्य नियम सांगितले त्या वेळेस ही अपवादादाखल गोष्ट सांगावयाची राहिली. असो. आतां हें जरी अपवादासारखें स्थल दिसतें, तथापि सरकार देण्याचें ओझें सर्वांवर सारखें असावें, हें जें कर सर्वांवर सारखा असावा ह्या नियमाचें कारण तेंच ह्या अपवादाचें कारण आहे. अपोआप वाढलेली संपात्ति सर्व रयतेच्या कामीं लावण्यास घेतली तर त्याचें कोणासही जड नाहीं म्हणूनच वर सांगितल्याप्रमाणें सारा वाढविण्याचा हक्क जर आपल्याकडे ठेवला असता, तर मजूरी करून पोट भरणारे कारागीर, उदमी ह्यांच्यावर कर न बसवितां श्रम व दगदग न करितां जे गबर झाले आहेत त्यांच्यावर हा कर नसता का घालतां आला?

**ना० रा०**—जें नाहीं, त्याविषयीं काय बोलून फळ आहे. त्यांच्यावर हा कर घालण्यास प्रस्तुस आधार नाहीं.

**गं० शा०**—जितका पैसा प्रस्तुत् पाहिजे आहे, तितका सर्व त्यांच्यापासून घेण्यास आधार जरी नाहीं, तरी ज्याप्रमाणें सर्वांपासून कर घेतात, त्याप्रमाणें त्यांच्यापासूनही घेण्यास कांहीं चिंता नाहीं. त्यांत कांहीं विश्वासघात होत नाहीं. इतरांवर न बसविता फक्त

त्यांच्यावरच जर कर बसविला तर मात्र वचन मोडलें असें होईल. ज्याप्रमाणें शेतकऱ्यांवरही सोडला आहे, त्याप्रमाणेंच जमीदार, फंन्डहोल्डर म्हणजे सरकारचे कर्जदार ह्यांजवर सोडला आहे. वास्तविक ज्यांची संपत्ति फार असल्यामुळें ज्यांच्यावर फार कर असावा त्यांच्यावर अजी सोडला आहे. ज्या कारणानें शेतकऱ्यांची प्राप्ति वाढली आहे, त्याच कारणानें जमीनदार वगैरे लोकांची संपत्ति वाढली आहे. आणि म्हणूनच त्यांच्यावर तर कर अदून असावा. तो त्यांसच माफी केली आहे. तसेच सरकारचे कर्जदार (फन्डहोल्डर) म्हणजे ज्यांच्या जवळ लंगाली नोटी आहेत त्यांस माफी दिली आहे. जे शेकडो रुपये कर्ज सरकारास देऊन त्याचें खुशाल व्याज खात आहेत त्यास माफी आणि मजुरी करून पोट भरतात त्यांच्यावर कर. काय न्याय हा!!! ज्याप्रमाणें इतर लोक सावकारी करतात त्याप्रमाणें हेही सावकारीच करतात. तफावत मिळून इतकीच कीं हे सरकारचे सावकार ते इतर लोकांचे सावकार. सरकाराचे सावकार म्हणून त्यांच्यावर कर सोडावा हा कोठला विलायती न्याय कोणजाणें?

**ना० रा०**—हे जे लोक सोडले आहेत, हें सरकारानें अगदीं वाजवी केले नाहीं, हें आतां माझ्या मनांत आलें. असो. पुढील म्हणजे चवथे कलमावरून हा आक्ट लागू नाहीं असें असें ठरविण्याचा अधिकार गव्हरनर जनरल इनकौन्सिल यांस दिला आहे. पुढें परवान्याविषयीं कलमें आहेत. दोनशे रुपये व व त्याहून अधिक ज्याची वार्षिक प्राप्ती असेल, असा पेशा किंवा धंदा चालविणाऱ्या कोणाही मनुष्यानें परवाना घेऊन त्याबद्दल त्यांत लिहिलेली रक्कम दिली पाहिजे असें पांचव्या कलमांत सांगितलें आहे.

**गं० शा०**—आतां हेंच तुम्ही पहाकीं उद्यां उत्पन्न होणार त्याबद्दल आज कर दिला पाहिजे. आज जर जवळ पैसा नसला तर कर्ज काढून सरकारास पट्टी भरली पाहिजे. कां हा लोकां

अर जुलूम आहे कीं नाहीं? अमुक वेळेस व अमक्या रीतीनें कर वसूल केला असतां रयतेस सोयीवार पडेल असें वाटेल, त्या रीतीनें व त्यावेळेस तो वसूल करावा हा जो मघाशीं एक नियम सांगितला त्याच्याशीं हा ठराव किती विरुद्ध आहे? ह्यांत सरकारानें रयतेची कोणची सोय पाहिली हें मला तर कळत नाहीं मग आपल्यास काय दिसत असेल ती असो.

ना० रा०—लोकांस त्यापासून सोय कसली आली आहे; उलटी गैर सोय होईल ह्यांत कांहीं संशय नाहीं. असो. परवाना कोणच्या अंमलदारानें द्यावा, त्यांत काय तपशील असावा, त्याची किती मुदत असावी, तो केव्हां नवा करून घ्यावा व आकारणी करण्याचें कोणीं ठरवावें हें सहापासून दहा कलमापर्यंत सांगितलें आहे. परवानेवाल्याची वार्षिक याद कलेक्टरानें तयार करावी, व तींत मनुष्याचें नांव, त्याचा धंदा व त्यानें दिलेली रक्कम इतका तपशील असवा, व ती कलेक्टरानें प्रसिद्ध रीतीनें लावून ठेवावी असें अकराव्या कलमांत ठरविलें आहे. शास्त्रीबोवा ज्याची त्याची प्राप्ती काय आहे, हें कळल्यापासून फार अडचणी येतील. व्यापार बहुतकरून भ्रमावर चालतो. म्हणून प्रत्येकाचें उत्पन्न काय आहे, हें सर्वांस समजल्यानें व्यापारास फार हरकत येईल. व लोकही फार नाखुष होतील.

गं० शा०—आपली जी खरोखर ऐपत आहे, तीपेक्षां लोकांनीं आपल्यास श्रीमंत समजावें ही पोकळ प्रतिष्ठेची हौस मला पसंत आहे असें नाहीं. आतां प्रत्येकाची प्राप्ति कळल्यानें व्यापारास मोठीशी हरकत येईल असेंही मला वाटत नाहीं. प्राप्तीवरून मनुष्याजवळ काय आहे, ह्याचें अनुमान होऊन व्यापारास जर हरकत येते असें म्हणावें तर इन्कंटयाक्साच्या वेळेस व्यापार कोठें बंद पडला होता; परंतु याद प्रसिद्ध ठिकाणीं लावल्यानें लोक जर नाखुष होतात तर ती न लावावी हें बरें? त्यापासून सरकारचा कांहीं फायदा नाहीं, लोक मात्र व्यर्थ नाखुष होतात.

ना० रा०—पुढें यादीवर अर्जी करणें, तिची चौकशी झा-ल्यावर तीवर अपील लावणें हें १२ व १३ कलमांत सांगितलें आहे. चवदाव्याकलमावरून जरूरीची बातमी देण्याविषयीं कोणाही मनुष्यास बोलावण्याचा अधिकार कलेक्टर अथवा कमि-शनर ह्यास दिला आहे.. पंधरा, सोळा, सतरा व अठरा ह्या क-लमांत परवान्यावांचून धंदा चालविणारास दंड करणें, परवाना हजर करणें, दंड वसूल करण्याची रीत व कोणा मनुष्यावर गु-न्ह्याबद्दल कसें काम चालवावें इत्यादिक गोष्टी ठरविल्या आहेत.

गं० शा०—कोणच्याही गुन्ह्याची निर्विवादपणें शाबिती झाल्याखेरीज कोणासही शिक्षा होऊं नये असा फौजदारी कायद्याचा मूलभूत सिद्धांत आहे. आतां ह्या आक्टाप्रमाणें माजिस्त्रेटाच्या मनांत आलें म्हणजे शाबिती झाली. सारांश ह्या दोन चार क-लमानीं जुलमी अधिकाऱ्यांस रयतेला गांजण्याची फार सवड मात्र मिळाली आहे.

ना० रा०—एकूणीसपासून तेवीसपर्यंत किर्कोळ कलमें आ-हेत. पुढें अपराशिष्ट आहे. ह्यांत चार वर्ग सांगितले आहेत. ज्याचें २०० पासून ५०० पर्यंत उत्पन्न आकारलें जाईल त्यावर ४ रुपये कर; ५०० पासून १००० पर्यंत १० रुपये; १००० पासून ५००० पर्यंत २० रुपये; ५००० पासून १०००० पर्यंत १०० रुपये; १०००० पासून २५००० पर्यंत २०० रुपये; व २५००० पासून वर ५०० रुपये ह्याप्रमाणें कर ठेवला आहे; ह्याच मानाप्रमाणें पैसा एकत्र जमा करून व्यापार करणाऱ्या मंड-ळ्यांविषयीं ठरविलें आहे.

गं० शा०—दोनशें रुपये साधारण कुटुंबास निर्वाहास पुरतात अशा समजुतीनें त्या रकमेच्या आंत कर सोडला आहे; पण आलीकडे महागाईच्या कारणानें तेवढें उत्पन्न बस होत नाहीं. शिवाय दो-नशांस जो कर तोच ४९९ वांस व पांचशांस तोच ९९९ वांस ह्याप्र-माणें वरच्या वर्गांचा प्रकार असून २५००० हजारांस तोच ५००००

पंस व लाख रुपयास. ज्याची मिळकत फार त्यास त्याच्या मिळकतीच्या मानानें कर अगदीं थोडा; आणि २०० शें रुपयांवर कर!! ह्यावरून हा आक्ट प्रथमपासून अखेरपर्यंत पाहिला असतां पोक्त विचारानें ठरविला आहे असें दिसतें?

ना० रा०—आतां हे जे मोठाले वर्ग केले आहेत हें बरोबर नाहीं असें आपलें मत दिसतें; पण मला वाटतें कीं, लहान लहान वर्ग केले असते, अथवा शेंकड्यावर आकारणी करावी म्हणून ठरविलें असतें तर खर्च वाढून अंमलदारास त्रास देण्यास फार फावलें असतें. मोठमोठे वर्ग असले म्हणजे अर्धवट अप्रयोजिक अंमलदार असल्या खेरीज इतका जुलूम होणार नाहीं.

गं० शा०—असें मलाही वाटत होतें; पण परवा असें ऐकिलें कीं, एक दोन मनुष्यांनीं २०० व ४०० रुपये उत्पन्नें लिहून दिलीं असून त्यांच्यावर एकदम १०० व २०० रुपये कर बसविला. ह्यावरून अविचारी अंमलदारांपासून किती जुलूम होईल ह्याचा विचार करा. असो माझ्या आणखी असें ऐकण्यांत आलें आहे कीं, ही पट्टी पाद्री लोकांवर माफ केली आहे; बरें पाद्री लोकांस जर माफी दिली आहे, तर आपले वैदिक, शास्त्री, हरदास ह्यांवर कां नसावी. सारांश हा कर व त्याबद्दलचा आक्ट ह्यांचा ज्या ज्या दृष्टीनें विचार करावा त्या त्या दृष्टीनें तो वाईट आहे असें स्पष्ट दिसून येतें. व ह्या आक्टावरून तर तो करणाराचा मुत्सद्दीपणा, शाहणपणा, दूर दृष्टी व अर्थ शास्त्राचें ज्ञान इत्यादिक कांहींच गुण दिसून येत नाहींत. खेरीज ह्याकरामुळें लोकांतही फार गवगवा झाला आहे. तर फक्त ५० लक्ष रुपयांसारख्या थोड्या पैशाकरितां असला त्रासदायक कर कोत्या बुद्धिनें त्रासदायक आक्ट करून बसविला हें शहाणपणाचें व पोक्त विचाराचें काम सरकारानें केलें असें मला वाटत नाहीं. आतां असा अविचार होण्याचें मूळ कारण असें आहे, कीं कलकत्याच्या कायदे कौन्सिलांत **ग्यासी** साहेब म्हणून एक सभासद आहेत, त्यांनीं ह्या

उदीमपट्टीच्या आक्टाचा मसुदा, प्रथम ज्या दिवशीं सभेपुढें आणला त्याच दिवशीं तो पसार झाला. आतां ज्या कृत्यापासून लक्षावधी लोकांचें हित किंवा अहित होणार तें कृत्य पूर्ण विचारानें करणें किती अवश्य आहे; हें सांगण्याची तादृश जरूर नाहीं. हल्लींची पट्टी विशेष प्रकारच्या अथवा जातीच्या लोकांवर नसून प्राय: हिंदुस्थानांतील सर्व रयतेवर आहे. तेव्हां अशा पट्टीविषयीं ठराव करण्यापूर्वीं योग्य विचार करणें सरकारास प्राप्त होतें, तो ह्या कामीं एका दिवसांत कसा झाला ह्याचा तुम्हीच विचार करा. कोणताही कर बसविण्याबद्दलचा आक्ट ठरविण्याचे अगोदर त्याविषयीं रयतेचें काय म्हणणें आहे, हें समजून घेणें सरकारचें कर्तव्य आहे. त्या कर्तव्याचें ह्या कामांत सरकारानें उल्लंघन केलें इतकेंच नाहीं; पण जी गोष्ट कधीं कोणच्याही विद्याचारसंपन्न देशांत घडली नसेल ती सुधारलेपणाचा तोरा मिरविणाऱ्या इंग्रज सरकारानें केली हें नवल नव्हे!! सारांश जो गोष्ट घाईनें झाली ती बहुतकरून चांगली व्हावयाचीच नाहीं. व कर बसविण्यासारख्या महत्वाच्या कामांत उतावळी व अविचार केला हें शहाण्या म्हणविणाऱ्या सरकारास योग्य नाहीं. आतां एकवेळ चूक झाली तरी हेका न धरितां ती पदरांत घेऊन नीट करणें ह्यांत लहानपणा नसून उलटा थोरपणा आहे, तेव्हां आपलें दयाळू व सूज्ञ सरकार अविचारानें झालेलें कृत्य रद्द करून नाराजी झालेल्या रयतेस खुष करील अशी मोठी उमेद आहे.—

करकृत पुस्तकमाला नंबर ४

# मनुष्य आणि त्याचीं
# कर्तव्यकर्मे
## भाग १ ला

शार्दूलविक्रीडित.

ज्याचा पूर्ण कटाक्ष नीति धरुनी लोकीं भलें जोडणें,
ज्याचें चित्त स्वकार्यदक्ष नित्यहीं सत्कार्यिं घोळंबिणें
ज्याची संगति इष्टलाभ करवी मोडी अनिष्टा क्षणीं
त्या कर्तव्यपटूस योग्य म्हणती सद्गुणखाणी जनीं

---

हा सन्मार्गद[redacted]लहानसा निबंध
रा. रा. कृष्णाजी गणेश अभ्यंकर यांनीं
ठाणें येथें सूर्योदय छापखान्यांत छापविला

आवृत्ति १ ली.
५०० प्रति
सन १८९८

---

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क पु
आपणाकडे ठेविले अ.

---

किंमत ४ आणे. . अ.

पुस्तकें मिळण्याचें ठि. रा. यशवंत गो. हर्डीकर बु

पृथ्वी वृत्त.

कृती सरळवंद्य ही मति विमल सत्कारणीं ॥
सुशांति मनिं व्यक्त हो बहु उदारता ही जनीं ॥
अहंपण अभाव निस्पृहपणा जगन्मान्यता ॥
अनेक गुणमेळना नच सुले जगीं कोणता ? ॥

---

हें
नीतिपर
लहानसें पुस्तक
श्रीमंत रा. रा. लक्ष्मण गोपाळ देशमुख (सी. एस्.)
यांस त्यांचे औदार्य, सुस्वभाव,
नीतिधैर्य, लोकमान्यता वगैरे
गुणांस लुब्ध होऊन
आदरपूर्वक अर्पण
केलें असे.

कृ. ग. भ.

## निबंधावर आलेले विद्वान लोकांचे अभिप्राय.

श्री

नमस्कार वि. वि. तुह्मी '**मनुष्य आणि त्याचीं कर्तव्यें भाग पहिला**' हा लेख मला पहाण्याकरितां पाठविला तो वाचून पाहिला. तुमचा उद्योग स्तुत्य आहे. लेखाची भाषा चांगली असून विचारही उत्तम आहेत. पुस्तक आश्रयास पात्र आहे. कळावें लोभ करावा हे विनंति.' ज्येष्ठ शुद्ध ८ गुरुवार शके १८९४

(सही) **गोविंद शंकर शास्त्री बापट**
अंसिस्टंट मास्तर एलफिन्स्टन
हायस्कूल मुंबई, व (सद्वर्तन
नीतिमंदीर वगैरे पुस्तकांचे कर्ते)

---

श्री

**रा. रा. कृष्णाजी गणेश अभ्यंकर** मु. मुंबई यांस.

सा. न. वि. वि. आपण "**मनुष्य आणि त्याचीं कर्तव्य कर्मे**" हें पुस्तक नवीनच रचून मजकडे अभिप्रायाकरितां पाठविलें तें वाचून मनाला फार आनंद झाला. सदरहु पुस्तकाची भाषासरणी सरळ आणि सुबोध असून विषय प्रतिपादनशैलीही वर्णनीय आहे. अशा तऱ्हेचीं पुस्तकें मराठीभाषेंत जितकीं होतील तितकीं थोडींच असें माझें मत आहे. हल्लींच्या काळीं "शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्." या महावाक्याचा आपल्या लोकांस विसर पडल्या सारखाच झाला आहे असें दिसतें. तरी आपलें पुस्तक वाचून त्या संबंधानें आपल्या लोकांत जर कांहीं जागृति झाली तर त्यापासून त्यांस बराच

फायदा होईल यांत संशय नाहीं. असो. आपलें पुस्तक शिकणाऱ्या किंवा बक्षिसाचे निमित्तानें तरुण व होतकरू विद्यार्थ्यांच्या हातीं जाऊन त्यांनीं तें लक्षपूर्वक वाचल्यास व त्याप्रमाणें वागण्याचा दृढ निश्चय केल्यास त्यापासून त्यांस फार उपयोग होईल. कळावें हे विनंति.

रामकृष्ण नीलकंठ वडे
बी. ए. असि. मास्तर बी.
जी. हायस्कूल ठाणें.

---

Dear Sir,

I have read with great interest your Marathi Essay on the duties of man. I congratulate you on its simplicity of style and purity of diction. We greatly need such original productions for employing our leisure in Marathi literature and for the instructions of our ladies and children. In my opinion you richly deserve encouragement in your efforts to enrich the Marathi literature.

Yours faithfully
(Sd)J D Kolatkar
Superintendent P. W. D.
Secretariat, Bombay.

---

Dear Mr. Abhyankar,

Read your excellent essay and I am glad to say my time has been amply repaid. Its reading is fertile that is to say it furnishes us with many instructive principles. You are really to be congratulated upon this first undertaking of yours which is

certainly promising. It is to be profoundly regretted that its advantage can be reaped only by those who know Marathi, and consequently I heartily recommend its translation into other languages.

I am yours
(Sd.) N.G Chapekar,
B. A. L. L. B.

---

Dear Mr Abhyankar,

I am very much pleased with the masterly hand with which you have handled your essay entitled Man and his duties in Marathi. It is really deserving admiration of the public and the learned. It contains maturethoughts and arguments which would serve honour and name for a learned man even. They deserve to be followed. The more I look into your essay and your circums tances, the more room I find for applauding you.

yours faithfully
(Sd.) K. J. Londhe.
(late) Head clerk
to the Executive Engineer
Presidency.

---

I have looked through the book and see through every line the intense desire of the writer to impress the principles of morality on every uncultivated mind. The style is simple enough and the exposition of the subject clear even to the understanding of readers of intelligence beelow average.

(Sd.) A. H. Kher. B. A.

# प्रस्तावना.

ज्ञानेच्छु मनुष्य प्रयत्न करणारा असल्यास उत्तरोत्तर ज्ञानप्राप्ति करून घेतो; व तें ज्ञान व्यवहारांतील प्रत्यक्ष अनुभवानें व पुस्तकांचें द्वारें अप्रत्यक्ष रीतीनें त्यास मिळत असतें. या ज्ञानाच्या सहाय्यानें आपल्या संसारसंबंधाच्या अडचणी दूर करण्याविषयीं तो ज्याप्रमाणें जपतो त्याप्रमाणेंच प्राप्तज्ञानाचा उपयोग लोकहिताकडे करणें हेंहीं त्यास इष्ट असतें. लोकहित करण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यापैकींच ग्रंथलेखन हा एक आहे. जर ग्रंथ लिहिण्याची प्रवृत्ति आजपर्यंत नसती, तर आजकाल ज्या स्थितींत हें जग आपण पहातों तिजपेक्षां अधिक अज्ञानावस्थेंत तें आपणास आढळून आलें असतें. ह्मणून ग्रंथकार व ग्रंथप्रकाशक हे जगाचे सुस्थितीस कांहींअंशीं कारण आहेत. ज्याअर्थी ग्रंथप्रकाशन असें फायदेशीर आहे त्याअर्थी प्रत्येकानें आपल्या अल्पस्वरूप ज्ञानप्राप्तीचा वांटा आपल्यापेक्षां कमी समजुतीचे लोकांस शक्त्यनुसार देणें अवश्य आहे. या हेतूनें व आपल्या समजुतीची दिशा बरोबर आहे किंवा नाहीं हें समजून घेण्याकरितां मी हें लहानसें पुस्तक लोकांपुढें आणिलें आहे. नीरक्षीर न्यायानें शोधक वाचक त्याचा उपयोग करून घेतील, व त्यांत व्यक्त झालेले माझे अल्प विचार कोठें चुकले असल्यास मला उदारबुद्धीनें सुचवितील अशी आशा करितों.

या पुस्तकांत सृष्टीमध्यें मनुष्याची योग्यता किती आहे कर्तव्यकर्म ह्मणजे काय, हें पहिल्यानें सांगून मग सद्वर्तन आरोग्यरक्षण व ज्ञानसंपादन अशा मुख्य व व्यापक तीन कर्तव्यकर्मांचा विचार केला आहे. मनुष्याची योग्यता किती आहे हें

दाखवितांना अनुकूल व प्रतिकूल उदाहरणें घेऊन बुद्धीच्या उपयोगाविषयीं दिग्दर्शन केलें आहे. सद्वर्तन, आरोग्यरक्षण, व ज्ञानसंपादन या विषयांवर इंग्रजी व मराठीभाषेंत बरेच लेख प्रसिद्ध झाले आहेत. यामुळें विषयाचें नांव पुढें येतांच वाचकांकडून आंत काय आहे हें पूर्णपणें पाहण्याची हयगय होईल अशी भीति वाटते; ह्मणून जरी इष्ट नव्हे तरी येवढेंच सविनय कळवितों कीं या लेखाची सरणी व विषयाचें विवेचन हीं अगदीं नवीं असून जरूर अशा स्थळीं तो रोजच्या व्यवहारांतील उदाहरणांनीं व्यक्त केला आहे. व एकंदर विषय सुबोध व उपयुक्त होऊन लहान थोरांच्या मनांत चांगला ठसण्याविषयींही यत्न केला आहे. तो कितपत साधला हें पाहणें मी माझ्या विद्वान वाचकांकडे सोंपवितों.

या पुस्तकावर अभिप्राय देतांना कांहीं विद्वान गृहस्थांनीं ज्या अमोल सूचना आपल्या उदारबुद्धीनें केल्या त्यांजवर लक्ष पुरवून मूळ लेखांत कोठें कोठें बदल केला आहे. या "पहिल्या भागास" आश्रय मिळाल्यास महाराष्ट्र भाषेची सेवा करण्यास मला मोठी ईर्षा वाटेल. इकडे लक्ष देऊन तिचे हितचिंतक या अल्पयत्नाचा स्वीकार करतील, व अधिक लोकप्रिय होईल असा या विषयाचा दुसरा भाग बाहेर काढण्याविषयीं उत्तेजन देतील अशी उमेद बाळगिली आहे.

पुस्तककर्ता.

॥ श्री ॥

## मनुष्य आणि त्यांचीं कर्तव्यकर्में.

सृष्टीकर्त्यानें सृष्टि निर्माण केली, तिचे सजीव सृष्टि व निर्जीव सृष्टि असे दोन भाग आपणास कल्पितां येतात. सजीव सृष्टि या भागाखालीं प्राणी व वनस्पति मोडतात, व निर्जीव सृष्टि या भागाखालीं बाकीचे सर्व पदार्थ मोडतात. तर सजीव सृष्टि ह्मणजे ज्यामध्यें आपण मनुष्य मोडतों त्याविषयीं थोडासा विचार करूं.

सजीव सृष्टि या मुख्य भागाचे जे प्राणी आणि वनस्पति हे उपभेद आहेत, त्यांपैकीं प्राणी या भेदाला सृष्टीकर्त्यानें जास्त महत्व दिलें आहे, कारण प्राणी हे आपल्या चलन वलनादि व्यापारासंबंधानें स्वतंत्र आहेत तशा वनस्पति नाहींत. प्राण्यांमध्यें मनुष्य एक व पशुपक्षी जीवजंतु एक असे आणखी दोन भाग करितां येतात. त्यांपैकीं मनुष्य श्रेष्ठ किंवा पशुपक्षादिकांपैकीं कोणी श्रेष्ठ ह्मणजे एकंदर प्राणिवर्गामध्यें श्रेष्ठ कोण याचा निर्णय करूं.

फार लांब जाण्यास नको, सध्याच्याच गोष्टीवरून पहा कीं ज्या मनुष्य प्राण्याला इतर सर्व प्राण्यांविषयीं विचार करण्याची शक्ति आहे ह्मणजे ज्याला सर्वांमधील न्यूनाधिक्य समजतें तो सर्वांमध्यें श्रेष्ठ असावा किंवा नसावा? असलाच पाहिजे हें उघड आहे. तथापि हें आपणास प्रमाणानें सिद्ध केलें पाहिजे. परंतु मनुष्य हा सर्व प्राण्यांमध्यें श्रेष्ठ आहे किंवा नाहीं हें सिद्ध करण्यापूर्वी श्रेष्ठत्व कशानें येतें व श्रेष्ठत्व ह्मणजे काय हें सांगितलें पाहिजे.

ज्या वस्तूला श्रेष्ठ असें आपण मानितों त्या वस्तूचे अंगीं इतर वस्तूंपेक्षां कांहींतरी विशेष गुण असतो हें व्यव-

हारांतील साधारण गोष्टींवरून कळतें. कारण: एका कुटुंबामध्यें कुटुंबाचा यजमान श्रेष्ठ कां मानिला जातो? पशूंमध्यें सिंह श्रेष्ठ कां मानिला जातो? व एखाद्या राज्यामध्यें राजा श्रेष्ठ कां मानिला जातो? अशा निरनिराळ्या प्रकारच्या प्रश्नांचा विचार केला असतां जरी सर्व प्रश्नांचें एकत्र उत्तर देतां येत नाहीं तरी त्या श्रेष्ठपणाबद्दल प्रत्येक व्यक्तीविषयीं मनामध्यें कांहींएक प्रकारची पूज्यबुद्धि उत्पन्न होते. ह्मणजे ज्या ज्या वस्तूला आपण श्रेष्ठ मानितों त्या त्या वस्तूचे अंगीं इतर वस्तूंपेक्षां कांहीं तरी एक विशेष गुण असतो आणि त्या गुणामुळें आपण तिला श्रेष्ठ असें मानितों. सारांश श्रेष्ठत्व हें एखाद्या वस्तूला तिच्या अंगच्या कांहीं एक प्रकारच्या विशेष गुणधर्मामुळें दिलें जातें. तर असा एखादा विशेष गुण मनुष्याच्या अंगीं आहे, किंवा इतर प्राण्यांच्या अंगीं आहे हें पाहिलें पाहिजे; परंतु याचा निर्णय सरळ रीतीनें जाऊन करितां येणार नाहीं, कांहीं गृहीत घेऊन चाललें ह्मणजे लागलाच होईल.

थोडकेंच पहा कीं पशुपक्ष्यादिकांस मनुष्यापेक्षां मोठें मानिलें ह्मणजे मागील श्रेष्ठत्वाच्या व्याख्येप्रमाणें मनुष्याच्या अंगीं कांहीं विशेष गुण न मानितां तो दुसऱ्या एखाद्या प्राण्याच्या अंगीं आहे अशी कल्पना केली, तर केवढा अनर्थ संभवेल? आपल्या अंगीं कांहीं विशेष गुण नसता तर आपण मनुष्य इतर प्राण्यांच्या किती अंकीत झालों असतों, सिंह व्याघ्रांसारख्या हिंसक पशूंनीं रोज किती माणसें खाल्लीं असतीं! खरोखर असा विचार केला तर मोठा प्रलयच झाला असता असें वाटतें. परंतु तसा अनर्थ झाला नाहीं याचें कारण त्यांच्या अंगीं आपण मागें मानल्याप्रमाणें कांहीं विशेष गुण नाहीं; कारण

सिंहव्याघ्रादिकांस आपण बंदुकीनें किंवा इतर कांहीं युक्तीनें मारूं शकतों आणि याप्रमाणेंच इतर सर्व प्राण्यांची गोष्ट आहे. ह्मणजे मनुष्य सर्वांस जिंकितो परंतु मनुष्यास जिंकणारा ईश्वराखेरीज दुसरा कोणी नाहीं. यावरून सहज कोणी सांगेल, कीं, प्राणिवर्गामध्यें मनुष्य श्रेष्ठ आहे. तर हा श्रेष्ठ कशानें झाला, याच्या अंगीं कोणता विशेष गुण आहे? असा प्रश्न सहज निघेल.

पहा प्रत्येक प्राणिमात्राच्या अंगीं परमेश्वरानें जें सामर्थ्य दिलें आहे त्या सामर्थ्याच्या बाहेर कोणालाही कांहीं करितां येत नाहीं; हें जरी खरें आहे, तरी मनुष्याची इतर प्राण्यांशीं तुलना करून पाहिली असतां तो पुष्कळ अंशीं स्वतंत्र आहे, आणि इतर प्राणी परमेश्वराचे केवळ बांधलेलेच आहेत असें ह्मटलें तरी चालेल. ह्मणजे परमेश्वरानें इतर प्राण्यांस जे मार्ग लावून दिले आहेत त्यांच्या बाहेर त्यांस जातां येत नाहीं, तथापि त्यांस त्यांच्या गरजेप्रमाणें पुष्कळ सोईच्या गोष्टी जन्मतःच दिल्या असतात. आणि त्या सर्वांच्या सोई बहुतकरून निरनिराळ्या आहेत. सिंह, वाघ वगैरे हिंसक पशूंस भयंकर नखें आणि दांत दिलेले आहेत त्यांच्या योगानें ते आपलें भक्ष्य मिळवितात. गाय बैल इत्यादि पाळींव पशूंस शिंगें दिलीं आहेत त्यांच्या योगानें ते इतर प्राण्यांपासून आपलें संरक्षण करितात. पक्ष्यांस पंख दिले आहेत त्यामुळें ते उडतात, आणि आपलें भक्ष्य शोधून तें आपल्या चोंचींनीं आपल्या घरट्यांत आणितात. विंचू आदिकरून क्षुद्र जीवांस तीक्ष्ण नांगी दिली आहे. तसेंच कांहीं प्राण्यांस थंडींत रहावें लागतें आणि थंडीपासून त्यांचे निवारण व्हावें ह्मणून जन्मतःच त्यांस लोंकर दिलेली असते. मासे आदीकरून जलधिज प्राण्यांचे अंगास चरबी आणि तेल हीं जन्मतःच लाव-

लेलीं असतात. अशा प्रकारें सर्वांस कांहींना कांहीं परमेश्वरानें सोय दिलीच आहे आणि त्या सोईच्या मानानें जगांत वागण्याचे मार्गही लावून दिलेले आहेत. त्यांबाहेर त्यांस कधींही जातां येत नाहीं. उदाहरणार्थ माशांनीं पाण्यांत राहण्याचें टाकून जमिनीवर येण्यास इच्छिलें तर त्यांस येतां येईल काय? किंवा हर प्रयासानें आले तरी ते जमिनीवर जगतील काय? कधीं नाहीं. तथापि असें जरी करतां येणार नाहीं तरी परमेश्वराची त्यांजवर केवढी कृपा समजावयाची? एकंदरींत पाहिलें असतां त्यांस किती साधनें दिलीं आहेत? तशीं मनुष्यास दिलीं आहेत काय? नाहीं. तर मग परमेश्वराचा मनुष्य जातीवर कोपच ह्मणावयाचा; परंतु असें नाहीं. नीट विचार करून पाहिलें असतां असें वाटतें कीं, परमेश्वरानें आपणांस एखादें मोठें साधन दिलें असावें; कारण ज्या ज्या सोई आणि जीं जीं साधनें त्यानें इतर प्राण्यांस दिलीं आहेत त्या सर्वांचा उपभोग मनुष्य घेतो येवढेंच नव्हे तर इतर सर्व प्राण्यांवर आपलें वर्चस्व मिरवितो. माशांप्रमाणें पोहूं शकतो; पक्ष्यांप्रमाणें विमानाच्या सहाय्यानें हवेंत उडूं शकतो; आणि सूत, लोंकर व रेशीम यांचीं वस्त्रें विणून थंड देशांत राहूं शकतो; तर या गोष्टींस लागणारीं साधनें परमेश्वरानें जन्मतःच मनुष्याबरोबर पाठविलीं आहेत काय? अहाहा! किती विस्मयकारक गोष्ट आहे कीं, मनुष्य हा प्राणी उघडा नागडा केवळ मांसाचा गोळा जन्मून परमेश्वरानें आयतें कांहीं एक न देतां तो आपणास सर्व साधनें करून घेतो! मग तीं करितो कशानें या बद्दल विचार केला असतां सहजच लक्षांत येतें कीं, तो आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व कल्पनेनें तीं करितो. असें जर आहे तर बुद्धि ही परमेश्वरानें केवढी देणगी मनुष्यास दिली

आहे कीं, ज्या देणगीच्या योगानें तो सर्व प्राण्यांस मागें टाकितो; आपणास हवे तसे ऐषआरामाचे पदार्थ करितो, अतिशय रुचकर अन्नें तयार करूं शकतो, हवीं तशीं सुखकारक वस्त्रें विणून तीं पांघरतो, हव्या त्या देशांत राहूं शकतो आणि सर्व प्राण्यांवर आपलें वर्चस्व गिरवितो. येवढेंच नव्हे तर त्यानें पंचमहाभूतें देखील आपलीं चाकर करून ठेविलीं आहेत. विजेच्या योगानें क्षणांत लांब अंतरावर बातमी पोंचवितो वाफेच्या योगानें आगबोटी, आगगाड्या वगैरे चालवितो. वाऱ्याच्या सहायानें इष्टदिशेस गलबतें नेतो, तसेंच पवनचक्की पानचक्की यांचे सहायानें हजारों माणसांचें काम एकटा करितो. ह्या व अशा अनेक प्रकारच्या दुसऱ्या गोष्टी बुद्धिसामर्थ्यानें मनुष्यास करितां येतात. ही परमेश्वराची अमोलीक देणगी जी बुद्धि ती आपणास दिल्याबद्दल आपण त्याचे किती आभार मानले पाहिजेत बरें? व त्यास दररोज किती पूज्य बुद्धीनें स्मरलें पाहिजे बरें! येवढेंच नव्हे तर इतक्या मौल्यवान देणगीचा उपयोग आपणास नेहमीं सत्कृत्यांकडेसच केला पाहिजे. असो बुद्धिसामर्थ्याच्या योगानें मनुष्यास आलेलें श्रेष्ठत्व एकीकडे ठेवून पुन्हा थोडेसे मागें वळूं.

आतां मनुष्य ह्मणजे काय हें आपणास सहज सांगतां येईल, व तें आपण वरील गोष्टीच्या अनुरोधानें असें सांगूं कीं ज्यास पांच कर्मेंद्रियें व पांच ज्ञानेंद्रियें असून ज्यास बुद्धि आहे त्यास मनुष्य म्हणावें. ही व्याख्या सृष्टिक्रमाप्रमाणें खरी मानतां येईल; परंतु व्यवहारदृष्ट्या येवढ्यानेंच केवळ पूर्तता होणार नाहीं.

कारण कल्पना करा कीं आपण कांहीं कृत्य केल्यामुळें आपणास कोणी जमीन इनाम दिली आहे; तर आपलें असें कर्तव्य आहे कीं तींत धान्य पिकविलें पाहिजे किंवा तिचा

दुसरा एखादा योग्य उपयोग केला पाहिजे, आणि असें कांहीं आपण केलें तरच ती आपणास इनाम दिल्याचें सार्थक आहे. आपण जर चांगल्या प्रकारें तिचा उपयोग न करूं तर ती आपणास मिळून व न मिळून सारखीच. आपण तिची वहिवाट न केल्यामुळें तिजवर आपलें स्वामित्व सुद्धां रहाणार नाहीं; आणि इनाम देणाराचा इष्ट हेतु साधणार नाहीं. कारण त्या जमिनीचा योग्य उपयोग आपण घ्यावा असा इनाम देणाराचा हेतु असतो. तो न घेतल्यामुळें अर्थशास्त्रदृष्ट्या आपण पुष्कळांचें नुकसान करितों, व थोड्याशा नीचत्वासही पात्र होतों; कारण आपण जमीन घेतल्यामुळें जमिन देणारास स्वतः तिचा उपभोग घेतां येत नाहीं, आपण स्वतःही घेत नाहीं व त्यानें जर ती दुसऱ्या एकाद्यास दिली असती तर त्यानें आपलें उदरपोषण केलें असतें, परंतु तसेंही होऊं शकत नाहीं. सारांष आपणास कोणीं दिलेल्या वस्तूचा आपण योग्य उपयोग न केला ह्मणजे दातृत्वाचें सार्थक न होऊन दुसऱ्याचा लाभ अनरूने आपण मूर्खत्वास पात्र होतों. तर अशीच गोष्ट आपल्या बुद्धीची आहे. परमेश्वरानें मनुष्यास बुद्धी दिली असून जर तिचा त्यानें योग्य उपयोग न केला तर त्यास ती दिली असून नसून सारखेंच आहे. व्यवहारदृष्ट्या मागें सांगितल्याप्रमाणें तो मनुष्यत्वास पात्र होणार नाहीं; ह्मणजे ज्यांस बुद्धि नाहीं अशा पशुपक्ष्यादिकांत त्याची गणना केली तरी चालेल. कारण असें कीं त्याला ओळखण्याची विशेष खूण जी त्याच्या आंगची बुद्धि हिचा जर तो व्यवहारांत चांगला उपयोग करील तरच तो मनुष्य, नाहींतर बुद्धि असूनही जर तो पशूप्रमाणें वागूं लागला व तिचा कांहीं नीट उपयोग करीत नाहींसा झाला तर त्यास पशूच कां म्हणूं नये? आणि बुद्धि असूनही जर तो पशूसारखा वागूं लागला तर

असें वाटतें कीं त्यास पशूपेक्षांहीं पशू ( नीच ) असें म्हटलें असतां बाध येणार नाहीं.

आतां कोणी म्हणेल कीं बुद्धीचा चांगला उपयोग तरी काय? आणि तो करावयाचा कसा? तर याचें उत्तर एकच नव्हे; अनेक आहेत. तर सर्व व्यापक असें उत्तर देण्यास पहिल्यानें एक दोन उदाहरणें देऊन बुद्धीचा चांगला उपयोग आणि वाईट उपयोग ह्या विषयीं सांगितलें पाहिजे.

पहा ज्या वेळेस मागील महाराज मल्हारराव गायकवाड हे दिवाणे ठरून गादीचे नालायक झाले त्यावेळेस गायकवाड सरकारचें राज्य निवारशी होतें, ह्मणजे मल्हाररावांचे वडील बंधू महाराज खंडेराव यांस पुत्रसंतान नसल्यामुळें ते कैलासवासी झाल्यावर महाराज मल्हारराव यांस गादी मिळाली होती व पुढें मल्हारराव यांजकडून जेव्हां इंग्रज सरकारानीं राज्याधिकार घेतला त्या वेळेस मल्हारराव यासही कांहीं संतान नव्हते तेव्हां गायकवाडाची गादी कोणास द्यावी हा मोठा विचार पडला. व पुढें बडोद्यांतील इंग्लिश अंमलदार व सरकारचे जुने कारभारी यांचें मतें असें ठरलें कीं वडील बंधू खंडेराव यांची पत्नी राणीसाहेब जन्माबाई यांचे मांडीवर गायकवाडाचे वंशांतील दत्तक पुत्र द्यावा व त्याजला गादीवर बसवावें. वाचकहो! विचार करा कीं, या वेळेस कोणाचें भाग्य उदयास यावयाचें होतें व तें पुढें आलें. खरोखर परमेश्वराची करणी अगाध आहे! मनुष्य एका क्षणांत रंकाचा राव व रावाचा रंक आपल्या नशीबाच्या आगे पूर्व पुण्याईच्या व पापाच्या जोरावर होतो असें जें ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. हल्लींचे प्रसिद्ध श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांस तें राज्य मिळालें. हे पूर्वी अतिशय गरीब स्थितींत होते व यांच्या एकंदर कुटुंबाची स्थिति इतकी वाईट होती कीं ती

ह्मणावी तितकी थोडीच असें सांगतात. सारांश ते हल्लींच्या वैभवास पोंचतील असें त्यांच्या स्वप्नींसुद्धां नसेल परंतु त्यांच्या सुदैवानें व पूर्व पुण्याईच्या जोरानें व विशेषें करून गायकवाडाच्या वंशांत उत्पन्न झाले असल्या कारणानें त्यांस दत्तक घेववून हें राजपद मिळालें. तर ह्या राजपदाच्या जोरावर त्यांनी आपल्या अधिकाराचा उपयोग कसा करावा? हल्लीं ज्या रीतीनें वागतात तसें न वागतां प्रजेवर जुलूम करावा! अनपराधी लोकांस व्यर्थ बंदींत टाकावें! दानधर्म करूं नये! पक्षपाती व्हावें! आणि खुशाल निर्भयपणें ऐषआराम करावा! असें कोणी ह्मणेल काय? खरोखर कोणी नाहीं. प्रजा सुखी राहील अशाच तऱ्हेनें त्यांनीं सर्व कारभार चालविला पाहिजे. फार लांब जाण्यास नको. आपल्या दयाळू इंग्रज सरकारानें आपणा प्रजेपैकीं कांहीं प्रजेस दुष्ट व हिंसक प्राणी वगैरेपासून आपलें संरक्षण करून घेण्यासाठीं तरवारी बंदुका वगैरेहत्यारें वापरण्याचे परवानें दिले आहेत तर त्यांनीं निरापराधी व गरीब प्राण्यांवर उगाच हात टाकावा काय? ते जर कदाचित् आपणावरच उठले तर आपण त्यांस किती दुष्ट घातकी व अन्यायी ह्मणूं? शिवाय त्यांनीं आपल्या परवान्यांचा वाईट उपयोग केला असें ह्मणून त्यांस दोष देऊं. आणि सरकारानें अशांस परवाना व्यर्थ दिला असेंही आपण ह्मणूं. तर हीच गोष्ट प्रत्येक मनुष्यास लागू आहे ह्मणजे परमेश्वरानें दयाळूपणानें दिलेलें बुद्धिसामर्थ्य जर आपण इतरांचे घात करण्याकडे लाविलें आणि सन्मार्ग सोडून बाजूला वळलों तर आपण आपल्या बुद्धिरूप शस्त्राचा दुरुपयोग केला असें होईल. यावरून आपल्या सहज लक्षांत येईल कीं बुद्धीचा चांगला उपयोग करणें ह्मणजे ती सत्कृत्याकडे लावणें हें होय.

आतां कोणी अशी शंका काढील कीं मनुष्य जें जें करतो तें तें त्यास चांगलें वाटतें आणि आवडतें ह्मणूनच करितो, ह्मणजे त्याच्या समजुतीप्रमाणें तो आपल्या बुद्धीचा उपयोग चांगल्या कृत्यांकडेसच करितो. आणि यावरून एकंदर पाहिलें असतां जगांत ज्या ज्या गोष्टी घडतात त्या त्या चांगल्याच होतात असें म्हटलें पाहिजे; परंतु खरोखर असें नव्हे, तर

॥ जनीं निंद्य तें सर्व सोडोनि द्यावें ॥
॥ जनीं वंद्य तें सर्व भावें करावें ॥ १ ॥

रामदास.

या सत्पुरुषाच्या उक्तीचा विचार केला असतां साधारणतः ज्या गोष्टी जगास आवडतात त्या सत्कृत्यांत गणल्या जातात. ज्या जगास आवडत नाहींत त्या दुष्कृत्यांत गणल्या जातात.

चोर एखाद्याचें घर फोडून चोरी करतो ती त्याला चांगली वाटते, परंतु तो ती कधीं लोकांचे देखत करितो काय ? कधीं नाहीं. याचे कारण येवढेंच कीं, जरी त्याला चोरी आवडते आणि जरी तो ती नेहमीं करितो तरी ती लोकांना आवडत नाहीं; चोरी करणें हें निंद्यकर्म आहे हें तो पूर्णपणें समजतो. कारण त्याचें अंतःकरण किंवा ज्यास आपण सद्सद्विवेक बुद्धि ह्मणून म्हणतों तें नेहमीं त्यास सांगत असतें कीं बाबा हें कृत्य वाईट आहे व जगांत निंद्य आहे, तूं तें करूं नको; ह्मणून चोरी करणारा नेहमीं ती लोकांच्या नकळत करितो. यावरून सत्कृत्याची व दुष्कृत्याची परीक्षा येवढीच कीं दुष्कृत्य हें लोकांमध्यें निंद्य असतें व अंतःकरणही तें निंद्य आहे असें सांगतें, ह्मणजे तें न करण्याविषयीं आपणास सुचवीत असतें. अर्थात तें करण्याविषयीं आपणास एकाएकी

प्रवृत्त होऊं देत नाहीं. तर अशीं जीं दुष्कृत्यें तीं करण्याकडे मनुष्यानें आपल्या बुद्धीचा उपयोग करूं नये. ह्मणजे बाकीचीं जीं कृत्यें मनुष्य करितो तीं सर्वच चांगलीं आहेत असें दिसून येईल.

याला दुसरें प्रत्यंतर पहा. धर्माच्या विरुद्ध मद्य प्राशन करणारे जे असतात त्यांतून कित्येक तें आपणांस आवडतें ह्मणून करितात, कित्येक आपल्या प्रकृतीस मानवतें ह्मणून करितात आणि एकंदरींत कांहींना कांहीं कारणानें ते मद्यपान चांगलें असें म्हणतात. परंतु असें तुह्मीं कधीं पाहिलें आहे काय किंवा निदान ऐकिलें तरी आहे काय कीं मद्यपान चांगलें ह्मणून कोणी एका मद्यपान करणाऱ्या गृहस्थानें मद्याचा पेला आपल्या मुलास पिण्याकरितां दिला किंवा त्याला मद्यपान केलें तरी हरकत नाहीं तूं तें करीत जा असें सांगितलें; एवढें सुद्धां नको तो गृहस्थ विचारी असेल तर आपल्या मुलाच्या देखत एकवार तरी मद्य ह्मणून तें पिईल काय? फार कशाला तो गृहस्थ आपल्या मुलाच्या देखत मद्यपान चांगलें असें दुसऱ्यास देखील ह्मणणार नाहीं. व आपल्या मुलास आपल्या कृत्याची ओळखही देणार नाहीं. दुसरें असें कीं तो जरी मद्यपान करितो तरी तें जगाच्या देखत करीत नाहीं. मग मद्यपान जर तो चांगलें म्हणतो तर सर्व लोकांच्या देखत करण्यास त्यास काय हरकत आहे? व तसेंच आपल्या मुलास मद्याचा पेला पिण्यास सांगण्यास काय हरकत आहे? परंतु तो समजतो कीं, मद्यपान करणें हें जगांत निंद्य आहे आणि तें करण्यास जरी तो स्वतः प्रवृत्त होतो तरी तें आपल्या मुलास करावयास सांगण्यास त्याला धीर होत नाहीं. कारण त्याची इच्छा असते कीं, माझ्या मुलानें मद्यपी होऊं नये. तर या त्याच्या वर्तणुकीवरून मद्यपान वाईट असें जरी

तो आपल्या तोंडानेंच प्रत्यक्ष ह्मणत नाहीं तरी तें वाईट आहे असें लोकांस आपल्या वर्तनावरून दर्शवितो. सारांश कोणीही मनुष्य कबूल करील कीं एकाद्या वस्तूच्या उपयोगाचा चांगलेपणा किंवा वाईटपणा यांचा निर्बंध उपयोग करणाऱ्या गृहस्थाच्या ह्मणण्यावरूनच नेहमीं करितां येत नाहीं तर त्याच्या किंवा आपल्या सदसद्विवेक बुद्ध्यनुसार वर्तनावरून व जगाच्या अभिप्रायावरून करावा लागतो.

असो सत्कृत्य ह्मणजे काय हे आपणास वरील गोष्टींच्या अनुरोधानें चांगलें समजलें आणि परमेश्वरानें दिलेली अमोलिक देणगी जी बुद्धि तिचा उपयोग आपणास सत्कृत्याकडे केला पाहिजे ही ही गोष्ट प्रत्येक इसमास मान्य असेल यांत संशय नाहीं. एकंदरींत जरी सत्कृत्याची व दुष्कृत्याची परीक्षा करण्याचा मार्ग आपणास समजला तरी प्रत्येक गोष्ट करतेवेळेस वर सांगितल्याप्रमाणें वागतां येते असें नाहीं. बहुतकरून जें जें आपणास ह्या जगांत करणें असतें तें तें केवळ आपल्या स्वतःच्या विचारावर करावें लागतें आणि अमुक गोष्ट केली तर जग बरें ह्मणेल किंवा नाहीं त्याची साक्ष आपलें अंतःकरणच आपणास देत असतें. आणि जे लोक दूरदर्शी व विचारी असतात ते आपल्या सदसद्विवेक बुद्धीविरुद्ध पाऊल टाकण्यास कधींहि धजत नाहींत. यामुळें त्यांचे हातून निंद्य अशीं कृत्यें कधीं होत नाहींत. आतां मनुष्य बाल्यावस्थेंत असतां ज्या ज्या गोष्टी करितो त्या सर्व भोंवतालच्या मंडळींचें अनुकरण करून किंवा ती, सांगेल तसें ऐकून तो करितो, त्यांजबद्दल त्याजवर कांहींच जबाबदारी नसते. तथापि कोणी ह्मणेल कीं वयांत आल्यावर मनुष्य जें जें करितो त्याबद्दलही जबाबदारी त्याजवर नसते. कारण भोंवतालची मंडळी लहानपणीं ज्या दिशेकडे त्याची

बुद्धि वळवील त्या दिशेकडेसच ती मोठेपणीं वळून वृद्धिंगत होत जाईल; परंतु हें ह्मणणें आपणास सर्वांशीं कबूल करितां येणार नाहीं. कारण वयां आल्यावर प्रत्येकास एक प्रकारचें बुद्धिस्वातंत्र्य येतें. आणि त्याप्रमाणें तो आपणास बहुत करून वागवितो. असें जर नसेल तर जगांतील सद्गुणी किंवा दुर्गुणी मनुष्यें त्यांच्या कुटुंबांतील सन्मार्गाच्या किंवा दुर्मार्गाच्या चाली रीतीप्रमाणें तशीं निपजलीं असतीं. परंतु खरोखर पाहिलें तर अशी स्थिति बहुधा नसते; कारण एकाद्या दुर्व्यसनी व अशिक्षित मनुष्याचा मुलगा नीतिमान व विद्वान निपजून सन्मान्य होतो, किंवा एखाद्या अब्रूदार मनुष्याचा मुलगा त्याच्या नांवास बट्टा आणण्यासारखा बदफैलीही निपजतो. ह्मणून कुटुंबाच्या चालीरीतीप्रमाणेंच मनुष्य पुढें निपजतो असें जर असतें तर अशा प्रकारच्या विरोधी वर्तनाचीं मनुष्यें एकाच कुटुंबांत कधींहि निपजलीं नसतीं व कुटुंबांतील एकच रीतभात कित्येक पिढ्यांपर्यंत जशीच्या तशीच राहिली असती. परंतु ज्यापेक्षां असें होत नाहीं त्यापेक्षां पुष्कळ अंशीं हें खरें कीं मनुष्य वयांत आल्यावर आपल्या बुद्धिस्वातंत्र्याप्रमाणें आपणास वागवितो, ह्मणजे विशेषेंकरून त्याच्या इच्छेनुरूप सर्व कृत्यें करण्याकरितां होईल तितका तो झटतो.

अशा कृत्यांचे आपणास दोन विभाग करितां येतील. एका विभागाखालीं मनुष्यास आपल्या आयुष्यक्रमांत जरूर कराव्याच लागतात त्या गोष्टी, व दुसऱ्या विभागाखालीं ज्या गोष्टी तो आपले आवडीप्रमाणें करितो त्या. हे जे दोन विभाग सांगितले या दोहोंमध्येंहि आयुष्यक्रमांतील कांहीं गोष्टी येतात; व कांहीं गोष्टी अशा आहेत. कीं त्या एका

विभागांत मोडत असून त्यांचा दुसऱ्या विभागाशीं कांहींच संबंध नसतो. पहिल्या तऱ्हेच्या गोष्टीचें उदाहरण उदरनिर्वाह करणें हें होय. ही गोष्ट जरी पहिल्या विभागांत सांगितल्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यास जरूर करावीच लागते तरी दुसऱ्या विभागांत सांगितल्याप्रमाणें तोच उदरनिर्वाह आपल्या आवडीप्रमाणें श्रमानें धन संपादन करून किंवा चोरी करूनही मनुष्य करितो. दुसऱ्या तऱ्हेच्या गोष्टीचें उदाहरण म्हटलें ह्मणजे दानधर्म परोपकार करणें हें होय. कारण मनुष्यास वाटेल तर तो दानधर्म परोपकार वगैरे करितो, परंतु पहिल्या विभागांत सांगितल्याप्रमाणें उदरनिर्वासारखें दानधर्म करणें त्यास भाग पडतेंच असें नाहीं.

आमचा प्रस्तुतचा विषय जो "मनुष्याचीं कर्तव्यकर्में" तो दुसऱ्या विभागाच्या गोष्टींखालीं येतो. कारण ज्या गोष्टी प्रत्येक मनुष्यास आपल्या आयुष्यक्रमांत जरूर कराव्याच लागतात ह्मणजे ज्या न केल्या तर त्याचें जीवित राहणें कठीण त्या तो करितोच करितो त्याबद्दल येथें कांहीं लिहिण्याचें कारण नाहीं. परंतु त्याच अवश्य गोष्टी तो सन्मार्गानें किंवा दुर्मार्गानें करितो किंवा ज्या गोष्टी करण्याची त्यास गरज नसतां तो केवळ परोपकार बुद्धीनें किंवा आपल्या विशेष कल्याणाकरितां करितो त्या गोष्टींविषयीं अर्थात त्याच्या कर्तव्यकर्माविषयीं आपणास विचार करावयाचा आहे.

कर्तव्यकर्म या शब्दाचा अर्थ त्या शब्दामध्येंच उघड आहे. ह्मणजे करावयास जे अवश्य व योग्य तें कर्तव्यकर्म. अशीं कर्तव्यकर्में प्रत्येक मनुष्यास त्याच्या आयुष्यभर करावयाचीं असतात. मग तो कोणत्याही स्थितींत असो. कोणी राजा असेल तर राजनीतीप्रमाणें प्रजापालनादि त्याचीं कर्तव्य-

करणें असतात. राजाची आज्ञा मानणें वगैरे कर्तव्यकर्में प्रजेस करावीं लागतात. त्याच प्रमाणें बापलेकांची, नवराबायकोची, स्नेहीसोबत्यांचीं, अशीं परस्परांविषयीं परस्परांस आपल्या स्थितीप्रमाणें कर्तव्यकर्में करणें असतात. ह्मणजे ज्याचा ह्मणून परस्परांशीं कांहीं संबंध आहे, त्यास त्या संबंधाप्रमाणें निरनिराळ्या प्रसंगीं कांहीं विवक्षित रीतीनें वागलें पाहिजे. उदाहरणार्थ आपण संगतिसोबतीनें कोठें जात असतां आपणापैकीं एकादा इसम घेरी येऊन पडला व त्यामुळें त्यास जखम झाली तर आपलें प्रत्येकाचें कर्तव्यकर्म त्यास त्या प्रसंगीं योग्य मदत करण्याचें आहे; ह्मणजे आपणास तावडतोब त्याचा रक्तप्रवाह बंद होईल असा इलाज केला पाहिजे, औषध आणून लाविलें पाहिजे व त्यास सुस्थळीं नेलें पाहिजे. तसेंच आपल्या वडील मनुष्यांनीं "विचार केल्याशिवाय कोणतेंही काम करूनये." असें सांगितलें, तर असें शिकविण्याविषयीं त्यांचा धर्म आहे, व आपण त्यांचा उपदेश ऐकणें हें आपलें कर्तव्य आहे. हीं जशीं परस्पर संबंधाचीं कर्तव्यकर्में आहेत तशीं आपलीं आपणाविषयीं कांहीं कर्तव्यकर्में आहेत. बऱ्यावाईटाचा विचार करावा, सन्मार्गानें चालावें, सद्बुद्धि धरावी, शरीरप्रकृतीस जपावें, व उत्तरोत्तर ज्ञानसंपादन करावें हीं आपलीं कर्तव्यकर्में आपणास करावीं लागतात. अशीं अनेक प्रकारचीं कर्तव्यकर्में करण्याविषयीं प्रत्येकानें निश्चय केला पाहिजे. हा निश्चय इतका दृढ असला पाहिजे कीं, प्रसंगानुसार आपणास जीं जीं कर्तव्यकर्में करावयाचीं असतात, तीं तीं करण्याविषयीं आपली बुद्धि स्वाभावीकच व्हावी. आपणास ऊन लागलें ह्मणजे जसें सावलींत जावेंसें वाटतें किंवा भूक लागली ह्मणजे जसें खावेंसें वाटतें तसें योग्यवेळीं आपलें कर्तव्य करण्याविषयीं आपणास लाग-

लीच इच्छा झाली पाहिजे. आपणास आयुष्यांत इतकीं कर्तव्यकर्मे आहेत कीं, आपल्या आयुष्यांतील एकंदर वर्तणुक कर्तव्यकर्मरूपी कड्यांची साखळीच आहे. कर्तव्यकर्म हें अमुकएक विवक्षित कृत्य विवक्षितकाळीं करणें असतें असेंच नाहीं. तर तें सदोदित चालू असावें लागतें. व्यवहार दृष्ट्या अगदी रिकामें बसलों तरी रिकामपणीं सुद्धां कोणास उपद्रव करावयाचा नाहीं, हें एक कर्तव्यकर्मच आहे. उदाहरणार्थ आपण रिकामें बसलों आणि सदोदित उद्योग करण्याचें जें आपलें कर्तव्यकर्म तें केलें नाहीं हें ह्मणणें बरोबर होईल. तथापि आपण कोणास उपद्रव देऊंनये हें जें आपलें कर्तव्यकर्म तें आपण केलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. आतां कांहींएक काम केल्याशिवाय अथवा कोणताही एकादा उघड व्यवसाय केल्याशिवाय वेळ व्यर्थ घालविला असतांना, कर्तृवाचक शब्दाचा आपण उपयोग करतों ह्मणजे उपद्रव न देण्याविषयीं कर्तव्यकर्म केलें असें म्हणतों हें कसें अशी कोणी शंका घेईल; परंतु थोडा विचार केला ह्मणजे वाटेल कीं सर्व कर्मांस कारणीभूत आपलें मन असतें मनांत एकादी प्रेरणा झाल्याशिवाय कोणाचे हातून कांहीं कृत्य होत नाहीं. तसेंच मनाचे विचार हे जागृतावस्थेंत सदोदित चालू असतात, व तेच विचार कधीं कधीं लोकांस उपद्रव देण्यास कारण होतात. तर अशा विचारांकडे आपलें मन जाऊ दिलें नाहीं, अर्थात मनाचे विकार लोकोपद्रवाकडे न जाऊ देण्याविषयीं मनावर आपण आवरण घातलें, ह्मणजे मनाचे ठिकाणीं तरी कांहीं क्रिया केली असें म्हणण्यास हरकत नाहीं. यावरून रिकामें बसून सुद्धां कांहीं कर्तव्य (negative duty) केलें असें होतें. सारांश मनाचे ठिकाणीं कांहीं तरी क्रिया सदोदित चालू असते; आणि ती क्रिया आपली सदसद्विवेक बुद्धि

सांगेल त्याप्रमाणें सन्मार्गानें केली म्हणजे आपण आपलें इष्ट कर्तव्य कर्म केलें असें होईल. सदसद्विवेकबुद्धीशीं कर्तव्यकर्माचा इतका निकट संबंध आहे कीं, ती असल्याशिवाय वेळोवेळीं आपलें खरें कर्तव्य कोणतें हें आपणांस कळणार नाहीं. मनाचे ठिकाणीं बरे वाईट विचार नेहमीं चालू असतात; व त्यांच्या ओघाप्रमाणें मन आपणास वागण्यास प्रवृत्त करतें; परंतु सदसद्विवेकरूपी न्यायदेवता त्यांची निवड करून व त्यांच्या परिणामाकडे आपलें लक्ष पोंचवून आपणास योग्य मार्गास लाविते. आणि त्या मार्गानें चालून आपणास जें करावें लागतें तें आपलें कर्तव्यकर्म होय. तर अशीं जीं कर्तव्यकर्मे आहेत तीं शक्त्यनुसार सांगतों.

प्रत्येक मनुष्यास समजूं लागल्यापासून सुखाची आवड फार असते. मनुष्य आपल्या आयुष्यांत जितके उद्योग करतो तितक्यांचें इच्छित पर्यवसान सुख असतें. आणि कोणताही उद्योग करण्यापूर्वी त्याचे विचार उद्योगाचे परिणामाकडे जात असतात. सुख संपादन करण्याकरितां त्याचे स्वाधीन जितक्या गोष्टी असतात तितक्या तो हरप्रयत्नानें करीत असतो. सुखाचे अनेक मार्ग आहेत. ते मार्ग प्रत्येकजण आपल्या आवडीप्रमाणें धरितो. कोणास द्रव्य संचयाचे योगानें सुख होतें, कोणास शरीरसामर्थ्याचे योगानें सुख होतें, कोणास दानधर्म परोपकार वगैरे केल्यानें सुख होतें किंवा कोणास केवळ योगसाधन करून सुख होतें. तर असे अनेक हेतु ज्या ज्या गोष्टींनीं साधतील त्या त्या गोष्टी प्रत्येकजण करितो. अमुक एक गोष्टीपासून एकास सुख होतें तर त्याच गोष्टीपासून दुसऱ्यास सुख होईल असा मुळींच नियम नाहीं. कारण (भिन्नरुचिर्हि लोकः) प्रकृतीप्रमाणें प्रत्येकाची रुचि निराळी असते. आतां परमेश्वरीनियमाप्रमाणें किंवा ज्याच्या त्याच्या

उद्योगगांभीर्यमानानें कोणाचे हेतु साधतात किंवा निष्फळ होतात. सृष्टींतील व्यवहार सुखावर इतका अवलंबून आहे कीं, सुख हा लोहचुंबक जर मनुष्यास नसता किंवा सुख ह्मणजे काय याची कल्पना जर कांहीं त्यास नसती तर एवढाल्या उलाढाली झाल्या नसत्या. सृष्टिक्रमाप्रमाणें मनुष्य जन्मास आल्यावर किंबहुना जशाचा तसाच लयास जातो. तात्पर्य इतकेंच कीं, सुख जसें उद्योगाचा परिणाम आहे तशी सुखाची इच्छा उद्योगाचें मूळ कारण आहे.

पहा मनुष्य जसा उत्तरोत्तर जगांतील व्यवहार पहात जातो तसतशी उद्योग करण्याविषयींची त्याची इच्छा वाढत जाते आणि आपल्या स्वतःचे अदमासाप्रमाणें जसें आपलें बुद्धिसामर्थ्य किंवा इतर कर्तृत्व असेल त्या मानानें ज्यांत अधिक सुख होईल असा उद्योग तो करूं लागतो. आतां विशेषेंकरून त्याची नजर जरी आपले सुखाकडे असते तरी कोणताही उद्योग आरंभिताना लोकरीतीला अनुसरून आपल्या विचारांचें झुकाणूं त्यास वळवावें लागतें. कारण जगांत सत्कीर्तीची आवड सर्वांस आहे आणि ती संपादिली तरच इतर सुखाची किंमत आहे. लोक जर एकाद्यास तुच्छवत् मानूं लागले तर त्याचे समजुतीप्रमाणें लोक ज्या वेळेस त्यास मान देत होते, त्यावेळचेंच सुख त्यास पुढें तुच्छवत् भासतें हें कोणीही मनुष्य कबूल करील. एकंदरींत त्याचे उद्योगसाफल्याचें जें सुख तें प्रत्यक्ष कमी ज्यास्त न होतां केवळ लोकमताप्रमाणें तें त्यास कमी ज्यास्त वाटूं लागतें हें खरें आहे. ह्मणून कोणताही उद्योग करितांना लोकमत कसें आहे याचा पहिल्यानें प्रत्येकानें विचार करावा. ह्मणजे आपला उद्योग ज्या मानानें जगमान्य किंवा लोकरीतीस अनुसरून असेल त्या मानानें तो प्रत्येकास कीर्तीप्रद होतो. परंतु लोक-

मताची पारख करणें हें फारच कठीण काम आहे. जो उद्योग कांहीं लोक स्तुत्य मानतात त्याचाच इतर लोक उपहास करितात; तशांत अमुक एक उद्योग स्तुत्य मानणारे लोक सुद्धां तो उद्योग करणाऱ्या इसमास त्यांत येश आलें तरच त्यास वाखाणतात नाहींतर अपयश आलें ह्मणजे कधीं कधीं त्याची कुचेष्टा करण्यास कमी करीत नाहींत. याकरितां प्रत्येक इसमाची स्थिति इतर लोकांशीं पाहूं गेलें असतां मोठी चमत्कारिक असते, आणि आपल्या योग्यतेप्रमाणें आपण ज्या मंडळींत वागत असतों त्या सर्वांकडून बरें ह्मणून घेणें फारच थोडयास साधतें. परंतु व्यवरांतील एखाद्या उद्योगांत अपयश आलें तरी तो लोकनिंदेस पात्र होत नाहीं. कारण उद्योगांत यश किंवा अपयश येणें हें केवळ उद्योग करणाऱ्यावरच सर्वथा अवलंबून नसतें, समुद्रांत होडी ढकलिली ह्मणजे ती इच्छित तीरास नेणें हे केवल नावाड्यांचे स्वाधीन नसतें; तिला वादळ वगैरे पुष्कळ अडथळे असतात; परंतु एखादी फुटकी होडी जर नावाडी समुद्रांत ढकलतील व त्यामुळें ती मध्येंच बुडून परतीरास न जाईल तर ते नावाडीलोक निंदेस पात्र होतील. यदा कदाचित जरी त्यांची होडी फुटकी असून सुदैवानें इच्छित स्थळीं पोंचली तरी सुद्धां त्यांच्या अविचाराबद्दल त्यांची निंदा करण्यास लोक कमी करणार नाहींत. तशीच गोष्ट मनुष्याचे उद्योगाची आहे. मनुष्यास प्रत्येक उद्योगास यश येतेंच असें नाहीं. त्याच्या उद्योगांत त्यानें आपलेकडून कोणतेही तऱ्हेची हयगय न केली तरी त्याच्या स्वाधीन नसणाऱ्या गोष्टी त्याच्या यश प्राप्तीमध्यें अडथळा करतात. तथापि यामुळें तो मनुष्य लोकनिंदेस पात्र होत नाहीं. लोक एकाद्याची निंदा त्याच्या दुराचरणामुळेंच फार करितात. मनुष्य

कोणताही धंदा करो; त्यांत त्यास यश येवो किंवा न येवो; परंतु तो सदाचरणी असेल तर त्यास सर्वांपासून चांगलेपणा मिळतो, व तो कीर्तीमान होतो, आणि सत्कीर्तीचा लाभ झाला ह्मणजे तो इतर दुःखास बाजूला टाकतो; आणि त्या कीर्तीपासून सुख पावतो. खरोखर पाहिलें तर मनाचें समाधान हेंच मोठें सुख आहे, आणि हें जर सत्कीर्ति संपादल्यानें होतें तर ती संपादण्याकडे प्रत्येकानें लक्ष दिलें पाहिजे. सर्वांकडून बरेपणा मिळविण्यास सदाचरणासारखा दुसरा सुलभ उपाय नाहीं, ह्मणून मनुष्याचें पहिलें कर्तव्यकर्म आपलें आचरण निर्दोष राखण्याविषयीं झटणें किंवा सद्वर्तन ठेवणें हें होय. सद्वर्तन हा असा कांहीं अमोलीक गुण आहे कीं तो संपादन करण्यास जे मनापासून निरभिमानानें यत्न करतात त्यांस अतिसोपा असून सद्वर्तनी मनुष्यास फारच लोकप्रिय करणारा आहे. साधेल त्यास अति सोपा ह्मणजे असा कीं तो संपादण्यास कांहींएक प्रयास करावे लागत नाहींत. ह्मणजे एकादी कला शिकण्यास श्रम घ्यावे लागतात तसे सद्वर्तनी होण्यास लागत नाहींत. तर उलट अमुक प्रकारच्या गोष्टी आपले हातून न होऊं देण्याविषयीं मात्र काळजी घ्यावी लागते. अर्थात अशा गोष्टीं पासून अलिप्त राहावें लागते. आणि हें ज्यांस साधतें त्यांस लोक सद्वर्तनी म्हणतात.

कोणीही मनुष्य कबूल करील कीं मनुष्य निरुपद्रवी असला, ह्मणजे त्याजकडून दुसऱ्याच्या मनास इजा पोंचण्यासारखें कोणतेंही वर्तन न घडलें ह्मणजे तो लोकांस एकाद्या गुणानें जरी विशेष प्रिय झाला नाहीं तरी त्याचा कोणी तिरस्कार करीत नाहींत. पहा कीं एक इसम चोरी, चहाडी व्यभिचार, वगैरे दुर्गुणापासून दूर राहून कोणत्याही प्रकारची

इजा दुसऱ्यास करीत नाहीं तर लोक त्याचा तिटकारा करणार नाहींत. आतां त्याचे अंगीं एकादा मोहक गुण नसला तर लोकांची आपणावर विशेष प्रीति तो बसवूं शकणार नाहीं. तथापि सर्वत्र तो लोकमान्य होईल. परंतु दुसरा असा एक घ्या कीं तो अतिशय परोपकारी असून विद्वानही आहे पण वर लिहिल्यापैकीं एकादा दुर्गुण त्याचे अंगीं आहे. तर मला वाटतें तो फार थोड्यांसच प्रिय होईल. व त्याच्या परोपकाराची व विद्वत्तेची किंमत राहणार नाहीं. कारण अशा मनुष्याच्या दुर्वर्तनापासून लोकांस इजा होईल. अर्थात ह्यापेक्षां पहिल्या प्रकारचा मनुष्य अधिक चांगला असें सर्व ह्मणतील. ह्मणून सद्वर्तन ठेवणें हें मनुष्याचें पहिलें कर्तव्यकर्म आहे. व हें कर्तव्यकर्म जो सदोदित करतो तो लोकांस कधींहि अप्रिय होत नाहीं.

सत्य भाषण करणें हा सद्वर्तनाचा पाया आहे. हा पाया जर मजबूत असेल तर मनुष्याच्या वर्तनरूपी इमला ढासळण्याचा फार थोडा संभव रहातो. सत्य भाषण करण्याबद्दल पक्का निग्रह असला ह्मणजे मनुष्य वाईट कृत्य कधींच करणार नाहीं. कारण आपण केलेलें वाईट कृत्य प्रसंगीं आपणास दुसऱ्या जवळ कबूल करावें लागेल. व तें कबूल करून लोकांस कळलें ह्मणजे आपल्या अब्रूस धक्का बसून ते आपली विटंबना आणि निंदा करतील. व जगापासून होणारा फायदा बाजूला राहून उलट अपकीर्तीनें नुकसान होईल, अशी त्यास भीति वाटते. यामुळें उघडपणें चारचौघांस सांगण्यास हरकत नाहीं असेंच काम मनुष्य नेहमीं करतो. याकरितां खरें बोलण्याविषयीं प्रत्येकानें निग्रह करावा. खोटें बोलण्याचा स्वभाव नफा नुकसानीची परवा न बाळगितां मुख्यत्वेंकरून संवयीनें फार बनतो, जे लोक खोटें बोलतात ते केवळ लोकांचें नुक-

सान किंवा आपला फायदा करण्याकरितां सदोदित तसें करितात असें नाहीं. नफानुकसानाचा कांहीं संबंध नसला तरी साहजिक त्यांचे तोंडांतून खोटे शब्द येतात. एकादे इसमानें स्वतः करितां बाजारांतून कांही जिन्नस विकत आणिला व आपण त्यास त्या जिनसाची किंमत विचारिली तर कांहीं कारण नसतांना तो साहजिक त्यांत पैसा दोन पैसे कमीजास्त सांगतो, अशा रीतीनें सर्वच लोक खोटें बोलतात असें नाहीं, परंतु खरोखर जगाचा कांहीं अंशीं कलच असा, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. खोटें बोलण्याची संवय मनुष्यास लहान पणापासून लागते. लहान मुलांचे व्यवसाय क्षुल्लक ह्मणून खोटें बोलण्या पासून होणाऱ्या नुकसानाकडे आईबापांचें किंवा पालकांचें लक्ष जात नाहीं. कधीं कधीं आईबाप स्वतः खोटें बोलतात व त्यांच्या अनुकरणानें त्यांचीं मुलेंही खोटें बोलण्यास शिकतात. कित्येकांनीं असें पाहिलें असेल कीं कोणीं मनुष्य एकाद्या गृहस्थास बोलावूं आला किंवा कांही कामाकरितां त्याजकडे आला तर, ' बाबा घरांत नाहींत " ह्मणून सांग असें आपल्या मुलास पुष्कळ इसम शिकवितात. व आपण खोटें बोलून मुलासही खोटें बोलण्यास लावितात. मग पुढें असेंच त्या मुलानें केलें ह्मणजे त्यांजकडे काय दोष आहे बरें! कितीहि नुकसान झालें तरी हरकत नाहीं असें जाणून सत्यापासून न ढळणारे लोक खरोखर विजयी होतात यांत संशय नाहीं. कारण, खरे बोलणाराचे खरेपणाबद्दल कालांतरानें तरी लोकांची खात्री होऊन त्याचे कल्याणाची इच्छाधरून त्याचे बऱ्याकरितां लोकं शक्त्यनुसार झटतात. सत्यवादी मनुष्य सर्वांस प्रिय होतो असत्य बोलण्यापासून क्षणभरच फायदा होतो व त्यापासून क्षणिकच सख होतें. आपण जर एकाद्यास खोटी गोष्ट

सांगितली तरी ती खोटी गोष्ट आहे असें समजेतोपर्यंतच तो आपला मान ठेवील. परंतु तिचा खोटेपणा त्यास कळून आला ह्मणजे आपली त्याजवळ किंमत रहाणार नाहीं. आपण एकादे वेळेस त्यास खरी गोष्ट सांगितली तरी सुद्धां तो ती खोटी मानील. खरी गोष्ट बोलल्यापासून कदाचित आपणास किंवा दुसऱ्यास क्षणभर दुःख होतें ह्मणजे तें खरें बोलण्यापासून होतें असा अर्थ कोणी घेऊनये; तर गोष्टीच्याच दोषीपणामुळे दुःखास कारण होतें. तथापि खरें बोलल्यापासून मन समाधानी राहून आपले सद्वर्तनाविषयीं सुख वाटतें. खोटें बोलणाराची लबाडी कधींनाकधीं दृष्टोत्पत्तीस आल्यावाचून रहात नाहीं. व मागून झालेली उघडकी पहिली पेक्षां फारच मोठा घात करिते. कोणी एका गृहस्थाकडे एक गवळी दुधाचा रतीब देत असे. आपल्याधंद्यांत फायदा व्हावा ह्मणून त्यानें दुधांत पाणी मिसळून दूध पाणचट लागूनये ह्मणून त्यांत थोडी साखर मिळवावी. हा क्रम पुष्कळ दिवस चालला. दूध चवदार लागतें, परंतु पोराबाळास बाधतें याचें कारण काय ह्मणून त्या गृहस्थानें गवळ्यास दोन चार वेळां विचारिलें. गवळ्यानें शपथ वाहून खात्रीपूर्वक सांगितलें कीं "रावसाहेब आपल्या घरीं मी विशेष काळजीनें ताजें दूध देतों." कर्म धर्म संयोग असा कीं एक दिवस त्या गवळ्याची दुधाची चरवी सांडली; आणि दूध जिरतें नाहीं जिरतें तोंच त्या दूध सांडल्या ठिकाणीं पुष्कळ मुंग्या आल्या; त्यांजवर त्या गृहस्थाची नजर जाऊन त्याला गवळ्याचे लबाडीबद्दल पक्का संशय आला. मग त्यानें त्या गवळ्याचे दुधाची योग्य पारख करवून आपला संशय फेडिला. नंतर गवळ्यास दम दपडशा दिल्यावर गवळ्यानें आपलें कृत्य कबूल केलें व यथान्याय त्यास शासनही मिळालें. मग

त्याच्या अविश्वासूपणाची सर्वांस माहिती होऊन त्याचा धंदा अगदीं बुडाला. तात्पर्य आपलें खोटें कृत्य जर तो गवळी त्या गृहस्थास पहिल्यानें कबूल करता, तर फार झालें तर त्या गृहस्थाकडील रतीब बंद होण्यापेक्षां जास्त शासन त्यास झालें नसतें; त्या गृहस्थाकडील रतीब बंद झाला असता तरी त्यास दुसरीकडे तो चालू करता आला असता. परंतु त्याच्या लबाडीची पुनरावृत्ति फार वेळ झाल्यामुळें व खोटें बोलण्यामुळें त्याचें सदोदितचें नुकसान झालें. याप्रकारचीं अनेक उदाहरणें व्यवहारांत प्रत्येकाचे नजरेस आलीं असतील अस्तु. आपले हातून एखादा अन्याय घडला तर शासन चुकविण्याकरितां किंवा दोष न येऊं देण्याकरितां खोटें बोलावयाचें नाहीं, असा प्रत्येकाचा निश्चय असावा. व असा निश्चय असला ह्मणजे बहुतकरून अन्याय घडणार नाहीं. सत्याची आवड ही आपल्या वर्तनास चाबूकच आहे. आपलें वाईट वर्तन लोकांस सांगण्यास स्वभावतः लाज वाटते. याकरितां सत्याची आवड असली ह्मणजे लोकांत चांगलेपणा मिळविण्याकरितां व दोष न येऊं देण्याकरितां मनुष्य सद्वर्तन ठेवतो यांत संशय नाहीं.

खोटें बोलण्यापासून अनेक तोटे होतात. एखादे वेळेस फायदाही होतो· परंतु तो नेहमींचा नसतो. त्याचा परिणाम केव्हांना केव्हां तरी वाईट झाल्यावाचून राहात नाहीं. पैशाच्या लोभानें लोक खोटी साक्ष देतात, व त्याबद्दल पैसा मिळवून क्षणभर सुखी होतात. परंतु खोटी साक्ष दिल्याबद्दल न्यायाधिशानें खटला करून शिक्षा देवविली ह्मणजे तें दुःख जिवापेक्षां भारी वाटतें. याकरितां कधीं कोणी खोटें बोलूं नये; त्यांतच यश आहे. खरें बोलणाऱ्याचा खरेपणा व खोटें बोलणाऱ्याचा खोटेंपणा हे कालांतरानें उघडकीस येतात. व

तदनुसार बरे वाईट परिणाम घडतातच. ह्मणून हें चांगलें लक्षांत ठेवावें; व मनाची वृत्ति खऱ्याकडे सदोदित वळवावी ह्मणजे सद्वर्तनाचें मोठेंच अंग संभाळल्यासारखें झालें.

आपलें वर्तन चांगलें ठेवण्यास आपलें मन आपणास उत्तम शिक्षक आहे. जसें आपणाशीं लोकांनीं वागावें असें आपणास वाटतें तसेंच आपण लोकांशीं वागलें पाहिजे हें आपलें मन शिकवितें. परंतु आपलेच मनावरून वर्तन सुधारणारे लोक थोडे असतात. दुसऱ्यानें आपणास मारिलें किंवा शिवी दिली ह्मणजे जसें आपणास वाईट वाटतें तसेंच आपण लोकांस मारिलें किंवा शिवी दिली तर लोकांस वाईट वाटेल, हें आपलें मनांत बिंबलें पाहिजे. आणि अशी गोष्ट मनुष्याचे मनांत बिंबून तो तदनुसार वर्तन करूं लागला ह्मणजे निरुपद्रवी बनलाच असें समजावें. कारण एखाद्यानें आपणास उपद्रव करावा अशी कोणाची इच्छा नसते. लोकोपद्रवापासून लाभ होतो अशी त्याची पक्की समजूत असते. आणि हीच समजूत त्यानें आपणाविषयीं लोकांबद्दल घेतली ह्मणजे लोकांस त्रास देण्याविषयीं त्याचें मन कधींही प्रवृत्त होणार नाहीं. अर्थात तो अशा रीतीनें निरुपद्रवी झाला तर लोकमान्य होईल यांत काय नवल आहे? तात्पर्य इतकेंच समजूं लागल्यापासून प्रत्येकानें आपलें आचरण लोकांत स्तुत्य होईल असें ठेवण्याविषयीं पहिल्यानें झटलें पाहिजे; ह्मणजे आयुष्यक्रमांत पाहिजे तो दरवाजा त्यास मोकळा असतो.

सद्वर्तन कायम राहण्यास मनोनिग्रह व स्वावलंबन हीं अवश्य आहेत. हे गुण ज्याचे ठिकाणीं आहेत त्याचें सद्वर्तन दुसऱ्याचे अनुकरणानें किंवा मोहानें कधीं ढळणार नाहीं. असे पुष्कळ लोक असतात कीं सद्वर्तन ठेवण्याविषयीं मना-

भासून त्यांची इच्छा असली तरी त्यांचें अंगीं वरील शक्ति नसल्यामुळें त्यांचें सद्वर्तन कायम राहत नाहीं मनुष्याचें आचरण जन्मतःच वनलेलें नसतें तें भोंवतालच्या मंडळीच्या अनुकरणानें बरें वाईट होतें व सृष्टीक्रमाचा असा कांहीं चमत्कार आहे कीं, चांगल्यापेक्षा वाईट खोडी साहजिक त्यास लवकर लागतात ह्मणून त्याची काळजी असणाऱ्या मंडळीनीं चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें त्यास समजावून त्याच्या मनाची प्रवृत्ति चांगल्या मार्गाकडे होईल असें केलें पाहिजे आणि हें होण्यास पहिला उपाय ह्मटला ह्मणजे आपलें स्वतःचें वर्तन अनुकरणीय ठेविलें पाहिजे. लहानपणांत अनुकरण शक्ति मनुष्याचे आंगीं इतकी असते कीं त्याचा स्वभाव पंधरा सोळा वर्षांचे वयापर्यंत बनून जातो. त्याच्या पुढील आयुष्याची पारख बहुत करून त्या वेळेसच करितां येते, लहानपणीं दुर्मार्गास लागलेलीं मुलें मोठेपणीं क्वचितच सदाचरणीं निपजतात. ह्मणजे त्यांचें लहानपणचें दुराचरण मोठेपणीं बहुत करून कायम राहतें तथापि सदाचरणी निपजण्याची आशा दाखविणारीं मुलें मनोनिग्रह नसल्यामुळें पुढें दुराचरणीं निपजलीं अशीं पुष्कळ उदाहरणें दाखवितां येतील.

मनो निग्रहाच्या योगानें एकदा लावून दिलेला मार्ग मनुष्य कधीं सोडणार नाहीं. आणि मनो निग्रह स्वावलंबनाशिवाय कधीं जडणार नाहीं. स्वावलंबन ह्मणजे आपल्या वर्तनावर आपला भरंवसा असणें हें होय. मनुष्याचें वर्तन चांगलें असलें व चांगलें असल्याबद्दल त्याच्या मनाची खात्री असून त्याची त्यास आवड असली ह्मणजे तें वर्तन सोडून दुसऱ्याचें अनुकरण न करण्याविषयीं त्याचा मनोनिग्रह आपोआप होतोच. ह्मणून मनाची वृत्ति इतकी दृढ होण्यापूर्वीच मुलांचे आईबापांनीं किंवा इतर पालकांनीं त्यांचे वर्त-

नाचा पाया चांगला मजबूत घालून दिला पाहिजे. अर्थात त्यांची गृहशिक्षा चांगली असली पाहिजे. ह्मणजे तीं मुलें बहुधा सद्वर्तनी निपजल्याशिवाय राहणार नाहींत. अशा रीतीनें सद्वर्तनी झाल्यावर दुसऱ्याचे दुराचरणाचें अनुकरण न करून मनोनिग्रह व स्वावलंबनाचे शक्तिपासून सदाचरण कायम राहण्याविषयीं मोठा फायदा होतो. त्या शक्तिपासूनच दुसरा फायदा हा कीं मनुष्य दृढ निश्चयी होतो. दृढ निश्चय व मनोनिग्रह यांचा अर्थ बहुतेक जवळ जवळच आहे. मनोनिग्रहामुळें एकदा धरलेल्या एका मार्गापासून दुसऱ्या मार्गाकडे मनुष्य प्रवृत्त होत नाहीं. मनुष्य फक्त मनोनिग्रही असेल तर त्याचे हातून उत्तरोत्तर मोठालीं व स्तुत्य कृत्यें होणार नाहींत एकदा बनलेला स्वभाव तो कायम ठेवील परंतु दृढ निश्चयी मनुष्य आपले शक्तीप्रमाणें पाहिजे तें करूं शकेल. शिवाजीनें मोंगलांस जिंकून ब्राम्हणांचें संरक्षण करण्याचा दृढनिश्चय केला होता ह्मणूनच त्यानें अनेक संकटें भोगून मोठ्या प्रयत्नानें त्यांचा मुलुख घेतला व अखेरीस राजपद मिळविलें. रामशास्त्रयांचीही अशीच गोष्ट आहे. यजमानानीं केलेल्या अपमानामुळें ईर्षा चढून त्यांजकडून सन्मान मिळवीन तरच पुण्याचें तोंड पाहीन असा जबर निश्चय केल्यामुळें काशीक्षेत्रीं बारा वर्षें अध्ययन करून राम्या शागिरदाचे रामशास्त्री झाले. रामशास्त्रयाचे विद्वत्तेस मूळकारण जरी ईर्षा झाली तरी दृढनिश्चयानेंच त्यांचा पण सिद्धीस गेला. त्यांनीं दृढनिश्चय केला नसता तर त्यांचे ईर्षेपासून कांहीं फायदा झाला नसता. असो तात्पर्य इतकेंच कीं प्रत्येकानें सदाचरण कोणतें दुराचरण कोणतें सत्कीर्ति कशापासून होते, अपकिर्ति कशापासून होते हें चांगलें ध्यानांत ठेवून मनोनिग्रहाच्या योगानें आपलें मन दुर्मार्गास जाऊं न देतां दृढनिश्चयानें मोठालीं कृत्यें

करावीं आणि आपलें नांव गाजवून जगत्रयीं मोठें भूषण मिळ-
वून जन्माचें सार्थक्य करावें.

येथपर्यंत सद्वर्तनाविषयीं सांगितलें. आतां मनुष्याचें दुसरें कर्तव्य कर्म शरीर संरक्षण हें होय. मागें सांगितलेंच आहे कीं मनुष्य जें जें करतो त्याचें इच्छित फल सुख असतें. सुख प्राप्तीकरितां जसें सद्वर्तन अवश्य आहे तसें आरोग्य हेंही आहे. याकरितां शरीर निरोगी व सुदृढ ठेवण्याविषयीं प्रत्येकानें जपलें पाहिजे. आरोग्य हें सुखाचें साधन आहे. शरीर निरोगी असल्याशिवाय सर्व सुखांचा अनुभव मिळणें कठीण आहे. कारण मनुष्याचे सर्व व्यवहार शरीर बलावर अवलंबून असतात. ह्या जगांत आल्यावर धर्मअर्थ काम मोक्ष असे जे चार पुरुषार्थ आपणास मिळवावयाचे असतात ते शरीर निरोगी असल्याशिवाय मिळवणार नाहींत. फार तर काय शरीर निरोगी नसेल तर मनुष्याचे हातून कोणतें एकादें मोठें कृत्य होणें अगदीं अशक्य आहे. कारण शरीर रोगी असल्यामुळें मन उद्विग्न असतें. त्याची विचार शक्ति बंद होते. आणि मनुष्याचा सर्वकाळ आपल्या जिवाची काळजी करण्यांत जातो. मग अशा स्थितींत एकादें कृत्य करण्याविषयीं त्यांस उल्हास येईल कोठून?

मनुष्याचे सर्व व्यवहार आरोग्यावर अवलंबून असतात. व आरोग्य राखण्यास शरीरास फार जपावें लागतें. शरीराचें कोणतेहि अवयवास थोडी इजा झाली तर इतर अवयव आपलीं कामें बरोबर करीत नाहींतसे होतात. कारण सर्व अवयवांचा एकमेकांशीं सारखा व निकट संबंध आहे. जसें घड्याळाची एकखीळ ( पिन्हट ) फक्त सैल झाली ह्मणजे तें नीट चालत नाहींसें होतें तसें आपल्या शरिराच्या जरी एका भागास इजा झाली तरी ती इतर सर्व भागांना कमजोर

करितें ह्या करितां प्रत्येकानें आपल्या शरीराचे कोणतेंहीं भागास इजा न होऊं देण्याविषयीं होईल तितकें जपून शरीर निरोगी व सुदृढ राखण्याविषयीं काळजी घेतली पाहिजे. सर्व संपत्ति अनुकूल असून जर शरीरसंपत्ति नसेल तर सर्व तुच्छवत् भासतें. मिष्टान्न खाऊन नानातऱ्हेचे ऐषआराम भोगणाऱ्या एकाद्या दुखणाईत राजापेक्षां चटणभाकर खाऊन घोंगडीवर निजणारा मजूरदार शरीर संपत्तिमुळें अधिक सुखी असतो. कारण शरीर सामर्थ्य असेल तरच राजास इतर सुखांचें अनुभव घेतां येतील. दांत पडलेल्या एकाद्या वृद्ध मनुष्यास कडक दाण्यांपासून जितकें सुख होतें तितकेंच सुख दुखणाईत राजास संपत्तिपासून होईल. ह्मणून शरीर निरोगी राखणें हें कोणतेही प्रकारचे सुखानुभव इच्छिणाऱ्या मनुष्याचें मोठें महत्वाचें कर्तव्यकर्म आहे.

वैद्य शास्त्राप्रमाणें म्हटलें तर मनुष्यास फक्त जन्मल्यापासूनसुद्धां जपून चालणार नाहीं. मातेच्या उदरांत गर्भ आहे तेव्हांपासूनच तिला खाण्यास जे पदार्थ घालावयाचे व तिला ज्या तऱ्हेनें वागवावयाची ते पदार्थ व ती तऱ्हा तिच्याभावी मुलास सुखकारक होईल अशी असली पाहिजे. अकालीं होणाऱ्या रोगांचा संभव बाजूला ठेवून जर अशा तऱ्हेनें एकाद्या मनुष्याची जपणूक सतत केली तर तो खरोखरी निरोगी झाल्याशिवाय राहणार नाहीं. मनुष्याची प्रकृति सुदृढ राहणें हें त्याच्या आईबापांवर किंवा इतर रक्षकांवर सर्वथा अवलंबून असतें. मनुष्य वयांत येईतोंपर्यंत त्यास प्रकृतीचें विशेष बरें वाईट कांहीं कळत नाहीं. त्याचे रक्षकांस त्याची जोपासना करावी लागते. व ती त्यांनीं काळजीपुरस्कर न केली तर त्यांचे हयगयीचा परिणाम त्या मनुष्यास पुढें भोगावा लागतो. लहानपणापासून जडलेला रोग मोठेपणीं काढ-

ण्यास फारच प्रयास पडतात ह्या करितां लहान मुलांची प्रकृति उत्तम राखण्याबद्दल वडील माणसांनीं फारच जपलें पाहिजे. कित्येक लोक तर मुलांची बरीच हेळसांड करितात. एक गृहस्थ आपल्या आईस म्हणाला; आई तूं मला या पोराबिरांच्या दुखण्याबद्दल वारंवार त्रास देऊं नको. मला त्याचें कांहीं महत्व वाटणार नाहीं. त्या अनुभवीक व शहाण्या आईनें शांतपणानें उत्तर दिलें अरे थोरांच्याच दुखण्याबद्दल महत्व मानावयाचें असें तुझें ह्मणणें पण तीं तरी लहानांचींच मोठीं झालेलीं असतात. हींच पोरें उद्यां नांवारूपास येणार नाहींत ह्मणून कशावरून," धन्य त्या माउलीची! हे तिचे शब्द प्रत्येक आईबापानीं ध्यानांत ठेवण्यास रखे आहेत. असो. शरीर निरोगी राखण्यास नियमितपणा लागतो. व तो बाळगण्याची संवय मुलांस पहिल्यापासून लावावी, ह्मणजे तीं वयांत येतात त्यावेळेस नियमितपणानें चालतात.

शरीरसामर्थ्य असलें ह्मणजे मनुष्य फक्त आपलेंच कल्याण करितो असें नाहीं. परंपरेनें त्याचे हातून दुसऱ्याचेंहीं कल्याण होतें. व त्याचे अंगीं स्वाभाविक ईर्षा व परोपकारबुद्धि असली ह्मणजे आपल्या देशाचेंही तो कल्याण करितो. कारण उद्योगाशिवाय शरीर कधींही निरोगी राहणार नाहीं. एकाद्या आळशी मनुष्याचें उदाहरण घ्या. त्याचे शरीरास कांहींनाकांहीं व्यथा नेहमीं असतेच कारण त्याच्या इंद्रियाचे व्यापार सदोदीत व्यवस्थेनें चालत नाहींत. व यामुळें जसें एकादें हत्यार न वापरल्यामुळें गंजून जातें व निरुपयोगीं होतें, तद्वत् गोष्ट आळशी मनुष्याची होते. ह्या करितां ज्या देशांतील लोक निरोगी व सदृढ असतात, तो देश बहुधा ऊर्जित दशेंत आल्यावांचून रहात नाहीं. कारण जर लोक निरोगी आहेत, तर उद्योगी असलेच पाहिजेत;

आणि उद्योग हा देशकल्याणाचें मोठें साधन आहे. शिवाजी व बाजीरावासारखे उद्योगी व शूर पुरुष निपजले, ह्मणूनच त्यांनीं मुसलमानांपासून मुलूख मिळविला. परंतु शाहू व दुसरे बाजीरावासारखे आळशी व भित्रे लोक आधिकारावर येतांच इंग्रज सरकारच्या स्वाधीन तो त्यास करावा लागला. एकंदरींत शरीरसामर्थ्य योग्य कामीं लाविल्यास सर्व प्रकारें फायदेशीर आहे. शरीरसामर्थ्यासंबंधानें आपणांस विशेषेंकरून आहार, व्यायाम व ब्रह्मचर्य या तीन गोष्टींचा विचार करणें आहे. कारण या तीन गोष्टी शरीररूपीं इमारतीचा पाया आहत. यथा कालीं आहार, व्यायाम व ब्रह्मचर्य हीं योग्य रीतीनें चालविलीं ह्मणजे शरीर उत्तम राहील, यांत संशय नाहीं. ज्याचे हातून या तीन गोष्टीबद्दल थोडीशी हयगय होईल ते रोगी व अशक्तच रहातील. आहार, व्यायाम व ब्रह्मचर्य यांचीं कार्यें पोषण, पचन व रक्षण हीं अनुक्रमें आहेत. या तीन कार्यांतून फक्त एक कार्य पुरतें न झालें, तर मनुष्याची प्रकृति बिघडल्याशिवाय रहाणारच नाहीं.

शरीराची वृद्धि होण्यास व त्याचे व्यापार चालण्यास अन्नाची अवश्यकता आहे. नियमितपणें स्वच्छ अन्न बेतवार खाल्ल्यास रक्त, मांस मज्ज्याहाडें वगैरे जे शरीराचे घटकावयव ते ठराविक कालपर्यंत सदोदित वृद्धिंगत होऊन मनुष्यास शक्ति आणितात. अन्न हें ज्याच्या त्याच्या स्थितीप्रमाणें व पाचकशक्तीप्रमाणें खावें लागतें. एकादा नाजुक श्रीमंत गृहस्थ किंवा फक्त मानासिक श्रम करणारा एकादा विद्वान जर, ओझीं वाहणाऱ्या हेलकऱ्याप्रमाणें कांदा भाकर खाईल तर ती त्यास पचणार नाहीं. कारण ती पचण्यास शारीरिक मेहनतच पुष्कळ व्हावी लागते, व ती अशांचे हातून होत नसते. तसेंच एकादा हेलकरी दूध भातासारखें ना-

जूक अन्न जेवील तर तें त्याच्या शाकट कामास टिकाव धर णार नाहीं. त्याच्या पिंडास सकस व जड अन्नाची संवय झाल्यामुळें त्यास कदाचित् तें नाजुक अन्न मानवणारही नाहीं. लहानपणापासून जशी संवय ठेवावी तसें अन्न मनुष्यास पचतें. मागें सांगितलेंच आहे कीं, सदाचरण हें मनुष्याचें पहिलें कर्तव्यकर्म आहे, तर तें राखण्याकरितां मद्यमांस खाण्याची संवय कधींही कोणी लावूं नये. आतां कोणी ह्मणेल कीं, मद्यमांसाची संवय न करितां ह्मणजे त्याविषयीं व्यसनी न बनतां एकादे वेळेस त्याचा स्वीकार करण्यास विशेष हरकत नाहीं. कारण त्यापासून नुकसानीचा किंवा अब्रूहानीचा संभव कमी. परंतु ही समजूत चुकीची आहे, प्रसंगोपात एकच वेळ मोठ्या हानीस कारण होते हें खूप लक्ष्यांत ठेवावें. याकरितां तें कधींच कोणी खाऊं नये. जाती धर्माप्रमाणें तीं खाण्यास जरी कित्येकांस प्रतिबंध नाहीं, तरी त्यांनीं सुद्धां त्याचा निषेध करावा. कारण मद्यपान शरीरास अवश्य नसून उलट अपायकारक आहे. मद्यपानापासून भान नाहींसें होऊन त्या स्थितीमध्यें मनुष्य पाहिजे तो अविचार करण्यास प्रवृत्त होतो. अंगीं शहाणपण असतां मद्यपानानें क्षणभर मुद्दाम वेडें बनणें हें केवढें मूर्खपण आहे ? याकरितां मद्यपान सर्वथा वर्ज करावें हें फार उत्तम. तसेंच मांसाहार जरी शरीरपुष्टीस मदत करितो, तरी त्याची विशेष जरूरी नाहीं. कित्येक विद्वान वैद्यांनीं मांसाप्रमाणें पुष्टीकर गुण पुष्कळ वनस्पतींत आहेत, असें दाखविलें आहे, हत्ती, घोडा, वगैरे पशूंचें भक्ष मांस नसतां ते किती बळकट आहेत. हें प्रत्यक्ष सर्वांस माहितच आहे. बापुगोखल्यासारखे ताकभात खाणारे पुरुष मांसाहारी लोकांपेक्षां शूर व बळकट होते. हें इतिहासावरून समजतें. हल्लींही कोठें कोठें अशीं उदाहरणें सांपडतील,

मलास माहिती असेल कीं गुर्जरांत सर्व हिंदुलोक कुळंब्या-पासून तो अति उच्च जातीपर्यंत कोणी मांसाहार करीत नाहींत तथापि तेथील अंगमेहनत करणारे लोक इकडील मांसाहारी लोकांप्रमाणें मजबूत असतात. ज्यांनीं मुंबईत दा-णेवाल्याचे व्यापार करणारे व बंदरावर काम करणारे वाणी लोक पाहिले असतील त्यांची याबद्दल खात्री झालीच असेल. तर वस्तुतः कोणतेही प्रकारचा विशेष फायदा नसतां परमे-श्वरानें आपणाप्रमाणेंच निर्माण केलेल्या प्राण्यांची हिंसा करणें यांत काय अर्थ ! कित्येक मांसाहारी व मद्यपी जातींतसुद्धां मांस न खाणारे व मद्य न पिणारे असे थोर पुरुष आहेत, त्यांचें अनुकरण सर्वांनीं करावें, मद्यमांस खाल्यापासून अंगीं क्रौर्य उत्पन्न होतें, परंतु मनुष्यास क्रौर्याची कांहींच गरज नाहीं हें विचारांती कोणीही कबूल करील. तात्पर्य इतकेंच कीं प्रत्येकानें मद्यमांस न खातां आपले स्थितीचें मानानें व नियमितपणानें आहार करावा.

शरीराचे व्यापार सुरळीत चालण्यास जसा आहार अव-श्य आहे तसा व्यायामही आहे. व्यायाम न केला तर अन्न पचत नाहीं व भूक लागत नाहीं. यामुळें शरीरास पुष्कळ रोग उत्पन्न होतात. व्यायाम ह्मणजे हल्लींचे समजुतीप्रमाणें मजेखातर फिरावयास जाणें असें नाहीं. तर अन्न पचण्याजोगे नित्यक्रमांतील मानसिक किंवा शारीरीक श्रम करणें किंवा नित्यक्रमांत तसें श्रमाचें काम नसल तर मुद्दाम एकादे प्रका-रची मेहनत करणें हें होय. व्यायाम हा आयुष्यक्रमांत लहान थोरास स्वाभाविक होतोच. तथापि शरीर सामर्थ्याची ज्यांस आवड आहे, त्यांनीं विशेष प्रकारचा व्यायाम नेहमीं करावा हें उत्तम. व्यायाम केल्यानें शरीरांतील मल व रक्ताचा अशुद्धपणा घाम येऊन नाहींसा होतो. पूर्वींच्या

सरदार लोकांत दांड, पट्टा, व घोड्यावरील फेर पटका, वगैरे प्रकारचा व्यायाम नेहमीं जारीनें चालू असे; ह्मणूनच ते बळकट व शूर असत. रानटी व काबाडकष्ट करणारे लोक बळकट व शूर असतात, याचें कारण तरी हेंच आहे. त्यांची मेहेनत फार होते ह्मणूनच त्यांचें अन्न चांगलें पचून अन्नाचा सद्रुचय उत्तरोत्तर जास्त होऊन ते बळकट राहतात. शरीर-सामर्थ्य हें पाचनशक्तीवर फारच अवलंबून आहे. पाचनशक्ति नसेल तर शरीरांत अन्नाचा सद्रुचय होणार नाहीं. व अन्न न जिरलें ह्मणजे रोगाचा उद्भव होईल. याकरितां व्यायाम सर्वांनीं अवश्य केला पाहिजे. स्वाभाविक किंवा मुद्दाम केलेला व्यायाम झाला ह्मणजे मनुष्यास विश्रांतीहि अवश्य आहे. विश्रांति घेतल्यामुळें श्रमाचा परिहार होऊन पुन्हा काम करण्यास नवी उमेद येते. बहुतेक सर्व उद्योगी लोकांस अनुभव असेल कीं एक दिवस झोंप न घेतली तर दुसरे दिवशीं काम करण्यास हुशारी येत नाहीं. कारण विश्रांति नसल्यामुळें अगोदरचा थकवा मोडलेला नसतो. झोंप ही मनुष्यास मोठी विश्रांति आहे. झोंप न घेतली तर खाल्लेलें अन्नसुद्धां पचण्यास जड जातें, व आपल्या आरोग्यास धक्का बसतो. ह्मणून योग्य तितकी विश्रांति घेऊन व्यायाम अथवा मेहनत करून शरीर निरोगी व सुदृढ राखण्याविषयीं सर्वांनीं जपावें.

शरीरसामर्थ्याचा तिसरा खांब ब्रह्मचर्य होय. हें जे खरोखर सदोदित पाळणारे आहेत त्यांचा इतर सर्व गोष्टींविषयीं नियमितपणा असेल तर त्यांची शक्ति फारच विलक्षण असली पाहिजे. असे पुरुष विरळा आढळतात. शरीर सुदृढ राखण्यास हें व्रत अगदीं कडक पाळावें लागतें असें नाहीं. सृष्टीनियमाप्रमाणें यापासून कधीं कधीं पराङ्मुख व्हावें लागतें. तथापि या व्रताचें उल्लंघन वाजवीपेक्षां जास्त झालें तर तें श-

रीर घातक होतें. प्रत्यक्ष सुद्धां उल्लंघन होण्यास नको. नुस्ती कामवासना वारंवार झाली तर ती देखील घातक आहे. ब्रह्मचर्याचें अनियमित उल्लंघनामुळें व कामवासनेमुळें अन्नाचे परिणाम जे शरीरांतील धातु त्यांचा क्षय होतो व शरीरसामर्थ्याची जीं अशीं महत्वाचीं तत्वें तीं नाहींशीं झालीं ह्मणजे अर्थात तो मनुष्य क्षीण होऊन लवकर लयास जातो. याकरितां प्रत्येकानें इंद्रिय निग्रहाची संवय ठेवावी ह्मणजे शरीरसामर्थ्यास धक्का बसणार नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें आहार, व्यायाम, व ब्रह्मचर्य यांचे नियम पाळून वर्तन केलें ह्मणजे शरीरसामर्थ्य चांगलें राहून मनुष्य सर्व सुखांचा अनुभव घेऊं शकतो. व अंगीं उमेद येऊन मोठालीं कृत्यें करतो, याशिवाय शरीर निरोगी व सुदृढ असल्यामुळें रोगाच्या ज्या वेदना त्यांचें दुःख आपणांस होत नाहीं. तर अशी अमोलिक शरीरसंपत्ति काळजी पुरःसर मिळवावी हें सर्वांस योग्य आहे.

आतां मनुष्याचें तिसरें कर्तव्यकर्म ज्ञान संपादन हें होय. हें त्यानें केलें ह्मणजे परमेश्वरानें मनुष्य जातीच्या प्राण्यास बुद्धिरूप देणगी दिल्याचें सार्थक्य झालें. मागें सांगितलेंच आहे कीं, मनुष्य जो सर्व प्राण्यांत श्रेष्ठ झाला तो आपल्या बुद्धिसामर्थ्यानें झाला. मग परमेश्वरानें तें सामर्थ्य त्यास दिलें असून त्याचा उपयोग जर तो ज्ञानसंपादण्याकडे न करील तर त्याचे अंगीं मनुष्यत्व नाहीं, असें म्हणावयाचें. ज्ञान हें मनुष्यास भूषण आहे. ज्ञानी मनुष्यावर सर्व लोक प्रीति करितात. ज्ञान ही महत्वाची संपत्ति आहे, इतर संपत्ति चोरली जाते, तशी ज्ञानसंपत्ति कोणास चोरतां येत नाहीं, आणि विशेष गोष्ट ही कीं, हिचा खर्च केला तर अधिक वाढते. ज्ञानी मनुष्य सर्वांस पूज्य होऊन राजद्वारीं त्यांस मोठा मान

मिळतो व त्याची विद्या देशोदेशीं त्याच्या कीर्तीस कारण होते. विद्येचे योगानें मनुष्य धनसंचय करून अनेक प्रकारचे सुखोपभोग घेऊं शकतो. मनुष्य विद्वान् व ज्ञानी असला, म्हणजे व्यवहारांत तो आपणावर कोणतेही कठीण प्रसंग येऊं देत नाहीं; आणि दुर्दैवानें कदाचित् असे प्रसंग आलेच तर त्याची विद्वत्ता व ज्ञान हीं मोठ्या जिवलग मित्राप्रमाणें त्यास युक्तीनें पार पाडतात, याकरितां प्रत्येकानें नेहमीं ज्ञानाचा संचय करावा.

आयुष्यक्रमांत अमुक एका कालींच मनुष्यास ज्ञान संपादन करावयाचें असतें असें नाहीं. जन्मापासून मरणकालपर्यंत ज्ञान संपादन केलें पाहिजे. ज्ञानभांडाराचा अंत कोणास कधींच लागला नाहीं. जों जों ज्ञान संपादन करावें तों तों तें अधिक अधिक उरलें आहे असें उत्तरोत्तर वाटत जातें. तथापि ज्ञान संपादन करण्याचा अगदीं योग्य काळ म्हटला म्हणजे तरुणपण हें होय. बाल्यावस्थेंत सुद्धां मनुष्य अनुकरणानें ज्ञानसंपादन करितो. ज्ञान संपादण्यास हा काल फारच महत्वाचा आहे. जन्मतःच ईश्वरानें मनुष्याला बुद्धि दिलेली असते. व बुद्धि ही ज्ञान संपादन करण्याजोगी शक्ति आहे, व ज्ञान हें आपणांस नवीन अशा गोष्टींचें अनुकरणभांडार आहे. लहान मुलांस पहिल्यानें जें थोडथोडें समजूं लागतें तें अनुकरणानें लागतें. अनुकरण करण्यासारखें लहान मुलाच्या भोंवतालें जर कांहीं नसेल तर तें जन्मल्याबरोबर ज्या स्थितींत असतें त्याच स्थितींत सदोदित राहील. मनुष्य दृष्टीस न पडे अशा तजविजीनें एकाद्या लहान मुलाची खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवून जर त्यास निराळ्या खोलींत वाढविलें तर त्यास ती एकांत स्थिति आहे तोंपर्यंत चालतां बोलतां वगैरे कांहीं एक येणार नाहीं असें वाटतें. ह्याचें कारण एवढेंच कीं, अनुकरण करण्यास

त्याचे नजरेपुढें कांहींच नसतें. मनुष्य जन्मभर अनुकरणच करीत असतो. परंतु जसजसा मोठा होत जातो, तसतसा अनुकरण करण्याचा मार्ग त्यास स्वतंत्रतेचा होतो. पांच वर्षांचे वयापर्यंत मनुष्य बोलणें, चालणें, वागणूक, हीं शिकतो. मूल लहानपणांत एक एक शब्द बोलण्याचा यत्न करून अनुक्रमानें भाषा कशी शिकतें हें नीट विचार करून पाहत गेलें असतां कोणासही सृष्टीनियमाचें, आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. तसेंच पांचवर्षांपासून पंधरावीस वर्षेपर्यंत आपल्या स्थितीप्रमाणें व जातीप्रमाणें तें विद्या शिकतें. हा काल महत्वाचा आहे. कारण या कालांत त्याचें मन संसाराचे काळजीनें भारलें जात नाहीं. विद्या शिकण्याची खरी संवय व हौस या मुदतींत लागते. व ती पुढें आयुष्यभर कायम राहते. या कालांत बुद्धीस एकदां मांद्य आलें ह्मणजे मोठेपणीं तें तसेंच राहून एकादी गोष्ट शिकण्याविषयीं कितीही यत्न केला तरी तिजबद्दल समजत नाहीं. कोणताही वेल ओलेपणीं पाहिजे तसा लवतो. परंतु वाळून एकदां त्याचें लांकूड झालें ह्मणजे लवविण्याचा यत्न केला तर तो मोडतो. तद्वतच गोष्ट विद्येसंबंधानें लहानपणाची आहे. ह्मणून पंधरा किंवा वीस वर्षेपर्यंत मुलाचा काळ विद्या संपादण्यांत गेला ह्मणजे ती संवय सदोदीत कायम राहून मोठेपणींही त्याचा काल तसाच जातो. कारण मनुष्याच्या कालक्रमणांत सवयीचें प्राबल्य फार असतें. आणि तशांत मोठेपणच्या संवईपेक्षां लहानपणच्या संवई दृढतर असतात. ह्याकरितां मुलांचें लहानपण व्यर्थ न जाऊं देण्याविषयीं फारच जपलें पाहिजे. लहानपण हें विद्येचा एक हंगामच आहे. जसें वेळेवर पेरण्या न केल्यामुळें पुढें कितीही मेहनत केली तरी धान्य पिकत नाहीं, तसें एकदां वीस वर्षें ज्ञान संपादल्याशिवाय गेलीं

ह्मणजे तो मनुष्य जन्माचा मतिमंद झालाच असें समजावें. व तो मतिमंद होतो एवढेंच नाहीं तर त्याला विद्याव्यासंग नसल्यामुळें कसें तरी कालक्रमण झालेंच पाहिजे, ह्मणून त्या कालांत त्याचें चित्त दुर्मार्गाकडे वळतें. कारण असा नियम आहे कीं चांगल्यापेक्षां वाईट खोडीचें अनुकरण मनुष्य शिकविल्याशिवाय सहजा करितो. व त्या एकदां जडल्या म्हणजे बहुतकरून कायम राहून मोठेपणीं त्याचे दुःखास कारण होतात. तर असा परिणाम न व्हावा म्हणून लहान मुलांच्या हितेच्छूंनीं वीस वर्षेपर्यंत त्यांस जपण्याबद्दल फार काळजी घेतली पाहिजे. त्यांस हरप्रयत्नानें विद्या शिकविली पाहिजे. एवढेंच नव्हे तर अनुकरण करण्यास योग्य असें आपलें स्वतःचेंही वर्तन ठेविलें पाहिजे.

वर सांगितल्याप्रमाणें वीस वर्षेपर्यंत ज्ञान संपादण्यांत काळ गेला म्हणजे विद्येविषयीं परतंत्रता संपली. पुढें आपले मतीप्रमाणें मनुष्य ज्ञान संपादन करितो. वीस वर्षांनंतर त्याचें ठराविक शिक्षण नसतें. जशी त्याची आवड असेल तशा प्रकाराचे ग्रंथ वाचून ग्रंथावलोकनानें तो आपलें ज्ञान वाढवितो. त्यास ग्रंथ वाचण्याची आवड मात्र पाहिजे ती असली तर उत्तरोत्तर त्याचें ज्ञान वाढत जाऊन मनाची तृप्ति कधींच होत नाहीं. परंतु विद्येचे इतके शोकी पुरुष थोडे असतात. ज्या देशांत असे ज्ञानी व विद्वान पुरुष फार असतात तो देश ऊर्जितदशेस आलाच पाहिजे.

ज्ञान संपादण्यापासून जे अनेक फायदे आहेत त्यांपैकीं समाधानवृत्ति हा मोठा फायदा आहे. कारण समाधानवृत्ति ही सर्व सुखाचें मूळ आहे. मनुष्यास कितीही ऐश्वर्य प्राप्त होवो, परंतु त्यापासून त्याचे मनाचे ठिकाणीं जर समाधान नसेल तर त्यास सुखाचा लेश मिळणार नाहीं.

सुखाचें प्रमाण ऐश्वर्यावर नाहीं. मनुष्य ज्या मानानें समाधानी असेल त्या मानानें सुख पावेल; आणि ज्ञानाशिवाय समाधानवृत्ति रहाणार नाहीं. समाधानवृत्ति न रहाण्याचें मुख्य कारण मनुष्याचे आंगची आशा ही होय. आशा ही स्वभावतः त्याचे अंगीं हळूहळू ज्यास्त वाढत जाते व तिचें ज्ञानाशिवाय खंडण होत नाहीं. ज्ञानापासून सृष्टी व्यवहाराचीं तत्वें ओळखून मनुष्य आशामुक्त होतो आणि सदोदीत समाधानी राहून सुखी होतो. ह्याकरितां ज्याला सुखाची इच्छा असेल त्यानें यथासंपादित ऐश्वर्यामध्यें समाधानी असावें. आतां कोणी म्हणेल कीं, मनुष्य आशाविरहीत झाला म्हणजे त्याचे सर्व उद्योग बंद पडतील. परंतु तसें नाहीं. आशा शब्दाचा अर्थ ईर्षा असा कोणी करूं नये. आशा ही अनंत आहे, ती कधींच संपत नाहीं. तशी ईर्षा नव्हे. ईर्षा ही प्रासंगिक उमेद आहे. ईर्षेपासून उद्योगाचे अंकुर वृद्धिंगत होऊन मनुष्य उदयास येतो पण ईर्षा नसून फक्त आशाच असेल तर तो जागच्या जागींच व्यर्थ दुःखी रहातो. सबब ईर्षेनें उद्योग करून यशप्राप्तीकरितां सदोदीत यत्न करणें हें फार उत्तम होय. वर लिहिलेंच आहे कीं, यश किंवा अपयश येणें हें केवळ उद्योग करणारावरच फक्त अवलंबून नसतें. तथापि सदाचरणानें मनःपूर्वक यत्न करणें हें नेहमीं त्याचे स्वाधीन असतें. अशा यत्नांत अपयश आलें तर वाईट वाटेल, परंतु आंगचें समाधान नाहींसें होणार नाहीं. समाधान कायम राहण्यास मनुष्याची अशी समजूत असली पाहिजे कीं, सदोदीत यत्न करणें हा माझा धर्म आहे. व्यवहारांत अशा कांहीं नियमित गोष्टी आपण स्वाभाविक करतों, त्यांपैकीं किंवा त्यांप्रमाणेंच आयुष्योन्नति करितां अनेक प्रकारचे यत्न आपणांस केले पाहिजेत; म्हणजे उत्तरोत्तर अमुक स्थिति मिळावी अशी

ज्याप्रमाणें प्रत्येकाची स्वभाविक इच्छा असते त्याप्रमाणें तिचें साधन जे मनुष्याचे यत्न ते होण्याविषयींही स्वाभाविक आवड पाहिजे. अशा पासून जरी खिन्नता उत्पन्न झाली तरी असमाधान होण्याचें कांहीं कारण नाहीं. कधीं कधीं अपयशापासून अधिक उमेदही येईल. व त्या उमेदीमुळें स्तुत्य व कल्याणकारक अशीं कामें त्याचे हातून होतील. अलीकडे सर्व लोकांचे नजरेपुढें कैलासवासी महादेव मोरेश्वर कुंठे यांचें उदाहरण आहे. त्यांचे आचार व मतें यांविषयीं पुष्कळांचा परस्पर मत भेद असेल; त्याविषयीं सर्व तर्क बाजूला ठेऊन कोणीही निःपक्षपाती इसम त्यांचें ज्ञान, त्यांचे उद्योग, त्यांची ईर्षा, व समाधानवृत्ति यांबद्दल स्तुति केल्याशिवाय राहणार नाहीं. या त्यांच्या सद्गुणांनीं हिंदुस्थान देशांतच काय परंतु परदेशांत सुद्धां त्यांनीं आपणास प्रसिद्धीस आणिलें. वरील गुण व्यक्त करणारीं अनेक उदाहरणें त्यांनीं आपल्या वांचकांस दाखविलीं. सिस्पेन्सिलीचा कारखाना काढल्यावर पेन्सिलींची चांगली भट्टी उतरली नाहीं, हवें तसें मऊ लांकूड मिळत नाहीं, असें पाहून तो थोर पुरुष कधीं निराश झाला नाहीं. आपण मेहनत करितों आहों तर इच्छित काम केव्हां तरी यथास्थित होईल अशी त्यांची खातरी असून मारलेल्या मजलीबद्दल ते सदोदीत समाधानी असत. आणखी कांहीं वर्षे वांचून उद्योगस्वातंत्र्य जर त्यांस पूर्णपणें आलें असतें तर खरोखर देशाचें कल्याण त्यांनीं केलें असतें. परंतु दुर्दैव आमचें! असो. त्यांच्या समाधानवृत्तीस त्यांचें ज्ञान कारण झालें. ग्रंथावलोकनानें त्यांचे अंगीं मोठें गांभीर्य आलें होतें. अनेक थोर पुरुषांचीं चरित्रें व देशांचे इतिहास वाचून यशप्राप्तीचे मार्ग त्यांचे मनांत बिंबले होते यामुळें एकादे वेळीं अपयश आलें म्हणून निराश न होतां त्यांस दुप्पट ईर्षा उत्पन्न होई. एकं-

दरांत असे थोर पुरुष ग्रंथावलोकनानें व अनुकरणानें मागें पडून आलेल्या अनेक गोष्टींविषयीं अनुभवीक बनून उदयास येतात हें प्रत्येकानें चांगलें ध्यानांत ठेविलें पाहिजे. कारण ग्रंथावलोकन हें ज्ञानसंपादण्याचें मोठें साधन आहे. ग्रंथावलोकनापासून अंगीं विद्वत्ता येते. यश कशांत आहे व अपयश कशांत आहे हें चांगलें समजतें. व उगीच आशा करण्याची संवय जाऊन योग्य वेळीं ईर्षा धरून आपल्या उद्योगांत झटण्याविषयीं बुद्धि होते व यामुळें आपलें आयुष्यक्रमण फार सुलभ व सुखी होतें.

तसेंच ग्रंथावलोकनानें अनेक देशांची माहिती होते. आम्हांस इतिहासिला कित्येक राष्ट्रांचें जें व्यापारादि दळणवळण आहे व त्यांचे अनेक भागांची पुष्कळांस माहिती आहे याचें कारण ग्रंथ होत. नाईल नदीमध्यें अमक्या अक्षांश रेखांशावर मोठा घातक भोंवरा आहे हें त्या भागांत जलपर्यटण करणाऱ्या दर्यावर्दी लोकांस माहित असतें व त्या भागाकडे ते आपलें सुकाणूं कधीं फिरवीत नाहींत; याचें कारण तो सर्वांनीं पाहिला आहे असें नाहीं परंतु त्या भोंवऱ्याची माहिती मागील लोकांचें अनुभवावरून किंवा ग्रंथावलोकनानें सर्वांस झालेली असते. प्रत्यक्ष त्या भोंवऱ्याच्या कचाटयांत कांहींसें सांपडून मोठ्या प्रयासानें कदाचित् बाहेर निघालेले किंवा त्याच्या आसमंतात भागीं जाऊन तपास काढलेले असे थोडेच लोक असतात. तर अशा प्रकारचे दुसऱ्याच्या अनुभवांवरून शहाणे झालेले किती तरी लोक जगांत असतील.

दुसरें असें कीं, ग्रंथावलोकन ज्ञान संपादण्याचें साधन असून करमणूकही आहे. पुष्कळांस अनुभव असेल कीं, सृष्टीक्रमाप्रमाणें एकादे वेळेस कठीण प्रसंग गुदरला किंवा दुसरें एकादे प्रकारचें दुःख झालें तर त्या दुःखाचा विसर पाडण्यास

ग्रंथावलोकनाची फार मदत होते. अशा प्रसंगीं मनुष्याचा वेळ कंटाळवाणा न जातां दुःख शमन होतें एवढेंच नाहीं, तर ते मनास प्रीट करतें.

ज्ञान संपादन नुसत्या सहवासानेंही होत असते. या देशाच्या रीतीप्रमाणें घर कामांत दक्ष असणाऱ्या स्त्री वर्गा-पैकीं पुष्कळांसच लिहितां वाचतां येत नाहीं तथापि कित्येक स्त्रिया मोठ्या ज्ञानी आहेत असें आढळून येतें; हें त्यांचें ज्ञान बहुतकरून त्यांस सहवासानें प्राप्त झालें असतें. यावरून ज्ञानी लोकांचा नुसता सहवास जरी असेल तरी त्यांचे ज्ञानाचा लाभ ग्रंथावलोकनाशिवाय होतां येईलसा दिसतो. तथापि ग्रंथावलोकनासारखा उत्तम व्यवसाय सर्वांनीं करून त्यापासून होणारा फायदा जो ज्ञानसंपादन तो करण्याविषयीं फार झटलें पाहिजे. यथाशक्ति ज्ञान मिळवियावर त्याचा उपयोग आपल्या आवडीप्रमाणें व सम्मतीनें मनुष्य पाहिजे त्या उद्योग धंद्यांत किंवा इतर कामांत करो; परंतु तें न मिळवील तर सर्व प्राण्यांवर वर्चस्व मिळविण्यासारखी परमेश्वरानें दिलेली देणगी जी बुद्धी, तिचा उपयोग न केल्यामुळें परमेश्वराकडे तो दोषी होईल व आपलें अमोलिक आयुष्य व्यर्थ घालवून सुखास अंतरेल. याकरितां प्रत्येकानें आपल्या वेळाचा सदुपयोग करून जन्माचें सार्थक्य करावें आणि कीर्तियश मागें ठेवावें यांत मोठें भूषण आहे.

आर्या.

पालवि नूतन येतां तरु दिसतो कुरुप मधुनि दृष्टीतें ॥
स्वरुपा चढतो परितो, वाढु दिल्या, रमवुनीहि सृष्टीतें ॥१॥
अस्पष्ट बाल बोले परि तेणेंही सुजाण जन रमती ॥
वळविति योग्य दिशेला आनंदति बघुनि त्या पुढे सुमती ॥२॥

समाप्त.

पुस्तक छापत असतां आमचें एकाएकीं बाहेरगांवीं जाणें झाल्यामुळें शुद्धिपत्र देण्याची वेळ आली; त्याबद्दल वाचक क्षमा करतील.

प्रकाशक.

## शुद्धिपत्र.

| पान, | ओळ, | अशुद्ध, | शुद्ध, | पान, | ओळ, | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १५ | पशुपक्षांदिकां | पशुपक्ष्यांदिकां | १९ | ७ | जातो | जाता |
| ४ | २ | कुंटुंबाचा | कुटुंबाचा | २० | १० | थोड्यास | थोड्यांस |
| ४ | १० | विशेप | विशेष | २० | १४ | केवल | केवळ |
| ८ | १७ | बुद्धी | बुद्धि | २१ | ७ | लक्ष्य | लक्ष |
| ९ | १४ | कांहीं | पुत्र | २१ | २५ | दुर्गुणापासून | दुर्गुणांपासून |
| १० | १५ | परवानें | परवाने | २२ | १५ | मनुष्याचा | मनुष्याचा |
| १० | १६ | निरापराधी | निरपराधी | २४ | ७ | घेऊ | घेऊं |
| ११ | १७ | याचे | याचें | २५ | २७ | खोटेंपणा | खोटेपणा |
| १३ | २६ | गनुष्य | मनुष्य | २६ | २७ | इतकेंच | इतकेंचकीं |
| १४ | २ | सर्वाशीं | सर्वांशीं | २७ | ५ | चांगल्यापेक्षा | चांगल्यापेक्षां |
| १४ | ३ | वयां | वयांत | २७ | ११ | आंगीं | अंगीं |
| १५ | १० | उदरनिर्वासारखें | उदरनिर्वाहासारखें | २८ | १४ | ब्राम्हणांचें | गोब्राम्हणांचें |
| १६ | ५ | ज्याचा | ज्यांचा | २८ | २० | वर्षे | वर्षें |
| १६ | ५ | त्यास | त्यांस | | | | |
| १७ | २१ | जाऊ | जाऊं | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | २० | शागरिदाचे | शागीर्दांचें |
| २८ | २५ | अपाकिर्ति | अपकीर्ति |
| २९ | ६ | आहें | आहे |
| ३० | ८ | सखांचें | सुखांचे |
| ३० | १४ | मनृष्याचें | मनुष्याचें |
| ३१ | ६ | त्याचें | त्याचें |
| ३१ | १८ | तों | तो |
| ३२ | १ | मोठे | मोठें |
| ३२ | ४ | आभिकारावर | अधिकारावर |
| ३२ | ५ | त्यास | त्यांस |
| ३२ | १२ | ज्याचे | ज्यांचें |
| ३२ | १२ | गोष्टीबद्दल | गोष्टींबद्दल |
| ३३ | १२ | लक्ष्यांत | लक्षांत |
| ३३ | २३ | भक्ष | भक्ष्य |
| ३४ | ५ | दाणेकाल्याचे | दाण्याचा |
| ३४ | ११ | आंगीं | अंगीं |
| ३४ | १३ | विचारांतीं | विचारांतीं |
| ३५ | २२ | गोष्टींविषयीं | गोष्टींविषयीं |
| ३६ | २७ | त्यांस | त्यास |
| ३९ | ५ | खोडींचें | खोडींचें |
| ४३ | ४ | असते | असतें |

[illegible]

# विक्रीस तयार.

सुलभ आरत्या ( भाविक लोकांकरितां ) कि० ८॥-

बोधपर गणपतीचीं पदें ( प्रत्येकास आपल्या स्थितीचें चांगलें स्वरूप कळण्यासारखें बोधपर गायनोपयोगीं पुस्तक ) किं० ८-

स्त्रियाकरितां गाणीं ( स्त्रियांस संसारांतील बरें वाईट साहजिक कळण्यासारखें अति उपयुक्त व नीतीपर व मनोरंजक पुस्तक ) किं० ८-

---

# छापत आहे.

( आश्रय पाहिजे. )

अभिनव पद्यसुधा.

प्रदरहु पुस्तकांत मनुष्याच्या हातून निरनिराळ्या स्थितींत जे गुणदोष घडतात त्यांचें चित्र दाखविलें आहे आणि मनुष्यास इष्ट कोणतें याविषयीं मनावर ठसा उमटविण्यासारखें पद्यात्मक वर्णन आहे. यांतील कविता अनेक वृत्तांवर असून, त्यांत आठ उपयुक्त विषयांचा समावेश केला आहे. व विशेषेंकरून यांत "तथापि रामायण" ह्मणून साद्यंत रामायणावर सुरस आर्या आहेत. पुस्तकाचीं पृष्ठें ६० तील. किंमत ६ आणे. आगाऊ सही पाठविणारांस ४ आणे.

कृष्णाजी गणेश अभ्यंकर

पत्ता: शेणव्याचे ठाकुरद्वारानजिक खऱ्याची चाळ मुंबई.

# उद्भिजांचा पर्जन्याशीं संबंध.

व

# राब.

---

हें

**प्रोफेसर साम्युएल कुक साहेब**

यांच्या इंग्रजी

**फारेस्ट व राब पत्रांचें**

मराठी भाषांतर,

त्यांच्या परवानगीनें

**लक्ष्मण विष्णु महाजनी सातारकर,**

सायन्स कॉलेजांतील शेतकी वर्गांतून पास झालेले

एक विद्यार्थी

यांनीं तयार करून,

पुणें येथें

' पुणेंवैभव ' छापखान्यांत छापविलें.

---

फेब्रुवारी सन १ ८९ इसवी

---

किंमत दीड आणा

मराठा ग्रंथ संग्रहालय
नं० ९६
ठाणें सन १८

# उद्भिजांचा पर्जन्याशीं संबंध

# व

# राब.

सर रिचर्ड टॅंपल यांनीं दक्षिणेंत " जंगल राखणें " या विषयावर आपले महशूर अभिप्राय प्रसिद्ध केल्यापासून हिंदुस्थानांतील वर्तमानपत्रांनीं जंगलासंबंधीं निरनिराळ्या विषयांवर पुष्कळ लेख प्रसिद्ध केले. परंतु त्यांपैकीं एकांतहीं वास्तविक जंगल ह्मणजे काय, व त्याचा आणि पर्जन्याचा काय संबंध आहे या विषयीं जसें व्हावें तसें स्पष्टीकरण केलेलें नाहीं. याकरितां पर्जन्य व जंगल याचा परस्परांशीं काय संबंध आहे या विषयीं जें कांहीं खरें व शास्त्रीय रीतीनें वास्तविक आहे असें आह्मास वाटतें तें आम्ही सादर करीत आहों.

पृथ्वीची सरासरी वार्षिक उष्णता स्थिर आहे हें प्रसिद्ध आहे, व यावरून असें दिसून येतें कीं, सूर्यापासून पृथ्वीला जितकी उष्णता मिळते तितकीच किरणरूपानें विकास पावते; हें ह्मणणें यथायोग्य आहे असें जरी वाटतें तरी तें खरोखर चुकीचें आहे. कारण, आयर्लंडांतील व अमेरिकेंतील विद्वानांनीं नुक्तेच शोध केले आहेत व प्रयोग करून पाहिले आहेत त्यांवरून समजतें कीं, एका वर्षांत किरणरूपानें पृथ्वीपासून जी उष्णता निघून जाते ती पृथ्वीला सूर्यापासून तितक्याच मुदतींत मिळालेल्या उष्णतेपेक्षां फारच कमी असते डाक्टर हाहुन. डब्लिन युनिव्हर्सिटींतील भूगर्भशास्त्रा-

चे गुरू यांनीं जो लेख लिहिला आहे, व ज्यांतील एक उतारा ब्रिटिश असोसियेशनच्या सभेपुढें गेल्या आगष्ट महिन्यांत वाचला होता त्यांवरून असें दिसतें कीं, दरवर्षी पृथ्वीला सूर्यापासून जी उष्णता मिळते ती सर्व भूगोलावर ८० फूट जाडीच्या वर्फाच्या थरास वितळून टाकण्यास जितकी लागेल तितकीच असते; व पृथ्वीपासून किरणरूपानें जी जाते ती, २८$\frac{1}{2}$ फूट जाडीच्या थरास वितळून टाकण्यास जितकी लागेल तितकीच असते. यावरून ५१$\frac{1}{2}$ फूट जाडीच्या वर्फाच्या थरास वितळण्यास पाहिजे इतकी उष्णता दरवर्षी शिलक राहते; व पृथ्वीची सरासरी उष्णता तर कांहीं वाढत नाहीं. अर्थात् ही शिलक राहिलेली उष्णता जाते कोठें हा प्रश्न साहजिकच उत्पन्न होतो. कारण, पाण्याचे प्रवाहानें भूगर्भशास्त्रसंबंधीं क्रिया होण्यास जरी बरीच उष्णता जाते तरी पुष्कळच शिलक राहते.

वरील प्रश्नास समर्पक व यथायोग्य शास्त्रीय उत्तर हेंच कीं, ती वनस्पतीच्या व अर्थात् शेवटीं प्राण्याच्या जीवितास कारण होते.

ह्या वरील सिद्धांताच्या पुष्टयर्थ व ज्याविषयीं विचार चालला आहे त्या विषयाचा ह्या सिद्धांताशीं कसा संबंध आहे, हें सांगण्यासाठीं आह्मी असें कळवितों कीं, वनस्पतींची वाढ झाली कीं तेथें उष्णतेचा अभाव झालाच कारण प्रत्येक रसायनवेत्त्यास माहित आहे कीं, ज्या वेळेस रसायन व्यापार होऊन पदार्थाचें पृथक्करण होतें त्या वेळेस बरीच उष्णता कमी होते. आणि सूर्याच्या किरणप्रकाशांत झाडांचीं हिरवीं पानें सतत काय करीत असतात? दुसरें कांहीं नाहीं. हवेमध्यें जो कारबॉनिक आसिड ग्यास असतो त्याचें पृथक्करण करितात. ह्मणजे कारबान आपण घेतात व आक्सिजन बाहेर टाकितात. रसायनक्रिया होऊन पृथक्करण

झाले कीं तेथें उष्णता कमी झाली. येथें उष्णता कोठची तर सूर्यापासून आलेली.

यावरून जंगलांतू पानांच्या अंगीं उष्णता बाहेर टाकण्याची शक्ति असल्या कारणानें रात्रीं हवा थंड होते इतकेंच नाहीं, तर दिवसासही रसायनक्रिया झाल्यामुळें उष्णतेचें मान कमी होतें; व उल्कादि विद्या जाणणाऱ्यांना ठाऊक आहेच कीं, पर्जन्य पडण्यास ह्मणजे हवेंत जे ढग असतात त्यांचें संकलन होण्यास प्रदेशभर उष्णता कमी झाली पाहिजे * ह्मणून आह्माला असें वाटतें कीं प्रदेशांत झाडी असल्यानें पर्जन्य पडतो हें खोटें नव्हे.

यावरून एकाद्याची अशी समजूत होईल कीं, येथें एक झाड, तेथें एक झाड लावल्यानें पर्जन्य येईल तर हें चुकीचें आहे, परंतु दक्षिणेंतील सर्व रखरखीत डोंगरांवर झाडें होऊन ते जर हिरवेगार झाले, तर मात्र पर्जन्य पडण्याचा जास्त संभव आहे.

पुण्याचे शेजारचे सर्व डोंगर जर हिरवेगार झाले तर येथील हवा किती उत्तम होईल बरें !

पुणें,
तारीख २१ जून } सामुएल कुक.
सन १८७९.

---

* प्राउट आपले विद्युदुल्कादि विषयाच्या निबंधांत लिहितो कीं " पर्जन्याचा व उष्णतेच्या फेरफाराचा कांहीं तरी संबंध आहे याविषयीं मुळींच शंका नाहीं. उष्णतेंत फेरफार कशानें होतो हें समजणें कठीण असल्यामुळें हा घोटाळा पडतो. "

जंगलामुळेंच उष्णतेंत फेरफार कसे होतात याचीं कारणें दाखविण्याकरितां ही वरील ग्रंथकाराची उक्ति आहे.

आमच्या मागील पत्रावर आपण जो आक्षेप* आणिला त्यावरून एकाद्याची अशी समजूत होईल कीं, हिंदुस्थानांत जो पावसाळा सुरू होतो त्याचा व जंगलाचा कांहीं तरी संबंध आहे असें आमचें मत आहे; परंतु तसा लिहिण्याचा कांहीं आमचा रोंख नव्हता. जंगल असल्याचा ज्यांशीं मुळींच संबंध नाहीं, असे हे अयनवायु, भरती, ओहटा खराज करून पृथ्वीवर सृष्टिक्रमानुसार ज्या उलाढाली हातात त्यांपैकीं होत; व त्याचें कारण पृथ्वीवर सूर्याचे उष्णतेचा जो अवशेष राहतो तो होय. सूर्यापासून जी उष्णता हिंदिमहासागरास, व त्या जवळील प्रदेशाला ह्मणजे एशिया व आफ्रिका यांस सूर्य दक्षिणोत्तरायणांत असल्यामुळे जी मिळते, त्या दोहोंतील असमानता हें वरील गोष्टीचें मूळबीज होय. उत्तरेकडील उन्हाळ्यामुळें एशियेचा मध्यभाग फारच तापला ह्मणजे तेथील हवा उष्ण होऊन तिचा दाबही कमी होतो, व त्यामुळें त्या प्रदेशावर दक्षिणेकडील व पश्चिमेकडील थंड हवा येते, या कारणानें नैऋत्य दिशेकडील अयनवायु सुरू होतो व तोच इकडे दक्षिणेकडेही पर्जन्य सुरू होण्यास कारण होतो. पावसाळा सुरू होतो ह्मणजे काय होतें व तो कसा होतो याबद्दल आह्मी वादविवाद करीत बसत नाहीं, परन्तु येथें एवढेंच सांगतों कीं, मोसम ह्मणजे मोठा पर्जन्य अशी लोकांत जी समजूत आहे ती चुकीची आहे, मोसम हा वायु आहे. पर्जन्य पड-

---

* जंगलें असल्यापासून पर्जन्य पडतो व हवेंत फेरबदल होतो. यावर प्रोफेसर कुक साहेबांनीं जें लिहिलें आहे तें फारच महत्वाचें आहे, परंतु तें सर्वांशीं खरें आहे असें आमच्यानें ह्मणवत नाहीं; पर्जन्य पडून हवेंत फेर होतो असें पुष्कळ वेळां झालें आहे; परन्तु हा विषय वादग्रस्त आहे, व यावर अनेकांचीं अनेक मतें आहेत; उदाहरणार्थ, हिंदिमहासागरांतील हवेमुळें हिंदुस्थानांत जो पावसाळा सुरू होतो त्याचा व जंगल असलें किंवा नसलें याचा कांहीं तरी संबंध असेल असें आह्मास वाटत नाहीं.

ण्याविषयीं उल्कापातसंबंधीं जीं कारणें आहेत त्याबद्दलही आह्मी विचार करीत बसत नाहीं, परन्तु मागें आह्मी जंगलाचा पर्जन्यावर एककळ परिणाम घडतो ह्मणून सांगितलें त्याच्याच पुष्ट्यर्थ आणखी कांहीं सांगतों.

देशांतील पर्जन्यावर जंगलाचा कांहीं मोटा परिणाम घडतो हें आजपर्यंत साधारण प्रसिद्ध आहे, आणि आह्मी त्याच विषयाचीं सशास्त्र कारणें काय आहेत त्यांची फोड करण्याविषयीं आमच्या मागच्या लेखांत प्रयत्न केला होता. सूर्यापासून शिलक राहिलेल्या उष्णतेचा व्यय होऊन वनस्पतींची वृद्धि होते असें जें आमचें ह्मणणें आहे तें अनेक रसायनप्रयोगांवरून सिद्ध करतां येतें. अंकुरोत्पत्तीच्या वेळेस वनस्पतींमध्यें जो हिरवा रंग तयार होतो, त्याचा व क्यारबानिक आसिड ग्यासच्या पृथक्करणाचा मेळ आहे; त हीं कोणत्याही कृत्रिम उपायांनीं घडून येईल, असें करितां येणार नाहीं. त्याला सूर्यापासूनच उष्णता मिळाली पाहिजे. वनस्पति सूर्यापासून उष्णता घेत असतां कारबानिक असिड व पाणी यांचें पृथक्करण करून आक्सिजन टाकून देतात, आणि आपल्या घटकतंतूंत कारबन, हॉयड्रोजन व थोडासा ऑक्सिजन घेतात तेच घटकतंतु शेवटीं प्राण्यांचें खाद्य बनतात, व पुन्हा त्यांचें कारबॉनिक असिड व पाणी होऊन वनस्पतींस मिळतें. आक्सिजनशीं संयोग पावलेला कारबन निराळा होत असतां एक प्रकारची रसायनक्रिया होते, व अर्थात् सूर्यापासून मिळालेल्या उष्णतेचा अभाव होतो. यावरून असें समजूं नये कीं, त्या उष्णतेचा नाश होतो. ती वनस्पतींमध्यें कारबन व हायड्रोजन यांच्या परमाणूंबरोबर अनद्भुत रूपानें असते. तीच ज्या वेळेस वनस्पतींची दहनक्रिया होते, किंवा प्राणिकोटींचा जीवनव्यापार चालतो त्या वेळेस दृश्यमान होते. याप्रमाणें सूर्यापासून जी शक्ति

मिळते, ती उद्भिज्जकोटि व प्राणिकोटि यांजमध्येंच राहते. ह्मणजे ती शक्ति वनस्पतींना मिळते, व तिचा नाश न होतां तीच प्राण्यांसही मिळते, म्हणून प्रदेशभर झाडी राखली तर अनेक फायदे आहेत. एक तर वनस्पतींची वृद्धि होत असतां रसायन व्यापार होतो. शिवाय किरणरूपानें पानांतून उष्णता जाते. याकरितां झाडी राखणें ह्मणजे पदार्थ थंड करण्याचें एक यंत्रच होय. ती झाडी ज्या वेळेस ढग सार्द्र होऊन त्यावरून जातात त्या वेळेस त्यांचें संकलन करण्यास मदत करिते.

नैर्ऋत्य दिशेकडील अयनवायु इकडे वाहूं लागतो, व त्यांत महासागरावरील सार्द्र वाफ असते हें आपणांस माहीत आहेच, व त्या वाफेचा गरीब शेतकऱ्यांना उपयोग होण्यासारखा पर्जन्य नेहमीं बनत नाहीं, हेंही आपण गेल्या दुष्काळापासून पाहतों. यावरून साहजिकच प्रश्न उत्पन्न होतो कीं, त्या वाफेचें संकलन होऊन ती पृथ्वीवर पर्जन्याचे रूपानें पडण्यास कांहीं मार्ग आहे कीं काय? कारण कीं, कित्येक देशांत पाणी हेंच गरीब लोकांचें खत आहे.

वर आह्मीं सांगितलें आहे, त्यावरून देशभर झाडी राखली तर पावसाळ्यांत जे ढग जंगलावरून जातात त्यांतील पाणी पर्जन्याचे रूपानें त्या जंगलाजवळील प्रदेशावर पाडण्यास ती कारण होते, असें शास्त्रावरून मानण्यास कांहीं हरकत नाहीं. फार लांब कशाला, पुण्यांतच पहा कित्येक आठवडेपर्यंत आसपासचे सर्व रखरखीत डोंगर अभ्रांनीं आच्छादित होऊन सडकून पर्जन्य लागेल असें आपणास वाटत असतें. परंतु उष्णतेचा अभाव होण्यास कांहीं साधन नसले कारणानें ते ढग तसेच पार निघून जातात, व आपणास तिष्ठत बसावें लागतें. अशा प्रसंगीं एकदां

कीं सपाटून पर्जन्य लागला ह्मणजे त्यांच्या गारठ्यानेंच वाफेचें घनीभवन होऊं लागतें.

हिंदुस्थानांत दुष्काळ जेणें करून न पडतील अशी कांहीं तोड पाहिजे, आणि यासाठींच हिंदुस्थान सरकारानें दुष्काळाकरितां फंड ह्मणून व्यापाऱ्यावर कर बसविला आहे. तोच फंड जर दक्षिणेंतील रखरखीत डोंगर व पडित जमीनी यांवर झाडी राखण्याकडे खर्चिला तर किती उपयोग होईल बरें?

वर सांगितले आहेत त्याशिवाय जंगलापासून दुसरेही पुष्कळ फायदे आहेत. हम्बोल्ट ह्मणतो कीं, जंगलाचे योगानें पर्जन्याचा मोठा संचय होऊन झरे, तलाव वगैरे होतील. परंतु ह्या सर्वांपेक्षांही जंगलाचा पर्जन्य पडण्यावर जो परिणाम घडतो तो लक्ष्यांत आणिला असतां ह्यांचें इतकें महत्व वाटत नाहीं.

नुसतें जंगल राखलें तरच दक्षिणेचा दुष्काळापासून बचाव होईल असें आमचें ह्मणणें नाहीं. कारण, झाडें जर शेतांत लाविलीं तर त्यापासूनही तोटे आहेतच. शेतांतील लागवड करण्याजोगी पुष्कळ जागा त्यांच्या योगानें कमी होते इतकेंच नव्हे, तर जमिनींतील पिकांचें जें स्वाभाविक खाद्य तें आगंतुक अशा ह्या झाडांच्या मुळ्या खाऊन फस्त करितात. इंग्लंडांतील प्रसिद्ध कृषिकर्मवेत्ता जोसेफ मेची ह्मणतो कीं, "पानांनीं गजबजलेल्या विस्तीर्ण वृक्षांसारखी थंड जागा दुसरी नाहीं; परंतु सर्व खत झाडांनाच तुह्मी देतां आणि त्यांच्या सावली खालचें तेवढें खाद्य तुमच्या पिकांस सांपडतें. लहान लहान शेतें व झाडें याविषयीं ओघच आला ह्मणून मला थोडें सांगितलें पाहिजे. आगगाडींतून जातां जातां सहज तुह्मी जवळच्या शेतांतील भांजेल व शगलम यांकडे नजर फेंकिली व क्षणभर विचार

केला, तर अशा रेखरखीत दिवसांत झाडांपासून शेतकऱ्याचा केवढा नाश होतो हे तुम्हाला कळेल. अशा शेतीच्यामध्यें पाहिलें तर मांजेल हिरवेगार व तरारलेले दिसतात, परंतु तेच कडेकडेला बरेच निर्जीव दिसतात, व शेवटीं तर मुळींच दिसत नाहींत. शेताच्या कडेला दहापासून पन्नास यार्डपर्यंत कुंपणाच्या व इतर झाडांच्या क्षुद्र मुळांनीं जमिनींतील सर्व ओलावा आपणच घेतला, व महत्वाचें असें जें शेतांतील स्वाभाविक खत तें अगदीं निरुपयोगी व पिकांस दुर्मिळ करून टाकिलें. हें इतकें कशामुळें बरें? माझ्या शेजाऱ्यानें भलें जंगी कुंपण मोडलें. मीं त्यापासून दोन मोठे बोर्डके ओकाचे सोट विकत घेतले. फांद्या त्यानें फाटकाच्या खांबाकरितां ठेविल्या. निदान ते दोनशें वर्षांचे तरी होते. त्याबद्दल मी साडेचार रुपये दिले व त्यांच्या शेंड्याचीही तितकीच किंमत आली असावी. कित्येक शतकेंपर्यंत ह्या चोरांचें काम चाललेंच होतें. त्यांच्यापासून एकंदर तोटा किती झाला, हें जर तुम्हाला सांगितलें तर अचंबा वाटेल. शेताच्या मालकाचें व त्याच्या कुळाचें हे सारखेंच नुकसान करीत होते. हे नसते तर शेताची सुधारणा होऊन उत्पन्न वाढलें असतें, व साराही वाढला असता. परंतु ह्यांची मध्यें आडकाठी होती. जेव्हां यांचा सप्पा उडविला, व खालची जमीन चांगली तयार करून त्यांत पीक लाविलें तेव्हां त्यांनीं जमीन किती रुखावली होती व आजपर्यंत यांच्यामुळें किती नुकसान व त्रास झाला याचा विचार केला ह्मणजे खातरी होईल."

प्रत्येक एकरांत दोन झाडें असून प्रत्येक झाडामुळें आठ आणे नुकसान होतें असें मानलें तर कुंपणाच्या झाडांमुळें इंग्लंदांत प्रतिवर्षीं पांच कोट रुपयांचें नुकसान होतें असें वरील कृषिकर्मवेत्ता ह्मणतो.

या मेची साहेबांच्या हकीकतीवरून पाहिलें तर इंग्लंदांत कांहीं जंगल राखण्याची जरूर नाहीं असें दिसतें. परंतु इकडची गोष्ट फार निराळी आहे. येथें पर्जन्य हेंच लोकांचें खत आहे व ताही तऱ्हेतऱ्हेनें पडतो. खेरीज खताशिवाय पेरण्याच्या सवयीनें जमिनीच्या वरच्या थरांतील सर्व पोषक द्रव्यें गेल्यामुळें जमिनीच्या खालच्या थरांतून पोषक पदार्थ वरतीं आणण्यास शेतकऱ्यांस झाडेंच मदत करितात.

शेतकी चांगली फलद्रूप होण्यास प्रथमतः पैसेच पाहिजेत व हे तर इकडील रयतेपाशीं नाहींत. बरें, माफक व्याजानें सावकारापासून रकम काढण्यासही ते समर्थ नाहींत. इंग्लंडांत शेंकडा दहापासून पंधरापर्यंत नफा झाला तर उच्च प्रतीचे शेतीची भरभराट आहे असें समजतात. मग इकडील रयतेनें सावकारास शेंकडा तीसपासून साठपर्यंत व्याज द्यावें व आपलाही त्यांतच गुजारा करावा हें होईल तरी कसें ?

पुणें.

तारीख ७ जून }
सन १८७९ } साम्युएल कुक.

---

## पत्रकर्त्यांचे अभिप्राय.

दक्षिणेंत चोहोंकडे जंगलें राखण्याची अवश्यकता फार आहे, याविषयीं आह्मीं जें लिहिलें तें ज्यांनीं ज्यांनीं वाचलें असेल त्यांना आमचें असें सांगणें आहे कीं, आमच्या आजच्या अंकांत प्रोफेसर कुक साहेबांच्या सहीचें जें पत्र आलें आहे तें त्यांनीं वाचावें. वरील विषयाच्या संबंधानें आजपर्यंत आह्मीं त्याचा व्यवहारांत सर्वांशीं कोणत्या रीतीनें नफा होईल हें दाखविण्याविषयीं प्रयत्न केला आहे; व गत अनुभवावरून हिंदुस्थानांतच नव्हे, तर कोणत्याही देशांत दक्षिणेच्या हल्लींच्या स्थितीप्रमाणें जंगलातील झाडांचा नाश करणें ह्मणजे मुद्दाम देशावर अवर्षण व विपत्ति आणणें होय असेंही आह्मीं दाखविलें आहे. हें आमचें ह्मणणें अगदीं निर्विवाद आहे.

ह्मणून आह्मी सरकारास सुचवितों कीं, पश्चिमेच्या घाटमाथ्यावर व पडीत जमिनीवर झाडी असणें फार अवश्य असून त्याप्रमाणें करण्याची त्यांनीं तजवीज करावी. हें काम मोठें कठीण आहे असें नाहीं. कांहीं तोडझोड न करितां जें जंगल आहे तें तसेंच राखलें तर पांच वर्षांत दक्षिणेंत जे हल्लीं रखरखीत डोंगर आहेत त्यांत विलक्षण बदल दिसेल, परन्तु अशा डोंगरांत कांहीं लोकांना गुरें चारण्याचे जे क्षुल्लक हक्क आहेत त्यांकडे दुर्लक्ष्य करून सर्व लोकांचे उन्नतीविषयीं ही गोष्ट शेवटास नेण्यास सरकारांनीं विचार केला पाहिजे. अशा लोकांचे हक्क विकत घेऊन किंवा कायदा करून एकीकडे ठेविले पाहिजेत, ह्मणजे कांहीं काळानें सर्व डोंगर हिरवेगार दिसतील. निदान मुंबई सरकार जंगलाच्या संबंधानें बरेंच पुढें सरकत आहे, प्रस्तुतच गवरनर लॉर्ड री साहेब यांचें आगमन झाल्यापासून दुसरीकडे नसलें

तरी निदान या इलाख्यांत जंगलखातें बरेंच पुढें घुसलें आहे, परन्तु अजून पुष्कळ करावयाचें राहिलें आहे, व अजून कित्येक लोकांच्या वेड्या समजुती आहेत तशाच आहेत. जंगलामुळें सरकारास पैशाची तोशीद लागते असें बिलकूल नाहीं; उलट त्याजपासून फायदाच आहे. आरंभापासून जंगलाच्या संरक्षणास जो खर्च लागतो त्यापेक्षां पुष्कळच जास्त उत्पन्न होत आहे, व हल्लीं तर सर्व खर्च भागून जंगलखात्यांतून सरकारच्या खजिन्यांत प्रतिवर्षीं, लहानसहान रक्कम नव्हे, तर तीन लाख रुपये जातात. एवढ्याच संबंधानें जर पाहिलें तर "हिंदुस्थान सरकारानें दुष्काळाकरितां जो फंड उभारला आहे तोच जर दक्षिणेंतील रखरखीत डोंगर व पडीत जमिनीवर झाडा लावण्याकडे खर्चिला तर किती उपयोग होईल बरें?" असें जें प्रोफेसर साहेबांनीं लिहिलें आहे त्यास आमचें पूर्ण अनुमोदन आहे—

"बांबे ग्याझिट" जुलै तारीख १०.

---

संग्रहालय

# राब.

हल्लीं राब हा लोकांचा आवडता विषय झाल्यामुळें आह्मी त्या संबंधानें चार ओळी लिहीत आहों. एकादा पक्ष घेऊन त्याच्या साह्यार्थ किंवा त्याच्या विरुद्ध लिहिण्याचा आमचा हेतु नाहीं. परंतु हा क्षुल्लक विषय असून तूर्त मोठमोठ्या लोकांतही यास महत्त्व मिळालें आहे; व ह्या कंटाळवाण्या विषयाच्या संबंधानें लोकांचा जो पोकळ भ्रम आहे, तो घालविण्याकरितां, व वास्तविक राब ह्मणजे काय, त्याचीं सशास्त्र कारणें काय आहेत, हें लोकांना समजावें ह्मणून थोडेंसें लिहीत आहों.

प्रथमतः राब ह्मणजे काय हें सांगितलें पाहिजे. इकडील शेतकरी ( कुणबी किंवा रयत ) भाताचे रोपे लावण्याकरितां ज्या रीतीनें जमीन भाजून वाफे तयार करितात, त्या प्रकारास राब ह्मणतात. लहान लहान वनस्पतींनीं वाफ्यांत एकदां का जीव धरला, ह्मणजे निम्में काम झालें. कारण, वनस्पतींची ह्मगा, किंवा मनुष्याची ह्मणा, स्थिति एकच आहे, व ती अशी कीं, एकदां कां तीं चांगले रीतीनें मार्गीला लागलीं ह्मणजे निम्मी काळजी दूर झाली. लहान लेंकरांना जसें दूध अवश्यक आहे, तसेंच लहान वनस्पतींना पोट्याश अवश्य आहे. चुना, मॅग्निशिया, सिलिका व फास्फारिक आसिड आदिकरून फांद्याच्या व बियाच्या वृद्धीला लागणारे जे अवश्यक पदार्थ ते त्यांस पुढें लागतात. ह्मणून लहानपणीं वनस्पति जमिनींतून पोट्याशच घेतात. मोहोर फुटण्याचे वेळीं जो फास्फारिक आसिडाचा संचय होतो तो बीजोत्पत्तीच्या वेळीं उपयोगीं पडतो; व चुना, मॅग्निशिया आणि सिलिका हे पुढें जसजसे लागतील, तसतसे ते मधून मधून घेतात.

झाडांच्या फांद्या, पानें व शेंडे यांत स्वाभाविकच पोट्याश फार असतो, व तो कसें तरी करून आपल्या रोप्यांस दिलाच पाहिजे, हें सशास्त्र शिक्षण रयतेला जणूं काय आधींच मिळालेलं असतें.

शेंकडों वर्षे लागोपाठ पिकें काढून घेतल्यामुळें जमीन अगदीं निस्सत्व होऊन जाते, व त्यांत राखेचे अगदीं थोडे भाग असतात. त्यामुळें वनस्पति त्यांत जीव धरीत नाहींत, म्हणून राब भाजून वाफे करून त्यांत रोपें तयार करण्याची अवश्यकता आहे. युरोपांत गुआनो व सुपरफास्फेट इत्यादि कृत्रिम खतें शगलम, मांगोल्ड वगैरे पिकांना येथल्या राबाच्या ऐवजीं उपयोगीं पडतात, व त्यामुळें तीं तिकडील शेतीचे भरभराटीस अवश्य असतात. लहानपणीं लेंकरांना जर कमी दूध मिळत गेलें, तर तें जगतें, मरत नाहीं. परंतु थोरपणींही तें तसेंच मरतमढें राहून स्वतंत्र उद्योग करण्यास असमर्थ असते, तशीच गोष्ट भाताच्या लहान रोप्यांची आहे.

भात सर्व तृणधान्यांत फारच रक्षामय* आहे, आणि म्हणूनच राबाकरितां राखेचे पदार्थ आम्हास मिळालेच पाहिजेत असें जें रयतेचें म्हणणें आहे तें अगदीं बरोबर आहे.

---

* खालील कोष्टकावरून भाताच्या रक्षेंत काय काय पदार्थ असतात हें कळून येईल.

| | शेंकडा. |
|---|---|
| पोट्याश... ... ... ... .. | १८·५ |
| सोडा... ... ... ... ... ... | १०·५ |
| चुना व मॅग्नेशिया... ... ... ... | १३·२ |
| आयर्न आक्साइड ( लोहगंज ) ... ... | ०·५ |
| सिलिका... ... ... ... ... | ३·४ |
| फास्फारिक आसिड... ... ... ... | ५३·४ |
| क्लोराइन वगैरे... ... ... ... ... | ०·३ |
| एकंदर | ९९·८ |

परंतु जंगलांच्या रक्षणानें व हवा पाणी ह्यांच्याही संबंधानें पाहिलें तर झाडांच्या फांद्या सरसकट तोडूं देणें हेंही इष्ट नव्हे अर्थात् याच्या ऐवजीं दुसरे कांहीं पदार्थ आहेत किंवा नाहींत, हें शोधून काढून ते त्यांना देणें हेंही मोठें कठीण काम आहे.

इकडील शेतकरी अक्षरशः अडाणी असल्यामुळें उन्हाळ्यांत शेतांत जें कांहीं असेल तें सर्व विकून टाकितात. गवऱ्या सुद्धां मोठ्याशा शहरांत नेतात. अर्थात् लोकांना सरपणास त्या पाहिजेच असतात. असे सर्व रक्षामय पदार्थ नेतां नेतां पावसाळा सुरू होण्याची वेळ आली कीं, त्याला आपल्या शेताचें स्मरण होतें, व कांहीं तरी पीक केलें पाहिजे, ह्मणून शेजारच्या जंगलांत जाऊन तो सरसकट झाडांच्या फांद्या तोडूं लागतो. कारण, त्याला आतां त्या पदार्थांची गरज असते. आपले हिस्सेदार आपणास जेवढें लागेल तेवढें आणखी देतील अशा समजुतीनें जो एखादा पेढीवाला आपलें सर्व भांडवल खर्चितो, अशा पेढीवाल्याशीं या शेतकऱ्याची तुलना केली तरी शोभेल.

यावर कांहीं तरी उपाय योजावा ह्मणून प्रत्येक म्युनिसिपालिटीस आह्मी असें सुचवितों कीं, जेथून त्यांना सर्व जिन्नस मिळतात अशा ठिकाणीं पाठविण्याजोग्या एखाद्या कृत्रिम खताचा तिनें संचय करावा. आमची सूचना मान्य होऊन जर यथाशक्ति त्याप्रमाणें करण्याचें तिनें मनांत आणिलें, तर धान्य, सरपण, व कडबा वगैरे आणणाऱ्या गाड्या हल्लीं रिकाम्या जातात त्यांत महत्वाचें असें खत भरून पाठवितां येईल.

पुणें,
तारीख २१ जुलै
सन १८८९.

साम्युएल कुक.